



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार २४ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


# शिक्षक मतदारसंघात ८५.८७ टक्के तर पदवीधरसाठी ६२.७८ टक्के मतदान

**पुणे/प्रतिनिधी-** सकाळपासून मतदान केंद्रांवर लागलेल्या रांगा, मतदानासाठी दाखल झालेले उमेदवार आणि केंद्रांबाहेर पदाधिकाऱ्यांची गर्दी अशा वातावरणात शुक्रवारी (दि. २३) पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठी मतदान झाले. मतदान संपल्यानंतर शिक्षक मतदारसंघात ८५.८७ टक्के, तर पदवीधर मतदारसंघात ६२.७८ टक्के मतदान झाले. पदवीधर मतदारसंघात सोलापूर जिल्ह्याने ७१.४२ टक्के मतदानासह आघाडी घेतली, तर शिक्षक मतदारसंघात सातारा जिल्ह्यात सर्वाधिक ८९.३९ टक्के मतदान नोंदविण्यात आले.



पुणे, सोलापूर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश असलेल्या दोन्ही मतदारसंघांत सकाळी आठ ते दुपारी चार या वेळेत मतदान झाले. सकाळपासूनच मतदार मतदानाचा हक्क बजावण्यासाठी केंद्रांवर दाखल होत होते. पुण्यासह अन्य जिल्ह्यांमध्येही मतदान केंद्रांवर रांगा लागल्या होत्या. उमेदवारांनीही मतदान केले. विभागीय आयुक्त शीतल तेली आणि पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनीही मतदानाचा हक्क बजावला. मतदान केंद्रांबाहेर विविध उमेदवारांच्या पदाधिकाऱ्यांची गर्दी दिसून आली.

**पदवीधरसाठी २ लाख ४३ हजार मतदारांचे मतदान**

पदवीधर मतदारसंघातील एकूण ३ लाख ८८ हजार १९ मतदारांपैकी २ लाख ४३ हजार ६११ मतदारांनी मतदान केले. त्यामध्ये ➪(पान २ वर)

## अमरावती शिक्षक मतदारसंघात ९१.०८ टक्के मतदान

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत शुक्रवारी २३ ऑक्टोबर रोजी पाचही जिल्ह्यांत उत्साहात मतदान झाले. दुपारी ४ वाजेपर्यंतच्या अंदाजित आकडेवारीनुसार विभागात ९१.०८ टक्के मतदानाची नोंद झाली. एकूण २६ उमेदवार रिंगणात असल्याने या निवडणुकीत शिक्षक मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने जाणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.या निवडणुकीत महायुतीकडून शिवसेनेचे विद्यमान आमदार किरण सरनाईक, तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसच्या अदिती पोहरे हे प्रमुख प्रतिस्पर्धी आहेत. याशिवाय डॉ. प्रशांत विघे, दिलीप कडू, अविनाश बोरडे, संगीता शिंदे, शेखर भोयर, सुमित पवार, माजी आमदार श्रीकांत देशपांडे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे दत्तात्रय लहाने आणि सुरेश देवकर यांच्यासह अन्य उमेदवारांनीही निवडणुकीत आव्हान उभे केले आहे. विभागातील पाच जिल्ह्यांत ८१ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. एकूण ३५ हजार ८१० नोंदणीकृत शिक्षक मतदार या निवडणुकीत मतदानासाठी पात्र होते. शिक्षकांचे प्रश्न, जुनी पेन्शन योजना, सेवाविषयक मागण्या आणि शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न या निवडणुकीच्या केंद्रस्थानी होते. उच्च मतदानाची टक्केवारी उमेदवारांसाठी महत्त्वाची ठरणार असली, तरी केवळ मतदानाच्या प्रमाणावरून निकालाचा अंदाज बांधता येणार नाही. पसंती क्रमावर होणारे मतदान, जिल्हानिहाय मतदानातील फरक, उमेदवारांची संघटनात्मक ताकद आणि शिक्षक संघटनांचा प्रभाव यांवर निकालाचे विश्लेषण अवलंबून राहील. आता २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ४ सरकारी बँकांमधील हिस्सा घटवण्यासाठी मोदी सरकारची हालचाल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** -सरकार चार प्रमुख सरकारी बँकांमधील आपला हिस्सा ७५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचा विचार करत आहे. यामध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडिया, युको बँक, पंजाब अँड सिंध बँक आणि इंडियन ओव्हरसीज बँक यांचा समावेश आहे, अशी माहिती 'द इकॉनॉमिक टाइम्स'च्या वृत्तात देण्यात आली आहे. किमान सार्वजनिक भागभांडवलाचे नियम पूर्ण करण्यासाठी हा निर्णय घोटाला जाण्याची



### IDBI नंतर दोन बँकांच्या खासगीकरणाचीही तयारी

शक्यता वर्तविण्यात येत आहे. सरकारने हा निर्णय घेतल्यास या बँकांचे २५ टक्के शेअर्स इतर गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध होतील, अशीही माहिती समोर येत आहे. याशिवाय केंद्र सरकार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या विलीनीकरणाच्या दुसऱ्या टप्प्याची तयारी करत असून या प्रक्रियेअंतर्गत आणखी दोन बँकांची खासगीकरणासाठी निवड केली जाण्याची शक्यता आहे, अशी माहिती मनीकंट्रोलच्या वृत्तात देण्यात आली आहे. २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने 'आयडीबीआय बँके'व्यतिरिक्त दोन सरकारी बँका आणि एका सर्वसाधारण विमा कंपनीचे खासगीकरण करण्याची घोषणा केली होती.या महिन्याच्या सुरुवातीला कॅनडाचे अब्जाधीश प्रेम वत्स यांच्या 'फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंग्स'कडून आयडीबीआय बँकेतील ६०.७२ टक्के हिस्सा ५२,८७८ कोटी रुपयांना खरेदी केला जाणार असल्याची घोषणा सरकारने केली. आयडीबीआय बँक सरकारी नियंत्रणापासून मुक्त; केंद्र, एलआयसीची भूमिका आता केवळ सार्वजनिक भागधारकाची देशात केवळ तीन ते चार मोठ्या सरकारी बँका कार्यरत राहाव्यात, हे सरकारचे दीर्घकालीन उद्दिष्ट असल्याचे सूत्रांनी द इकॉनॉमिक टाइम्सला सांगितले. दरम्यान नीती आयोगाने यापूर्वीच खासगीकरणासाठी ➪(पान २ वर)

## युवा हेच आमच्या धोरणांच्या केंद्रस्थानी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे चिन्मय अमृत महोत्सव जागतिक परिषदेचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. भारताचे युवा हे सरकारी धोरणांच्या केंद्रस्थानी आहेत आणि एक मजबूत भारत घडवण्यात त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असणार आहे असे ते म्हणाले.



त्यांनी भारत देशाला संस्कृतीची जन्मभूमी असेही संबोधले. आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी म्हणाले हा माझ्यासाठी एक अत्यंत भावनिक अनुभव आहे. चिन्मय ही केवळ एक संस्था नाही; ती एका चिन्मय ऋषींनी सुरू केलेली एक संकल्पना आहे. अनेक दशकांचा तिचा प्रवास चिन्मय संकल्पाने भरलेला आहे. आणि जे चिन्मय आहे ते मूळत: शाश्वत आणि परिपूर्ण आहे. म्हणूनच, भारत मंडपम येथील कार्यक्रमासाठी चिन्मय अमृत महोत्सव हे नाव पूर्णपणे योग्य आहे. देशातील तरुण माझ्या धोरणांच्या केंद्रस्थानी आहेत आणि सेवा संकल्प यात्रेत तरुण महत्त्वाची भूमिका बजावतात. देशाला जागृत करण्यासाठी आणि पुढे नेण्यासाठी तरुणांची ऊर्जा आणि दृढनिश्चय वापरण्याचे आवाहन केले. नव्या भारताच्या➪(पान २ वर)

## नेहा बोराला उच्च न्यायालयाचा दणका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** - दिल्ली उच्च न्यायालयाने ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनच्या (AISA) राष्ट्रीय अध्यक्षा नेहा बोरा हिला मोठा दणका देत तिने केलेली याचिका फेटाळून लावली. दिल्लीपोलिसांच्या वतीने विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी (SEM) जारी केलेल्या त्या नोटीशीविरोधात नेहा बोराने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यात




१० हजारांचा शांतता हमी करार (Personal/Peace Bond) भरण्याचे निर्देश देण्यात आले होते. न्यायालयाने नेहा बोराला दिलेल्या धक्क्यामुळे विद्यार्थी नेत्यांच्या अडचणीत भर पडली आहे.मागील आठवड्यात १६ ऑक्टोबर रोजी मंडी हाऊस येथे एका आंदोलनादरम्यान नेहा बोराला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यानंतर दोन दिवसांनी, चौकशीच्या कालावधीत शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी १० हजार रुपयांचा वैयक्तिक जामीन आणि हमीपत्र सादर करण्याची➪(पान २ वर)

## एसआयआर विरोधात १४५ संघटना एकवटल्या

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** -मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीच्या विरोधात राजधानी दिल्लीत राजकीय आणि सामाजिक आंदोलनाचा मोठा भडका उडाला आहे. देशातील ८८ शहरांमध्ये सुरू असलेल्या देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून आज, २३ ऑक्टोबर रोजी पीपल अगेन्स्ट एसआयआर आणि शेतकरी संघटनांतर्फे केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येत आहे. ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण, राजकीय विश्लेषक योगेंद्र यादव, परकला प्रभाकर, अभिनेते प्रकाश राज आणि शेतकरी नेते राकेश टिकैत यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघत असल्याने दिल्लीत



प्रचंड तणावाचे वातावरण आहे.

दुसरीकडे, न्यायालयीन पातळीवरही आजचा दिवस अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे. कॉकरोच जनता पार्टीचे नेते आशुतोष रांका आणि सौरव दास यांची स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट कोर्टात दुपारी ३ वाजता पेशी होणार आहे; तर आयसाच्या राष्ट्रीय अध्यक्षा नेहा बोरा यांच्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालय आज संध्याकाळी निकाल देणार आहे. ➪(पान २ वर)

# 'त्या' ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक चौकशी, फडणवीस यांची घोषणा

**नागपूर/प्रतिनिधी-** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी एका पत्रकार परिषदेत ३१ मिनिटांहून अधिक कालावधीची एक ऑडिओ क्लिप उघड केली असून, यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. याप्रकरणी जरांगे यांच्यासह शिवसेना व भाजप नेत्यांनीही चौकशीची मागणी केली होती. या ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक चौकशीची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी नागपुरात केली.

**अडीच वर्षानंतर ध्वनिफित, पूर्ण सत्य बाहेर काढणार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज रविनगर येथील मतदान केंद्रावर मतदान केले. त्यानंतर ते प्रसारमाध्यमासोबत बोलत होते. यावेळी त्यांनी



आडिचा वर्षानंतर ही ऑडिओ क्लिप बाहेर आणण्यामागे काय हेतू आहे, कुणाला लक्ष्य करण्यासाठी त्याचा वापर करण्यात येत आहे का, या सर्व प्रकरणाची चौकशी केली जाईल. या ऑडिओ क्लिपमध्ये कुणाचा आवाज आहे, त्याची फॉरेन्सिक चौकशी केली जाईल, असेही ते म्हणाले. जरांगे पाटील, शिवसेना आणि भाजपनेही माझ्याकडे चौकशीची मागणी केली. या ऑडिओ क्लिपमधील पूर्ण सत्य बाहेर काढण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

**बावनकुळे यांनी दिले होते संकेत-** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी सकाळी पत्रकार परिषद घेऊन खळबळजनक ऑडिओ क्लिप ऐकवली. या ऑडिओ क्लिपमध्ये शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्फत मनोज जरांगेंना ५०० कोटी रुपये पोहोचवल्याचा उल्लेख आहे. तसेच भाजपकडून षडयंत्र रचले जात असल्याचा दावा देखील मनोज जरांगेंनी केला आहे. या ऑडिओ क्लिपमध्ये तीन ते चार व्यक्तिचे संभाषण असून ➪(पान २ वर)

## 'जरांगेंचा वापर झाल्यानंतर त्यांच्या बदनामीचा प्रयत्न'

**मुंबई/प्रतिनिधी-** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी एक ऑडिओ क्लिप पत्रकार परिषदेत ऐकवून दाखविल्यानंतर राज्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. या क्लिपमध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकरवी मनोज जरांगे यांना ५०० कोटी रुपये दिल्याचा दावा केला गेला. शिवसेना शिंदे गटाने हा एकनाथ शिंदेंच्या बदनामीचा डाव असल्याचे सांगत क्लिपमध्ये बोलणारे लोक भाजपाचे आहेत, असे म्हटले. तर भाजपाने क्लिपची सत्यता



पडताळण्यासाठी चौकशीची मागणी केली. दरम्यान राज ठाकरे यांनीही या प्रकरणी आता मोठे भाष्य केले आहे. राज ठाकरे माध्यमांशी बोलत असताना त्यांना याबाबतचा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, 'क्लिपमध्ये उल्लेख असलेल्या ५०० कोटी रुपयांचा हा प्रश्न नाही. तर कशाप्रकारे प्लॅनिंग केले जाते,➪(पान २ वर)

## ऑडिओ क्लिपमध्ये विजय वडेट्टीवार, सुषमा अंधारेंचीही नावं

**नागपूर/प्रतिनिधी-** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी समोर आणलेल्या कथित ऑडिओ क्लिपवरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकरणाची सत्यता तपासण्याची मागणी करत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेवर निशाणा साधला. मनोज जरांगे-पाटील यांनी ऐकविलेल्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये काँग्रेस नेते विजय



वडेट्टीवार आणि शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यासह विविध राजकीय नेत्यांची आणि वृत्तपत्रांची नावे वेगवेगळ्या संदर्भांत आल्याने चर्चा सुरू झाली आहे. या क्लिपमधील संभाषणाची सत्यता तपासणे आवश्यक असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले. क्लिपमधील कथित संभाषणाच्या आधारे कोणाला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला असेल, तर त्यामागील वास्तवही जनतेसमोर आले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.➪(पान २ वर)

## 'निवडणूक आयोग नागरिकांना गुन्हेगारीसाठी प्रवृत्त करते

### प्रकाश आंबेडकरांचा गंभीर आरोप; चुकीने वगळलेल्यांना पुन्हा समावेशासाठी अर्ज ६ मध्ये बदल

**अकोला/प्रतिनिधी-** मतदाराचे नाव चुकीने वगळले गेले असेल, तर ते नाव पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी स्वतंत्र कायदेशीर तरतूद नसल्याने निवडणूक आयोगाने अर्ज क्रमांक ६ मध्ये बदल केला. निवडणूक आयोग खोटे प्रमाणपत्र देण्यास भाग पाडून नागरिकांना गुन्हेगारीसाठी प्रवृत्त करीत आहे, असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज येथे केला.

**विधानसभा निवडणुकीपासून घोटाळ्याविरोधात लढा-** अकोल्यात माध्यमांशी ते बोलत होते. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगावर अत्यंत गंभीर आरोप केले. ते म्हणाले, 'महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका झाल्यापासून निवडणूक आयोगाने चालवलेल्या घोटाळ्याविरोधात वंचित लढा देत आहे. महाराष्ट्रातील ७५ लाख वाढलेल्या मतदानाची सविस्तर माहिती दिली जावी. येत्या २८ ऑक्टोबर रोजी या घोटाळ्यासह मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात मुंबईत मोर्चा काढण्यात येणार आहे.' नवीन मतदारांसाठी असलेला अर्ज क्रमांक ६ मतदार यादीतून चुकीने वगळण्यात आलेल्या नागरिकांनाही भरायला लावला जात आहे. या अर्जासोबत संबंधित व्यक्तीला प्रतिज्ञापत्र द्यावे लागत असून, त्यात यापूर्वी मतदार नसल्याचे नमूद



करावे लागते. यापूर्वी मतदार असलेल्या व्यक्तीने असे प्रतिज्ञापत्र दिल्यास ते खोटे दिल्याचा आरोप होऊन संबंधित व्यक्तीवर फौजदारी कारवाई होऊ शकते, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले. निवडणूक आयोग नागरिकांना अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र देण्यास भाग पाडत असल्याचा आरोपही त्यांनी केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी राष्ट्रपतींनी परवानगी द्यावी, अशी मागणी मोर्चाद्वारे ➪(पान २ वर)



## स्वतःच्या मतदारसंघातील विविध मतदान केंद्राचाही दौरा

**नागपूर/प्रतिनिधी-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आज सकाळी ८ वाजतापासून मतदानाला सुरुवात झाली असून प्रमुख उमेदवारांनी मतदान केले. पदवीधर मतदारसंघातून अनेकदा प्रतिनिधित्व करणारे केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मतदानाचा हक्क बजावला.

## केंद्रीयमंत्री गडकरीनंतर मुख्यमंत्र्यांनी केले मतदान

**योग्य पद्धतीने निकाल लागेल-** नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांत मतदान सुरू झाले आहे. या निवडणुकीत एकूण ३८ उमेदवार रिंगणात असून काँग्रेस व भाजप या दोन पक्षात चुरशीची लढत आहे. या निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविनगर येथील दादाजी धुनिवाले उच्च प्राथमिक शाळेतील मतदान केंद्रावर मतदान केले. यावेळी त्यांच्यासोबत भाजप उमेदवार सुधाकर कोहळे, भाजप माजी आमदार प्रा. अनिल सोले उपस्थित होते. यावेळी फडणवीस यांनी मतदारांत उत्साह दिसत असून योग्य पद्धतीने निकाल लागेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी फडणवीस यांनी स्पाय पेनने मतदान केले जाते, याबाबत मला माहित नाही. सुप्रिया सुळे यांनी मला तो पेन मला पाठवावा, मी समजून घेईल, असे सांगितले. दरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्या दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातील विविध मतदान केंद्रांना भेट दिली. ते विवेकानंदनगर परिसरातील मतदान केंद्रावर पोहोचले. निवडणुकीत भाजपचे सुधाकर कोहळे व काँग्रेसचे अभिजित वंजारी, अपक्ष नितेश कराळे➪(पान २ वर)

## फटाका कारखान्यात स्फोट:एकाच कुटुंबातील ५ ठार

### इमारतीबाहेर मृतदेह विखुरले; दाट लोकवस्तीच्या परिसरात होता कारखाना

**सिवान/वृत्तसंस्था-** बिहारमधील सिवान येथे फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये कारखान्याचे मालक अमीरउद्दीन, एक पुरुष, दोन मुली आणि एका महिलेचा समावेश आहे.या स्फोटात सुरुवातीला सात जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त होते. जिल्हाधिकाऱ्यांनी सुरुवातीला तीन मृत्यूंची पुष्टी केली, परंतु नंतर पोलिस अधीक्षक भरत सोनी यांनी पाच मृत्यूंची पुष्टी केली. एक व्यक्ती ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे. मृतांची ओळख पटवली जात आहे. हा अपघात जामो पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अलमपूर गावात घडला. स्फोटामुळे एक संपूर्ण घर कोसळले आणि रस्त्यावर मृतदेह विखुरले गेले. स्थानिक रहिवाशांच्या मते, सुमारे दीड तास अधूनमधून स्फोट होत होते. कारखान्यातील ➪(पान २ वर)






जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

पान १ व १० वरून

## शिक्षक मतदारसंघात ८५८७ टक्के,

१ लाख ६८ हजार ३८२ पुरुष, ७५ हजार २२७ महिला आणि दोन तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. या मतदारसंघात सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक ७१.४२ टक्के मतदान झाले. त्याखालोखाल सातारा ६६.९२ टक्के, कोल्हापूर ६३.८३ टक्के आणि पुणे जिल्ह्यात ६१.४७ टक्के मतदान नोंदविण्यात आले. सांगली जिल्ह्यात सर्वात कमी ५५.६२ टक्के मतदान झाले. मतदान करणाऱ्यांची संख्या मात्र, कोल्हापूर जिल्ह्यात सर्वाधिक ७३ हजार १२९ इतकी होती.पुणे जिल्ह्यात ५४ हजार २२१ पदवीधर मतदारांनी मतदान केले.

**शिक्षक मतदारसंघात ५३ हजारांहून अधिक मतदारांचा सहभाग** -शिक्षक मतदारसंघातील एकूण ६१ हजार ९४० मतदारांपैकी ५३ हजार १८५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यात ३३ हजार ३०२ पुरुष, १९ हजार ८८० महिला आणि तीन तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. शिक्षक मतदारसंघात सातारा जिल्ह्यात सर्वाधिक ८९.३९ टक्के मतदान झाले. सोलापूरमध्ये ८९ टक्के, कोल्हापूरमध्ये ८८.६२ टक्के आणि सांगलीमध्ये ८७.८३ टक्के मतदान नोंदविण्यात आले. पुणे जिल्ह्यात ७८.०८ टक्के मतदान झाले. विभागातील इतर चारही जिल्ह्यांमध्ये शिक्षक मतदारसंघाची मतदानाची टक्केवारी ८७ टक्क्यांपेक्षा अधिक राहिली.

**जिल्हानिहाय मतदान**

| जिल्हा | पदवीधर मतदान | टक्के | शिक्षक मतदान | टक्के |
|---|---|---|---|---|
| पुणे | ५४,२२१ | ६१.४७ | १३,१३५ | ७८.०८ |
| सोलापूर | ३५,५१३ | ७१.४२ | १३,६१९ | ८९.०० |
| सातारा | ३१,७६४ | ६६.९२ | ८,४५१ | ८९.३९ |
| सांगली | ४८,९८४ | ५५.६२ | ७,०८१ | ८७.८३ |
| कोल्हापूर | ७३,१२९ | ६३.८३ | १०,८९९ | ८८.६२ |
| **एकूण** | **२,४३,६११** | **६२.७८** | **५३,१८५** | **८५.८७** |

सकाळी दहा वाजेपर्यंत पदवीधर मतदारसंघात ८.८६ टक्के मतदान झाले होते, तर शिक्षक मतदारसंघात १२.९४ टक्के मतदारांनी मतदान केले होते. त्यानंतर दोन्ही मतदारसंघांतील मतदानाचा टक्का वाढत गेला. दुपारी दोन वाजेपर्यंत शिक्षक मतदारसंघात ५७.८९ टक्के मतदान नोंदविण्यात आले. त्याच वेळी पदवीधर मतदारसंघातील मतदान ४०.६० टक्क्यांवर पोहोचले होते. तर चार वाजेपर्यंत पदवीधर मतदारसंघात ६२.७८ टक्के तर पदवीधर मतदारसंघात विक्रमी ८५.८७ टक्के मतदान झाले.

## ४ सरकारी बँकांमधील हिस्सा

सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि इंडियन ओव्हरसीज बँक यांची नावे संभाव्य उमेदवार म्हणून सुचवली होती. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, येत्या वर्षभरात या चार बँकांमधील सार्वजनिक भागभांडवल वाढवणे हे सरकारचे तात्कालिक प्राधान्य आहे. भांडवल उभारणीसाठी बँका स्वतःच्या धोरणानुसार बाजारातून निधी गोळा करू शकतात, तर सरकार बाजारातील स्थितीचा अंदाज घेऊन 'ऑफर फॉर सेल' द्वारे आपला हिस्सा विकण्याचा विचार करू शकते. बाजारात सर्वसामान्यांसाठी समभागांची उपलब्धता वाढल्यास या बँकांच्या बाजारमूल्यात सुधारणा होईल, अशी सरकारला अपेक्षा आहे. बँकांच्या विलीनीकरणाच्या प्रक्रियेत तंत्रज्ञानातील सुसंगतता, बँकांची भौगोलिक व्याप्ती आणि व्यवसायाचे स्वरूप या घटकांचा प्रामुख्याने विचार केला जाईल. यासाठी बँकांकडूनही सूचना मागवल्या जाणार आहेत.मात्र बँकांच्या प्रत्यक्ष खासगीकरणासाठी कायद्यात सुधारणा करणे अनिवार्य आहे. विशेषतः 'बँकिंग कंपनीज कायद्या'त सुधारणा करावी लागणार असून विलीनीकरणाच्या प्रक्रियेबरोबरच ही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जाऊ शकते, असेही संबंधित अधिकाऱ्याने इकॉनॉमिक टाइम्सशी बोलताना स्पष्ट केले. सध्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या आणि वित्तीय संस्थांना २५ टक्के किमान सार्वजनिक भागभांडवलाच्या नियमातून ऑगस्ट २०२६ पर्यंत सूट देण्यात आली आहे. या मुदतीत आणखी वाढ केली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## युवा हेच आमच्या धोरणांच्या

संकल्पनेनुसार आपण एक नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण आणले पाहिजे असे म्हणत पंतप्रधान मोदींनी देशाला पुढे नेण्याच्या तरुणांच्या क्षमतेवर भर दिला. पंतप्रधान म्हणाले हा कार्यक्रम संत चिन्मयजींचे आध्यात्मिक योगदान, देशाचा 'स्वातंत्र्यकाळातील अमृत महोत्सव' आणि भारतीय संस्कृतीचा गौरव यांचा अद्भुत संगम दर्शवतो. हा उत्सव भारताची शाश्वत चेतना, ज्ञान आणि आधुनिक प्रगती यांच्या संगमाचे प्रतीक आहे, जो विचारांच्या अमृताचा आस्वाद घेतो. म्हणूनच मी हा उत्सव 'अमृत महोत्सव' म्हणून साजरा करा. चिन्मय अमृत महोत्सवाचे तीन दिवसीय संमेलन २३ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत भारत मंडपम येथे आयोजित केले जात आहे. पंतप्रधान मोदींनी भारतीय संस्कृती आणि आध्यात्मिक परंपरांचे महत्त्व अधोरेखित केले आणि सांगितले की, राष्ट्र हे संस्कृतीचे उगमस्थान आहे. त्यांनी भगवद्गीता आणि वेदांताचे ज्ञान शक्य तितक्या जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या गरजेवर भर दिला.

## नेहा बोराला उच्च

नोटीस पोलिसांनी तिला बजावली होती. या कारवाईविरोधात तिने उच्च न्यायालयात धाव घेत पोलिसांच्या भूमिकेला आव्हान दिले होते. न्यायलयात झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने सर्व बाजू समजून घेतल्यानंतर नेहा बोराची याचिका फेटाळून लावली.

**नेहा बोराच्या अडचणी वाढल्या**-न्यायालयाच्या या निकालानंतर संबंधित प्रशासकीय आणि कायदेशीर नियमांनुसार आता नेहा बोराला पोलिसांच्या सूचनेनुसार आवश्यक ती औपचारिकता पूर्ण करावी लागणार आहे. वाढत्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने उच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे. नेहा बोरा सोनम वांगचुक यांच्यासोबत नीट पेपरलीक प्रकरणात उपोषणाला बसली होती. त्यानंतर ती सातत्याने सरकारविरोधात आंदोलने, निदर्शने करताना दिसली आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनासह राहुल गांधी आणि इंडिया आघाडीच्या पत्रकार परिषदेतही तिचा सहभाग दिसला होता.

## एसआयआर विरोधात १४५ संघटना

देशव्यापी 'हर गली जंतर-मंतर' मोहीम

कनॉट प्लेस परिसरातील ऐतिहासिक गुरुद्वारा बंगला साहिब येथून दुपारी १ वाजता या मोर्चाची सुरुवात झाली आहे, तो थेट पटेल चौक येथील भारतीय निवडणूक आयोगाच्या मुख्यालयावर धडकणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, मतदार यादीतून अनधिकृतपणे वगळण्यात आलेली नावे त्वरित पुन्हा समाविष्ट करावीत आणि आगामी निवडणुका बॅलेट पेपरवर (मतपत्रिका) घ्याव्यात, अशा प्रमुख मागण्या आंदोलकांनी लावून धरल्या आहेत. पोलिसांनी रोखल्यास त्याच ठिकाणी रस्त्यावर जनता संसद भरवण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला आहे.

**देशभरात पडसाद**- या आंदोलनाला डाव्या विद्यार्थी संघटना, संयुक्त किसान मोर्चा आणि काँग्रेस सेवा दलासह तब्बल १४५ संघटनांनी पाठिंबा दर्शवला आहे. देशभरातील ८८ शहरांत याचे थेट पडसाद उमटत असून संकेतस्थळावर लाईव्ह ट्रॅकरद्वारे आंदोलनाची माहिती दिली जात आहे. डाव्या संघटना आणि शेतकरी नेत्यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे दिल्ली पोलिसांनी मध्य दिल्लीत छावणीचे स्वरूप दिले आहे. गुरुद्वारा बंगला साहिब आणि निवडणूक आयोग परिसरातील रस्त्यांवर दुपारी १ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात आली आहे. संवेदनशील भागात अतिरिक्त पोलीस कुमक, निमलष्करी दलाच्या तुकड्या आणि बॅरिकेड्स तैनात करण्यात आले आहेत.

**सीजेपी नेत्यांची एसईएम कोर्टात पेशी**-जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान ताब्यात घेतलेले कॉकरोच जनता पार्टीचे नेते आशुतोष रांका आणि सौरव दास यांना दुपारी ३ वाजता स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट समोर हजर केले जाणार आहे. शांतता राखण्यासाठी आवश्यक असलेल्या जातमुचलक्याच्या कायदेशीर अटींवर आज निर्णय होणार आहे. दिल्ली पोलिसांच्या क्राईम ब्रँचनेही या दोघांना चौकशीची नोटीस बजावली आहे.

## त्या ऑडिओ क्लिपची

यावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल,गुरुवारी चौकशीचे संकेत दिले होते.घर घेण्याचा विचार करताय? मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज देशाचे राजकारण हादरवूनस सोडणाऱ्या ध्वनिफित पत्रकार परिषदेत ऐकवल्या. त्यानंतर त्यांनी त्यातील संवादावर आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाश शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या ध्वनिफितीतील संवादाचा छडा लावला पाहिजे, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. यावर चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित व्यक्तीने सरकारकडे रीतसर तक्रार केली, तर तिची चौकशी करण्यात येईल, असे सांगितले होते.

**काय म्हणाले होते जरांगे?**-कथित ऑडिओ क्लिपमध्ये, शिवसेना (शिंदे गट) खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून मनोज जरांगे यांना ५०० कोटी रुपये मिळाल्याचा दावा केला गेला आहे. गेल्या तीन वर्षांपासून मराठा आरक्षण आंदोलन कमजोर करण्यासाठी आणि आपली प्रतिमा मलिन करण्यासाठी आपल्याविरोधात राजकीय षड्यंत्र रचले जात असल्याचा आरोप जरांगे यांनी केला. जरांगे यांनी ही ऑडिओ क्लिप 'पुरावा' म्हणून समोर ठेवत, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी मागणी केली होती. शिंदे गटाच्या संजय शिरसाट, उदय सामंत, दादा भुसे या नेत्यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. एकनाथ शिंदे यांना बदनाम करण्यासाठी ही ऑडिओ क्लिप व सुपारीचे राजकारण असल्याचा संशय व्यक्त करत, शिंदे गटाच्या नेत्यांनी या प्रकरणाची एसआयटी किंवा सखोल चौकशीची मागणी केली होती.

## ध्द्रजरांगेंचा वापर झाल्यानंतर

तो मूळ प्रश्न आहे. मनोज जरांगे पाटील सारख्या माणसाला बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. एखाद्या माणसाला बरोबर घ्यायचे, नंतर त्याला बदनाम करायचे. त्याची माणसे फोडायची, हे चाललंय काय?'

**क्लिप बाहेर आली कशी?**-राज ठाकरे पुढे म्हणाले, 'या क्लिपमध्ये बोलणारे कोण होते, हे आम्हालाही माहीत आहे. त्यांनी या गोष्टीचा विचार केला पाहिजे. ज्या वेळी सत्ता जाईल, तेव्हा कोणकोणत्या गोष्टी अंगाशी येतील, याचा त्यांना अंदाज नाही. तिसरा सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, ही क्लिप बाहेर आली कुठून?'

**दिवाळीनंतर दुष्काळ दौरा करणार**-दिवाळीनंतर राज ठाकरे दुष्काळी भागाचा दौरा करून पाणी टंचाईचा आढावा घेणार आहेत. आज मनसे पदाधिकाऱ्याच्या बैठकीनंतर त्यांनी याबाबतची माहिती दिली. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये भीषण परिस्थिती असताना राज ठाकरे म्हणाले की, सरकारने दिलेल्या पाच हजार रुपयांच्या मदतीने काहीही होणार नाही. मराठवाड्यात पाण्याचे नियोजन नीट केले नाही तर तिथे वाळवंट होण्याची शक्यता आहे, याबद्दल मी आधीपासून बोलत आलो आहे. पण याचा विचार केला जात नाही.

मराठवाड्यात पाण्याचे नियोजन केले जात नाही. अवैधरीत्या बोर खणल्या जात आहेत. बिअरच्या कारखान्यांना परवाने दिले जात आहेत. टॅप वॉटरचे पाणी विकले जात आहे. विहिरीतून पाण्याचा उपसा अवैध कामासाठी सुरू आहे, अशी माहिती देताना राज ठाकरे यांनी याबाबत काटेकोर नियोजन करण्याचे आवाहन केले.सध्या पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याची गरज आहे. त्यामुळे कुंभमेळा, इतर धार्मिक कार्यक्रमांचा विचार केला जावा, असा सल्ला राज ठाकरे यांनी दिला. नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी कुंभमेळ्याबाबत प्रश्न विचारला असता त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. पाण्याचे संकट पुढे वाढत जाणार आहे. राज ठाकरे गंभीर इशारा देताना म्हणाले की, पुढे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातून लोकांचे तांडेच्या तांडे शहराकडे वळतील. घर-दार सोडून लोक बाहेर पडतील. ग्रामीण भागात जनावरांचा प्रश्न मोठा आहे. जालना शहरात १५ दिवसांतून एकदा पाणी येत आहे. पाण्याचे साठे व्हावेत यासाठी पाण्याच्या टाक्या बनविणाऱ्यांसाठी सरकार काम करत आहे का? असा सवालही राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

## ऑडिओ क्लिपमध्ये विजय

जरांगे-पाटील यांनी भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या राजकारणाचे वास्तव समोर आणल्याचा दावाही वडेट्टीवार यांनी केला. मात्र, केवळ क्लिपमधील उल्लेखांवरून निष्कर्ष काढण्याऐवजी त्याची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्रीपद आणि सत्तेसाठी देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे यांनी मराठा आणि ओबीसी समाजांमध्ये संघर्ष पेटविल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. समाजा-समाजांत तेढ निर्माण करून सत्तेचे राजकारण करणे महाराष्ट्राच्या हिताचे नाही, असे ते म्हणाले. मुख्यमंत्रीपदावरून दोन्ही पक्षांमधील संघर्ष तीव्र झाल्याचा दावाही त्यांनी केला. 'देवाभाऊ आणि एकनाथ भाई हे जनतेसाठी नव्हे, तर सत्तेसाठी राजकारण करीत आहेत,' अशा शब्दांत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. या राजकीय संघर्षामुळे सामाजिक सलोखा आणि राज्याच्या विकासाचे प्रश्न मागे पडत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**बेरोजगारी, एमपीएससीचे प्रश्न ऐरणीवर**-राज्यातील बेरोजगारी, दुष्काळी परिस्थिती आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विद्यार्थ्यांचे प्रश्न गंभीर आहेत. मात्र, या प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्याऐवजी सत्ताधारी मुख्यमंत्रीपदासाठी संघर्ष करीत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. तरुणांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य देणे आवश्यक असताना राजकीय साठमारी सुरू असल्याने जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे ते म्हणाले. राज्यातील जनतेच्या हितापेक्षा सत्तेला महत्त्व दिले जात असल्याची टीकाही त्यांनी केली.

**शेतकऱ्यांना मदत देण्यावर भर द्या**-शेतकऱ्यांना परदेशातील शेतीचा अभ्यास करण्यासाठी पाठविण्याच्या निर्णयावरही वडेट्टीवार यांनी प्रश्न उपस्थित केले. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना प्रथम भरीव आर्थिक मदत देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. केवळ १८० शेतकऱ्यांना परदेश दौऱ्याची संधी देण्याऐवजी एक हजार शेतकऱ्यांची निवड करावी, तसेच राज्यातील प्रत्येक विभागातून किमान २०० शेतकऱ्यांना संधी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. दुष्काळात शेतकऱ्यांना दिले जाणारे पाच हजार रुपये पुरेसे नसल्याचे सांगत, अभ्यास दौऱ्यांपेक्षा आर्थिक मदत आणि शेती संकटावर उपाययोजनांना प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी सरकारला केले.

## निवडणूक आयोग नागरिकांना

केली जाणार असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले. नागरिकांना गुन्हेगार ठरविण्याची परिस्थिती निर्माण करणाऱ्या प्रक्रियेविरोधात हा मोर्चा असल्याचे त्यांनी सांगितले.हा मोर्चा काँग्रेस पक्षाने काढलेल्या सारखा राहणार नाही. राजकीय पक्षांना बोलवायचं नाही, नंतर आरोप करायचा की त्यांनी आम्हाला मदतच केली नाही. ओबीसी, दलित, आदिवासींच्या नेत्यांची गरज नाही. त्यांनी आमच्या पाठीमागे फरफटत यावे, अशी काँग्रेसची भूमिका असते. भाजपची मुस्लिमांसंदर्भात जी भूमिका आहे, तीच काँग्रेसने वापरली, अशी टीकाही त्यांनी केली.

## फटाका कारखान्यात स्फोट:

स्फोटानंतर घराला आग लागली. सुमारे दीड तास स्फोट सुरू होते. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि अग्निशमन दलाच्या गाड्यांच्या मदतीने सुमारे चार तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. दरम्यान, सदरचे एसडीओ आशुतोष गुप्ता, महाराजगंजचे एसडीपीओ अमन आणि बरहरिया, जामो व गोरेयाकोठीसह अनेक पोलिस ठाण्यांतील पोलिस घटनास्थळी पोहोचले. एसडीपीओंनी सांगितले की, अग्निशमन दलाच्या गाड्यांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. एसपी भरत सोनी यांनी सांगितले की, मृतदेहांची ओळख अद्याप पटलेली नाही. ज्या घरात फटाके बनवले जात होते, ते घर दाट लोकवस्तीच्या भागात आहे. एसपी भरत सोनी यांनी सांगितले की, प्राथमिक तपासात पोलिस ठाण्याच्या पातळीवर निष्काळजीपणा झाल्याचे उघड झाले आहे. जामो स्टेशनचे इनचार्ज धीरज कुमार आणि वॉचमन द्वारिका मांझी यांना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. २२ जानेवारी, २०२६ रोजी, नऊ महिन्यांपूर्वी, सिवानमधील एका फटाक्यांच्या कारखान्यातही स्फोट झाला होता. या दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला. हुसैंगंज पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बद्रम गावात हा शक्तिशाली स्फोट झाला. पीडित व्यक्तीचे डोके आणि पाय २० फूट दूर फेकले गेले. त्याच्या धडाचे तुकडे तुकडे झाले. मृताची ओळख बद्रम गावातील जल बद्र येथील ५० वर्षीय मुर्तुजा मन्सूरी अशी पटली आहे.

## केंद्रीयमंत्री गडकरीनंतर मुख्यमंत्र्यांनी

यांच्यासह एकूण ३८ उमेदवार रिंगणात आहेत. विभागातील २ लाख ५५ हजार ६०३ मतदार कुणाला पहिल्या पसंतीचे मत करतील, याबाबत २७ ऑक्टोबरला होणाऱ्या मतमोजणीतून स्पष्ट होणार आहे. भाजपसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मेळावे घेतले. फडणवीस दोन दिवस ठाण मांडून होते. त्यांनी बंडखोर प्रा. अनिल सोले यांचेही मनपरिवर्तन केले. दुसरीकडे काँग्रेसचे उमेदवार अभिजित वंजारी यांच्यासाठी काही मोजक्या नेत्यांनी परिश्रम घेतले. नेत्यांमध्ये एकोपा दिसून आला नाही. अपक्ष उमेदवारांनीही संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढले. आता मतदारांना मतदान केंद्रपर्यंत मतदारांना आणण्याचे आवाहन उमेदवारापुढे आहे.

**सकाळी मतदानाला सुरुवात**-दरम्यान, निवडणुकीसाठी निवडणूक यंत्रणाही सज्ज असून सकाळी नियोजित वेळेत मतदानाला सुरुवात झाली. . विभागातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांत मतदान केंद्रांवर सुरक्षेसाठी बंदोबस्त करण्यात आला आहे. मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांनी सहकार्याचे आवाहन केले आहे.

**४४५ मतदान केंद्रे**-मतदानासाठी विभागातील सहा जिल्ह्यांत एकूण ४४५ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या केंद्रांवर सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मतदारांमध्ये १ लाख ४७ हजार २८० पुरुष, १ लाख ८ हजार ३०१ महिला आणि २२ इतर मतदारांचा समावेश आहे. मतदानाच्या यशस्वीतेसाठी सहाही जिल्ह्यांत मतदान पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. विभागात एकूण २ हजार ५३५ शासकीय अधिकारी व कर्मचारी निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त करण्यात आले आहेत. केंद्र सरकारचे ४७६ शासकीय अधिकारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. गडचिरोली जिल्ह्यासाठी केंद्र सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील ३२ अधिकारीही उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**मतदारांना चार तासांची विशेष सवलत**-मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीत मतदार म्हणून नोंदणी झालेल्या कर्मचाऱ्यांना विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात आली आहे. ही रजा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या नियमित नैमित्तिक रजेव्यतिरिक्त असेल. खासगी आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या नोंदणीकृत मतदारांना मतदानासाठी चार तासांची विशेष सवलत देण्याचे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिले आहेत.

## अमरावती शिक्षक मतदारसंघ

दिवसात उमेदवारांची धाकधूक वाढणार आहे.

**हे उमेदवारही रिंगणात**- विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी एकूण २६ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. या मध्ये प्रा. अरुंधती वैद्य , गजानन रमेशराव उघडे (अपक्ष), दिलीप भरतसिंग राठोड (अपक्ष), डॉ. प्रशांत विठ्ठलराव शिंग (अपक्ष), भोयर चंद्रशेखर कोहपराव मनोहरराव (अपक्ष), मिनोड तुकाराम ब्राह्मणे (अपक्ष), राजेशकुमार शालिग्राम कहाले (अपक्ष), रामदास संभाराव कंकाळ (अपक्ष), विनोद भाऊराव राठोड (अपक्ष), श्रीकांत गोपाळ देशमुख (अपक्ष), श्रीकृष्ण सुलभान पाडुर्ट (अपक्ष), सुमित सूर्यदास पवार (अपक्ष), डॉ. सी. संगीता संजय शिंदे, (बीआरएस), प्रा. डॉ. संतोष श्रीकृष्ण हुसे (अपक्ष) आणि हेमराज दिलीपसिंग मुणोत (अपक्ष) यांचा समावेश आहे.

## जुगार बंदीसाठी पत्रांचा

होण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

मूर्तिजापूर शहर आणि उपविभागातील अवैध धंदे, जुगार अड्ड्यांवर कारवाई व्हावी, यासाठी पोलिस प्रशासनाला वारंवार निवेदने आणि पत्रे देणाऱ्या लोकप्रतिनिधीचे नाव दुसऱ्या शहरातील जुगार प्रकरणाच्या संदर्भात चर्चेत येणे, ही बाब राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरत आहे. जुगारविरोधी भूमिकेचा आग्रह धरणाऱ्यांच्या स्वतःच्या भूमिकेचीही पारदर्शकता असायला हवी, अशी चर्चा आता सुरू झाली आहे. मात्र, केवळ नाव समोर आल्याच्या चर्चेवरून कोणालाही दोषी ठरविता येणार नाही. दर्यापूरच्या गुन्ह्यात तसवर खान यांचा नेमका संदर्भ काय, त्यांच्याविरुद्ध अधिकृत आरोप आहेत का आणि तपासात त्यासंबंधी काही पुरावे समोर आले आहेत का, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे.अवैध जुगाराविरोधात कारवाईची मागणी करणाऱ्या लोकप्रतिनिधीचे नाव जुगार प्रकरणाच्या संदर्भात चर्चेत येत असेल, तर पोलिस प्रशासनाने उपलब्ध अधिकृत नोंदींच्या आधारे वस्तुस्थिती स्पष्ट करणे अपेक्षित आहे. दर्यापूर येथील छाप्यातील गुन्ह्याची कागदपत्रे, जप्त मुद्देमाल आणि संबंधित व्यक्तींच्या भूमिकांची तपासणी करूनच सत्य समोर येऊ शकते. त्याचवेळी तसवर खान यांची बाजूही जाणून घेणे आवश्यक आहे. दर्यापूर प्रकरणात नेमके काय निष्पन्न होते, पिंजरमधील चर्चेला काही तथ्याधार आहे का आणि संबंधित नगरसेवक यावर काय स्पष्टीकरण देतात, याकडे राजकीय वर्तुळासह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**पिंजरमधील चर्चेने संशयाचे ढग**-दरम्यान, पिंजर परिसरातील एका कथित जुगार अड्डा चालकासोबत आर्थिक व्यवहारासंबंधी चर्चा असल्याचीही माहिती समोर येत आहे. या चर्चेची स्वतंत्र अधिकृत पुष्टी उपलब्ध नसल्याने त्यावरून निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. तरीही या चर्चेमागील वस्तुस्थिती काय, आर्थिक व्यवहार झाल्याचा काही ठोस आधार आहे का ? या प्रश्नांची उत्तरे मिळणे महत्त्वाचे आहे. अफवांना तथ्यांचे स्वरूप देण्याऐवजी संबंधित बाबींची निष्पक्ष पडताळणी होणे गरजेचे आहे.

## धारणी नप्रं.सीईओ

कुटे यांचा जबाब नोंदवून घेत सखोल तपास सुरू केला आहे. धारणी नगर पंचायतचे सीईओ हे मूळचे कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड येथील रहिवासी आहेत. कुटे यांच्या म्हणण्यानुसार ते त्या अज्ञात व्यक्तीला ओळखतही नाहीत आणि त्यांचे कोणाशीही मतभेद नाहीत. मग ही धमकी कशासाठी? अज्ञात आरोपीने कमरेला लावलेली पिस्तूलसदृश वस्तू दाखवून जिवंत जाळण्याची धमकी दिल्याची त्यांनी पुष्टी केली, मात्र ती वस्तू खरंच पिस्तूल होती की आणखी काही, हे स्पष्ट होऊ शकलेले नाही. धमकीमागील कारण काय असू शकते, याचा शोध पोलीस घेत आहेत.

**सहाय्यक जिल्हाधिकारी यांनी घेतला आढावा**-अज्ञात आरोपी धमकी देऊन निघून गेल्यानंतर सीईओ अविनाश कुटे यांनी नांदगाव खंडेश्वरचे सीईओ यांना घटनेची माहिती दिली. दोघांमध्ये मैत्री असल्याने त्यांना ही माहिती दिल्यानंतर ही बातमी अमरावती एसपींपर्यंत पोहोचली. खबर मिळताच सहाय्यक जिल्हाधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी धारणी नगर पंचायतीत पोहोचून पाहणी केली, मात्र त्यावेळी त्यांची सीईओ अविनाश कुटे यांच्याशी भेट होऊ शकली नाही, कारण कुटे त्यावेळी धारणी पोलीस ठाण्यात होते. सध्या पोलिसांनी सीईओंचा जबाब नोंदवून तपास सुरू केला आहे.

## जिल्ह्यातील ६०० सेवा

सहकारी बँकेने नवीन पीक कर्जवाटपामध्ये मागील आढाव्याच्या तुलनेत सुमारे ७ ते ८ टक्क्यांनी वाढ झाल्याचे निदर्शनास आणून दिले. तथापि, ही वाढ पुरेशी नसल्याचे नमूद करून जिल्हाधिकारी यांनी बँकेने पीक कर्जवाटपाचा वेग आणि प्रमाण वाढविण्याचे निर्देश दिले.सेवा सहकारी संस्था नवीन पीक कर्जवाटपामध्ये अपेक्षित कामगिरी करणार नाहीत, अशा संस्थांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेऊन नियमानुसार आवश्यक कार्यवाही करावी. यामध्ये पात्र प्रकरणांमध्ये संस्थेच्या संचालक मंडळाविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्याबाबतही जिल्हाधिकारी यांनी सहायक निबंधकांना निर्देश दिले. अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसोबतच जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयीकृत बँकांनीदेखील नवीन पीक कर्जवाटपाचे प्रमाण आणि वेग वाढवून पात्र शेतकऱ्यांना वेळेत कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या सर्व पात्र शेतकरी सभासदांनी संबंधित बँक शाखेशी तातडीने संपर्क साधून नवीन पीक कर्जासाठी अर्ज करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्ज उपलब्ध झाल्यास आगामी हंगामासाठी शेतीच्या कामांचे नियोजन करणे सुलभ होणार असून, यासाठी प्रशासन, सर्व बँका आणि सेवा सहकारी संस्थांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असेही जिल्हाधिकारी येरेकर यांनी स्पष्ट केले.

## मोर्शीत ३५५ पैकी ३२७

मतदानात महिला पुरुष शिक्षक मतदारांनी उस्फूर्तपणे मतदानाला सुरुवात केली. सर्वपक्षीय व अपक्ष उमेदवारांचे बूथ तहसील कार्यालयाच्या २०० मीटर दूर उघडण्यात आले होते.त्यामुळे शिक्षक मतदारांना सर्व बुथवर नंबर काढून देण्याची प्रक्रिया सुरू होती. शांततेत मतदान पार पडले.सर्व उमेदवारांचे भाग्य मतपेटीत बंद झाले असून दि.२७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतमोजणीत कोणाची लॉटरी लागते, याकडे सर्व जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## भारत-न्यूझीलंड मॅचवर सट्टा

नितीन बबनराव ठाकरे (वय ४०, रा. मंगरुळपीर, वाशीम) याने पाठवल्याची सांगितले. त्यावरून पोलिसांनी ठाकरे यालाही ताब्यात घेतले. आरोपीं कडून असुस कंपनीचा लॅपटॉप, ओप्पो आणि ॲपल कंपनीचे दोन मोबाईल असा एकूण ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोघांविरुद्ध जुगारबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक सागर हटवार, शिवाजी घुगे, दिनेश कनोजिया, सागर नाठे, युवराज सोळंके, प्रशिक वानखडे यांनी केली.

## अंजनगाव सुर्जीत गावठी

तात्काळ घटनास्थळ गाठले. पोलिसांना मिळालेल्या वर्णनाचा एक संशयित इसम त्या परिसरात वावरताना दिसला. पथकाने अत्यंत शिताफीने पंचांसमक्ष त्याला ताब्यात घेतले.संशयित इसमाची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला एक देशी बनावटीचा कट्टा (गावठी पिस्तुल) आढळून आला. पोलिसांनी सदर कट्टा जप्त केला असून, आरोपीला त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव अब्दुल जुबेर अब्दुल आहाद (वय २४ वर्ष, रा. खान कॉलनी, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती) असे सांगितले. या पिस्तुलच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, त्याच्याकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच पिस्तुलबाबत अधिक विचारपूस केली असता त्याने पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिली.बेकायदेशीर शस्त्र बाळगल्याप्रकरणी आरोपी अब्दुल जुबेरविरुद्ध पोलीस स्टेशन अंजनगाव सुर्जी येथे कलम ४/२५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीने हा देशी बनावटीचा कट्टा कोठून आणला आणि याचा वापर तो नेमका कशासाठी करणार होता, याबाबतचा पुढील तपास पोलीस करत आहेत.या पथकामध्ये सहायक पोलीस निरीक्षक संतोष गुजर, पोलीस अंमलदार बळवंत दाभणे, भूषण पेठे, निलेश डांगोरे, गणेश आगोले आणि चालक हर्षद घुसे यांचा समावेश होता. पोलिसांच्या या कारवाईमुळे अंजनगाव सुर्जी परिसरात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## अतिक्रमणावर कारवाई, शेत

माहितीनुसार, हिरापूर शिवारातील शेत रस्त्यावर अनेक वर्षांपासून अतिक्रमण झाले होते. रस्ता अरुंद झाल्याने शेतकऱ्यांना शेतीची मशागत करण्यासाठी ट्रॅक्टर, बैलजोडी नेण्यास तसेच काढणी झालेला माल, पीक घरी आणण्यासाठी मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. वारंवार मागणी करूनही अतिक्रमण हटत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले होते.अखेर हिरापूर परिसरातील शेतकऱ्यांनी तहसीलदार पुष्पा सोळंके यांच्याकडे धाव घेत आपली हकीकत मांडली. शेतकऱ्यांची व्यथा ऐकून तहसीलदार सोळंके यांनी तात्काळ दखल घेतली. त्यांनी महसूल यंत्रणेला आदेश देऊन शेत रस्त्याची मोजणी करून अतिक्रमणे निष्कासित केली आणि शेत रस्ता पूर्णपणे मोकळा करून दिला.रस्ता मोकळा झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून तहसीलदार पुष्पा सोळंके यांचे शेतकऱ्यांनी फुल व पुष्पगुच्छ देऊन आभार मानले व सत्कार केला. यावेळी हिरापूर परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एटीएम कार्डची अदलाबदल

एटीएम कार्डची अदलाबदल करून कार्ड चोरून नेले. त्यानंतर चोरट्यांनी संबंधित व्यक्तीच्या बँक खात्यातून एटीएमद्वारे एकूण ५७ हजार ५०० रुपये काढून फसवणूक केली. या प्रकरणी दर्यापूर पोलीस ठाण्यात अप क्रमांक ५१९/२६, बीएनएस कलम ३१८(४), ३(५) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नागरिकांनी सतर्क राहावे**-एटीएममधून पैसे काढतांना अनोळखी व्यक्तींची मदत घेणे टाळावे. एटीएम कार्ड मशिनमध्ये अडकल्यास किंवा पैसे निघत नसल्यास अनोळखी व्यक्तीला कार्ड देऊ नये. तातडीने संबंधित बँकेच्या अधिकृत हेल्पलाइनशी संपर्क साधावा आणि कार्ड सुरक्षिततेसाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन पोलीस विभागातर्फे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात येत आहे.

## कॉअशोक सोनारकर

नाहाटे यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली.सदर अंत्ययात्रेमध्ये गावातील नागरिक ,भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र राज्य किसान सभा, बहुजन संघर्ष समिती ,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांचे सह विविध संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते. सोनारकर कुटुंबाने तेरवीच्या कुठलाही कार्यक्रम न करता ,सुशीलाबाईंचे स्मरणार्थ स्पर्धा परीक्षेच्या अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासिका हॉल मध्ये लागणाऱ्या सर्व खुर्च्या देण्याचे ठरवले आहे.

## अचलपूर रुग्णालयाला आरोग्य

मेळघाट व विविध तालुक्यातील गर्भवती महिलांची मोठ्या प्रमाणात प्रसूती केली जाते .मात्र स्त्रीरोग तज्ञ, स्टाफ चा तुटवडामुळे उपचार घेणाऱ्या रुग्णांना विविध अडचणीचा सामना करावा लागतो .यासर्व समस्या रुग्णांच्या नातेवाईकांनी त्यांच्या समक्ष मांडल्या. याबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे ही त्यांनी सांगितले.यानंतर संजय काटकर हे चिखलदराकडे रवाना झाले. यावेळी त्यांनी अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात एका महिन्यात गर्भवती महिलांची होणारी प्रसूती संख्या ,उपलब्ध स्टाफ आणि डॉक्टरांची संख्या,तपासणी सुविधा , वॉर्ड मध्ये उपलब्ध सुविधा याचा सखोल आढावा घेतला. या रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना सर्व सुविधा उपलब्ध करण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी अमरावती जिल्हाशल्य चिकित्सक ,अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ.गावंडे , डॉ.दीपक अग्रवाल. डॉ.स्वप्नील अग्रवाल आणि अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयाचे डॉक्टर मंडळी, कर्मचारी वर्ग , परिचारिका उपस्थितीत होते.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

शहरात पथसंचलनाचेही नियोजन करण्यात आले आहे. उपलब्ध मार्गनोंदीनुसार, पथसंचलनासाठी दोन मार्ग निश्चित करण्यात आले असून, दोन्ही संचलनांचा प्रारंभ आणि समारोप श्रीमती नरसम्मा महाविद्यालय येथे होणार आहे. पहिले पथसंचलन नरसम्मा महाविद्यालय येथून फरशी स्टॉप, हरिगंगा ऑईल मिल, संकेत नगर चौक, कुंभार नगर चौक, अंबिका नगर आणि प्रल्हाद कॉलनीमार्गे पुन्हा महाविद्यालयात पोहोचणार आहे. दुसरे पथसंचलन नरसम्मा महाविद्यालय येथून फॉरेस्ट स्टॉप, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, सिंधू नगर, मिनी नगर चौक, मुकुंदवाडी नगर आणि किरण नगरमार्गे पुन्हा महाविद्यालयात येणार असल्याची मार्गनोंद आहे. रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता किरण नगर येथील श्रीमती नरसम्मा महाविद्यालयाच्या मैदानावर होणाऱ्या या उत्सवाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महानगर संघ चालक उल्हास बापोरीकर यांनी केले सामाजिक एकात्मता, सांस्कृतिक परंपरा आणि मानवकल्याणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम अमरावतीतील विजयादशमी उत्सवाच्या आयोजनातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, २४ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक

# वाशिम जिल्ह्यात शांततेत आणि उत्साहात मतदान!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी आज शुक्रवारी (दि.२३) रोजी वाशिम जिल्ह्यात सर्वत्र शांततापूर्ण आणि उत्साही वातावरणात मतदान पार पडले. जिल्ह्यातील एकूण सात मतदान केंद्रांवर सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत ही मतदान प्रक्रिया अत्यंत सुसूत्र, सुरळीत आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण झाली. अंतिम आकडेवारीनुसार जिल्ह्यातील सातही मतदान केंद्रांवर एकूण ३ हजार ७१५ नोंदणीकृत मतदारांपैकी ३ हजार ५३४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून यामध्ये २ हजार ७५९ पुरुष आणि ७७५ महिला मतदारांचा समावेश असून, पुरुष मतदारांची मतदानाची टक्केवारी ९५.३४, तर महिला मतदारांची टक्केवारी ९४.४० आहे. एकूण मतदानाची टक्केवारी ९५.१३ टक्के नोंदविण्यात आली.



**केंद्रनिहाय अंतिम मतदान :** वाशिम मतदान केंद्र क्रमांक ५७वर ९५.६६ तर केंद्र क्रमांक ५८ वर ९६.४१ टक्के, मंगरूळपीर येथे ९५.१३ टक्के, रिसोड येथे ९६.६२ टक्के, मालेगाव येथे ९४.७० टक्के, तर कारंजा येथे ९३.९५ टक्के आणि मानोरा येथे ९१.४८ टक्के मतदानाची नोंद झाली.

**प्रशासकीय नियोजन व सोयी-सुविधा :** मतदान प्रक्रिया विनाअडथळा पार पडावी यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने चोख नियोजन करण्यात आले होते. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. सकाळपासूनच मतदारांमध्ये मतदानाचा उत्साह पाहायला मिळाला. वाशिम जिल्ह्यात शिक्षक मतदारसंघासाठी एकूण ३ हजार ७१५ मतदार नोंदणीकृत होते. यामध्ये २ हजार ८९४ पुरुष आणि ८२१ महिला मतदारांचा समावेश होता.

**जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी :** मतदान प्रक्रियेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी मतदान केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी केली. त्यांनी केंद्रांवरील व्यवस्था, सुरक्षा आणि मतदारांसाठी असलेल्या सुविधांचा आढावा घेतला.

**चोख पोलीस बंदोबस्त आणि प्रशासकीय नियोजन :** निवडणुकीतील सर्व यंत्रणांमध्ये उत्तम समन्वय राखून ही प्रक्रिया नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले होते. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने १५ पोलीस अधिकारी, २२८ पोलीस अंमलदार आणि १४ होमगार्ड तैनात करण्यात आले होते.मतदान प्रक्रियेसाठी ७ मतदान केंद्राध्यक्ष, प्रत्येकी ७ प्रथम, द्वितीय व तृतीय मतदान अधिकारी तसेच १० टक्के राखीव कर्मचाऱ्यांसह एकूण २७ कर्मचाऱ्यांचे अचूक नियोजनामुळे संपूर्ण जिल्ह्यात निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडली.

# वाशिममध्ये बनावट देशी-विदेशी दारूचा साठा जप्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■

बनावट देशी-विदेशी दारूची वाहतूक आणि साठवणूक करणाऱ्यांविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने कारवाई करत मोठा दारूसाठा जप्त केला. या कारवाईत तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, एकूण २ लाख ८२ हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वाशिम येथील भरारी पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे २० ऑक्टोबर २०२६ रोजी वाशिम तालुक्यातील अडोळी ते कुमरखेड रस्त्यालगत असलेल्या शिवारात ही कारवाई करण्यात आली. संबंधित ठिकाणी बनावट विदेशी मद्याची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने सापळा रचून तपासणी केली. यावेळी बनावट विदेशी मद्याचा साठा आढळून आला.

कारवाईदरम्यान १८० मिली क्षमतेच्या रॉयल स्टॅग व्हिस्कीच्या ३२९ बाटल्या, इम्पीरियल ब्ल्यू व्हिस्कीच्या १८० मिली क्षमतेच्या १३८ बाटल्या, बनावट सिलबंद बाटल्या तसेच ९०० देशी दारूच्या बाटल्या असा मोठ्या प्रमाणात मद्यसाठा जप्त करण्यात आला. या प्रकरणात वैभव बबन काकडे (वय २७), अमोल प्रल्हाद काकडे (वय २६) आणि रवी मानिक काकडे (वय ३१), सर्व रा. टो, ता. जि. वाशिम, यांना अटक करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींना वाशिम येथील प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना २३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पीसीआर मंजूर केला आहे.

# ‘खेत बचाव अभियान’ अंतर्गत शेंदुरजना आढाव येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

आत्मा वाशिम व कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘खेत बचाव अभियान’ अंतर्गत आप्पास्वामी महाराज मंदिर शेंदुरजना आढाव, ता. मानोरा येथे दि. २२ ऑक्टोबर २०२६ शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गणेश काळे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.आर.एल.काळे, माजी प्राचार्य अनुप पाटील आढाव, जिल्हा व्यवस्थापक शंकर शिंदे, तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. गणेश वानोळे, आत्माचे संजय राऊत, संदीप मोरे, कृषी सहायक शुभम पाचपिले आणि शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष गजानन गोटे उपस्थित होते.डॉ.आर.एल. काळे यांनी खेत बचाव अभियान’ची उद्दिष्टे स्पष्ट करताना जमिनीची सुपीकता टिकविणे, मृद आरोग्याचे संवर्धन करणे, रासायनिक निविष्ठांचा संतुलित व गरजेनुसार वापर करणे, सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढविणे आणि नैसर्गिक शेती पद्धतींचा अवलंब करणे यांचे महत्त्व विशद केले. भारत सरकारच्या नैसर्गिक शेतीविषयक उपक्रमांची माहिती देऊन स्थानिक संसाधनांवर आधारित शेती, जैविक निविष्ठांचा योग्य वापर, पीक उत्पादन खर्चात कपात आणि दीर्घकालीन शाश्वत उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. गणेश वानोळे यांनी जनावरांचे संतुलित पोषण व शास्त्रीय व्यवस्थापन याविषयी माहिती देऊन प्रात्यक्षिक सादर केले. श्री. शुभम पाचपिले यांनी केंद्र व राज्य शासनाच्या कृषी योजनांची माहिती दिली, तर आत्माचे संजय राऊत आणि संदीप मोरे यांनी आत्मामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कृषीविषयक योजनांची माहिती दिली. यावेळी उपस्थित शेतकरी, महिला बचत गटांच्या सदस्य तसेच शेतकरी उत्पादक कंपनीच्या सभासदांना उपलब्ध योजनांचा लाभ, कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार, शेतकरी गटांचे सक्षमीकरण आणि सामूहिक उपक्रमांद्वारे शेती अधिक आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास शेतकरी, महिला बचत गटांच्या सदस्य आणि शेतकरी उत्पादक कंपनीचे सभासद उपस्थित होते.

# वाचनालयात धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

## डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय वाशीम येथे दि.२०ऑक्टोबर २६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रसंगी कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत अधिकारी धम्मानंद भगत तर प्रमुख उपस्थिती म्हणून कवी महेंद्र ताजणे, समाजसेवक माधव डोंगरदिवे, आदर्श ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन,नालसाचे जिल्हा शिक्षण समिती सदस्य राजकुमार पडघान, प्रविण पट्टेबहादूर, से. नि. शिक्षक आर.पी.कांबळे ,वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांची उपस्थिती होती. सर्व प्रथम उपस्थित मान्यवरांनी तथागत गौतम बुद्ध यांना पुष्प अर्पण केले.नंतर डॉ बाबासाहेब आंबेडकरांना उपस्थितांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ व संविधान पुस्तक देऊन वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांनी स्वागत केले.नंतर महेंद्र ताजणे, समाजसेवक समाजसेवक माधव डोंगरदिवे, अरविंद पडघन, राजकुमार पडघान, प्रविण पट्टेबहादूर यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्त्व विषद केले.तर उपस्थितांना राजकुमार पडघान यांनी बावीस प्रतिज्ञेचे वाचन केले. कार्यक्रमाला दुर्योधन भारसाखळे, भगवान पडघान, दादाराव इंगोले, अशोक अडागळे, यांचेसह अनेकांनी तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

# मंगरूळपीरमध्ये तलवार जप्त; अवैध शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल

## पोलिसांची धडक कारवाई; स्कुटीच्या डिक्कीत आढळली धारदार तलवार

■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

शहरातील महाकाली नगर परिसरातील नवीन आठवडी बाजाराजवळ स्कुटीच्या डिक्कीत धारदार तलवार बाळगणाऱ्या एका इसमाला मंगरूळपीर पोलिसांनी गस्तीदरम्यान ताब्यात घेतले. या कारवाईत तलवारीसह मोरपंखी रंगाची ज्युपिटर स्कुटी असा एकूण ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.



बाळू विठ्ठलनाथ पावडे (वय ३८, रा. दाभा, ता. मंगरूळपीर) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. बुधवार, २१ ऑक्टोबर रोजी दुपारी १ ते १.३५ वाजताच्या सुमारास महाकाली नगर येथील नवीन आठवडी बाजार परिसरात एक इसम स्कुटीवर तलवार घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल क्षीरसागर व पोलीस निरीक्षक किशोर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ठाकरे, राठोड, प्रमोद वानखेडे आणि गुन्हे शोध पथकाने पंचांसह कारवाई केली. यावेळी बाळू पावडे याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता, त्याच्या स्कुटीच्या डिक्कीत धारदार तलवार आढळून आली. पोलिसांनी तलवारीसह एमएच ३७ एएल ०२३३ क्रमांकाची ज्युपिटर स्कुटी जप्त केली. या प्रकरणी मंगरूळपीर पोलीस ठाण्यात अप. क्र. ७३५/२०२६ अन्वये भारतीय शस्त्र अधिनियमाच्या कलम ४ व २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास मंगरूळपीर पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस कर्मचारी वसंत ठाकरे, प्रमोद वानखेडे, रफिक मांजरे, मनीष आढे, संतोष बारड आणि शकिल मुन्नीवाले यांनी केली.

# तांडा सुधार समितीच्या मानोरा तालुका अध्यक्षपदी प्रमोद आडे यांची निवड

■ प्रतिनिधी | मानोरा ■

रानावनात भटकंती करत समूहाने राहणारा तांडा आज गावपातळीवर स्थिरावला असताना त्यांचा मूलभूत हक्क व सोयी सुविधेसाठी आजही गाव,वाडी वस्ती, तांड्यांना वीज रस्ते पाणी व शिक्षण या सोयी मिळत नसल्याने आजही तांडातील मजूर ऊस तोडण्यासाठी परराज्यात जात आहे.



ही समस्या दिवसागणिक वाढत असल्याने समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अखिल भारतीय तांडा सुधार समिती ही गाव पातळीवरील तांडा,वाडी वस्तीवर संघटन निर्माण करून समाजातील समस्यांना वाचा फोडणारी संघटना म्हणून मागील २५ वर्षापासून महाराष्ट्र कर्नाटक आंध्र प्रदेश तामिळनाडू आदी राज्यात संघटनेचे जाळे निर्माण केल्या गेले आहे. राज्यातील बंजारा समाजाचे पोहरादेवी या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी शासनाकडे पाठपुरवठा करणाऱ्या अ. भा. तांडा सुधार समिती ही चळवळ मागील अनेक वर्षापासून कार्यरत आहे. या संघटनेच्या मानोरा तालुका अध्यक्षपदी प्रमोद आडे यांची निवड संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.प्रकाश राठोड यांनी नियुक्तीपत्र देऊन निवड केली आहे. वाशिम येथील संत सेवालाल महाराज मंदिरात अखिल भारतीय तांडा सुधार समिती राज्य कार्यकारिणीची बैठक नुकतीच संपन्न झाली या बैठकीला प्रदेशाध्यक्ष डॉ. विजय जाधव यांनी संपूर्ण राज्यातील पदाधिकाऱ्यांची निवड केली. यावेळी राष्ट्रीय महासचिव नामा बंजारा यांची उपस्थिती होती.

प्रमोद आडे यांच्या निवडीसाठी माजी सरपंच तथा तांडा सुधार समितीचे उपाध्यक्ष रामराव चव्हाण यांनी शिफारस करत निवडीसाठी अनुमोदन दिले.प्रमोद आडे हे मागील १० वर्षापासून ग्रामीण भागातील आरोग्य, शिक्षण व मूलभूत सुविधांसाठी समाजाच्या विकासासाठी झटणारा असल्याने त्यांची निवड करण्यात आली आहे.

# बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहूउद्देशीय समाजसेवी संस्था अकोलाचा उपक्रम

**अकोला :** स्थानिक बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय समाजसेवी संस्था अकोलाचे सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेच्या वतीने रविवार दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी खडकी अकोला येथे शिक्षणापासून वंचित भटक्या समाजाच्या एकूण २५ बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता त्यांच्या पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन मुलांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेचे संस्थापक सचिव मा. विपुल तेलगोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. खूप तळमळीने आपण शिक्षण घेतले पाहिजे. मोठ्या नोकरीवर लागून तुम्ही तुमचा उद्धार केला पाहिजे. तुमचे घर बदलले पाहिजे स्वतःचे घर झाले पाहिजे. भटकंती करण्याची वेळ तुमच्यावर येऊ नये. असेही ते म्हणाले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रसेनजित तेलगोटे यांनी मुलांना व त्यांच्या पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना म्हटले की, शिक्षण हेच उन्नतीचे एक मात्र साधन आहे. आपल्या मुलांचे भवितव्य उध्वस्त होण्यापासून वाचवायचे असेल तर त्यांना आपण शिकवले पाहिजे. भिक्षा मागण्याकरिता विविध ठिकाणी भटकंती करत असताना तुमचे मुलं शिक्षणापासून वंचित राहत आहेत.



## अतुल राऊत यांची अ. भा. मराठा महासंघाच्या वाशीम जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**वाशीम :** अखिल भारतीय मराठा महासंघ —महाराष्ट्र राज्य युवक आघाडीच्या वाशीम जिल्हाध्यक्षपदी अतुल अशोक राऊत पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.वभागातील पदाधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार ही नियुक्ती करण्यात आली असून, नियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा राहणार आहे.या कालावधीत संघटनेचा विस्तार व बळकटीकरण करणे, नवीन सदस्यांची नोंदणी करून सक्षम कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करणे, तसेच सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.


### जाहीर नोटीस

ज्या अर्थी अर्जदार गजानन श्रीराम शेळक यांनी त्यांचे वडील नामे श्रीराम परशराम शेळके यांचा मृत्यु दि.१२/०६/१९९८ रोजी कामठवाडा, ता.जि वाशिम येथे झाला असल्याने मृत्युची नोंद ही गैरअर्जदार यांच्या कार्यालयामध्ये मृत्यु नोंदणी रजिस्टरला नसल्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये सदरचे प्रकरण जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३(३) नुसार मृत्युची नोंद होणेबाबत दाखल केलेले आहे.

त्या अर्थी श्रीराम परशराम शेळके यांचा मृत्यु दि.१२/०६/१९९८ रोजी मौजे कामठवाडा, ता.जि. वाशिम येथे झाला असल्याबाबत इतर कोणसही सदरच्या श्रीराम परशराम शेळके यांच्या मृत्यूचे नोंद घेणेबाबत कोणताही आक्षेप, हरकत असल्यास दि. ०६ / ११ / २०२६ रोजी किंवा ३० दिवसाचे आत स्वत: किंवा आपले वकीलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा, अन्यथा कोणासही कोणत्याही प्रकारचा आक्षेप या मृत्यू नोंदी विषयी नाही असे गृहीत धरून सदरच्या अर्जावर आदेश पारीत करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

करीता सदरची नोटीस आज दि.१२/१०/२०२६ रोजी रोजी वि न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी दिली आहे.

**ठिकाण :** वाशिम
**दिनांक :** १२.१०.२०२६

**आदेशावरून**
**सहा. अधिक्षक**
न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे. वाशिम.


# शिरसाळा, नागठाण्यात ‘पीडीकेव्ही स्मार्ट दत्तक ग्राम विकास’ उपक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सुविदे फाऊंडेशन कृषी विज्ञान केंद्र, वाशिम आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ‘पीडीकेव्ही स्मार्ट दत्तक ग्राम विकास कार्यक्रमांतर्गत’ शिरसाळा (ता. मालेगाव) व नागठाणा येथे शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन व जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या वेळी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब, उत्पादन खर्चात बचत आणि एकात्मिक शेतीतून उत्पन्नवाढ साधण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले.



कार्यक्रमात कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जलसंधारण, मृदा आरोग्य संवर्धन, हवामान अनुकूल शेती आणि कृषी निविष्ठांचा कार्यक्षम वापर याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शेती उत्पादनाची गुणवत्ता वाढविण्यासोबतच कृषीमालाचे मूल्यवर्धन आणि बाजारपेठेच्या गरजेनुसार शेतीचे नियोजन करण्याचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.

कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी पीक उत्पादनासोबत पशुपालन, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन आणि अन्य कृषीपूरक व्यवसायांचा समन्वय साधण्याचे आवाहन केले. एकात्मिक शेती पद्धतीमुळे उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण होऊन शेतीतील जोखीम कमी करण्यास मदत होते. त्यामुळे जमिनीचा प्रकार, पाण्याची उपलब्धता आणि स्थानिक हवामान लक्षात घेऊन शास्त्रशुद्ध शेतीचे नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले.

कृषी विस्तार संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे यांनी विद्यापीठाच्या शिफारशीत तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादन खर्च कमी करण्यासह कृषीमालाच्या प्रक्रिया व मूल्यवर्धनातून उत्पन्न वाढविण्याचे आवाहन केले.यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे, डॉ. नितीन कोष्टी, डॉ. दिगंबर इंगोले, तुषार देशमुख, डॉ. किशोर बिडवे यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी, ग्रामपंचायत प्रतिनिधी, कृषी सखी आणि प्रगतशील शेतकरी उपस्थित होते. कृषी विद्यापीठाचे संशोधन, कृषी विज्ञान केंद्राचे मार्गदर्शन आणि शेतकऱ्यांचा सहभाग यांच्या माध्यमातून दत्तक गावांचा शाश्वत कृषी विकास साधण्यावर यावेळी भर देण्यात आला.


MAHILA UTKARSHA PRATISHTHAN'S

**COLLEGE OF PHARMACY (D. PHARM)**

**(DTE code - 1163)**

Pundlik Nagar, Degaon Tq. Risod, Dist. Washim Pin Code. 444506

ADMISSION NOTICE

**D. Pharm I[st] year**

Application are invited from eligible candidates for admission to D .Pharm I[st] year for Institute level & Seats likely to be remained vacant after completion of Centralized Admission Process (CAP)

**ELIGIBILITY**

HSC passed students with 50% Marks PCB/PCM group for OPEN category and 45% Marks PCB/PCM group for reserved category

**ADMISSION SCHEDULE**

Sale & Receipt of admission form for Institute Level and seats likely to be remain vacant after completion of CAP round from 2**5/10/2026 to 25/10/2026 up to 03:00 pm**

**Admission Schedule for seats likely to be remained Vacant after CAP rounds**

11) Invite Application from Registered Candidates : 25/10/2026 up to 5:00 pm
12) Display of Provisional Merit list : 26/10/2026 at 11:30 Am.
13) Grievance Redressed if any : 26/10/2026 up to 05:30 pm.
14) Display of Final Merit List : 27/10/2026 at 11:30 Am.
15) Admission Round - I : 28/10/2026 to 29/10/2026 at 05:30 pm.

Detail admission schedule will be displayed on college notice board. The student advised to see the college notice board time to time for further schedule or for change if any.

**For Application form, Prospectus and for more details contact college office between 10:30 am to 05:30 pm**
**Contact number:- 8329912938/7083931098**

**Principal**

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३२६ ■ शनिवार, २४ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


पाणी रस्त्यावर, प्रशासन खुर्चीत

## सेलूत पिण्याच्या पाण्याची उधळपट्टी सुरूच; टंचाईचे संकट गडद

### सेलूत पाणीटंचाईचे संकट गडद; वाहन धुणे, रस्त्यांवर पाणी शिंपडण्याचे प्रकार राजरोस



**सेलू जनमाध्यम :** जिल्ह्यात भूजलपातळी झपाट्याने खालावत असताना सेलू शहरात मात्र पिण्याच्या पाण्याचा बेफिकीर वापर सुरूच आहे. भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले असतानाही नागरिक आणि व्यावसायिकांकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे पाण्याची उधळपट्टी रोखणार कोण, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शहरातील विविध वाहन धुलाई केंद्रांवर वाहने धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. अनेक दुकाने आणि घरांसमोर तसेच रस्त्यांवर पाणी शिंपडून त्याचा अपव्यय होत आहे. एका बाजूला शेतीसाठी पाण्याची उपलब्धता कमी होत असताना दुसरीकडे पिण्याच्या पाण्याची अशी उधळपट्टी सुरू असल्याने आगामी काळातील संकटाची तीव्रता वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. पाणी बचतीच्या सूचना केवळ कागदावर न ठेवता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची गरज आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी शहरात पाहणी करून पाण्याचा अनावश्यक वापर करणाऱ्यांना प्रतिबंध करावा. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

आज पाण्याचा अपव्यय रोखला नाही, तर उद्या घोटभर पाण्यासाठी नागरिकांना वणवण भटकण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरण्यासोबतच प्रशासनानेही तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## वाल्मीक वार्डात जुन्या वादातून, २१ वर्षीय युवकाची हत्या; तिघे अटकेत

### गळयावर चाकूने वार, डोक्यावर लोखंडी पाइपने प्रहार



**आर्वी जनमाध्यम :** जुन्या वादातून निर्माण झालेल्या वैमनस्याचा रक्तरंजित शेवट झाला. आर्वी शहरातील वाल्मीक वॉर्डात गुरुवारी (ता. २२) रात्री साडेनऊच्या सुमारास अभिजीत अवधूत ढोकणे (वय २१, रा. पिंपरी पुनर्वसन, ता. आर्वी) या तरुणाची धारदार चाकू, लोखंडी पाइपने हल्ला करून हत्या करण्यात आली. या घटनेने शहरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली आहे.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, अभिजीत भाजीपाला विक्री आणि ऑटो चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होता. जुन्या तहसील कार्यालयाजवळ त्याचे भाजीपाल्याचे दुकान होते. अभिजीतची आई आणि सुभाष हायगले यांच्यातील पूर्वीच्या प्रेमसंबंधांवरून अभिजीत व सुभाष यांच्यात वारंवार वाद होत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेच्या आदल्या दिवशीही बसस्थानक परिसरात दोघांमध्ये वाद झाला होता.

गुरुवारी रात्री आठच्या सुमारास बहीण नेहा हिने अभिजीतला दुकानावरून घरी आणले. जेवण केल्यानंतर तो पुन्हा दुकानावर जात असल्याचे सांगून बाहेर पडला. रात्री साडेनऊच्या सुमारास त्याच्यावर हल्ला झाल्याची माहिती कुटुंबीयांना मिळाली. घटनास्थळी अभिजीत रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. त्याला तातडीने उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. तक्रारीनुसार, विशाल निपाने याने लोखंडी पाइपने अभिजीतच्या डोक्यावर, तर प्रथमेश हायगले याने मानेवर चाकूने वार केला. सुभाष हायगले याचाही हल्ल्यात सहभाग असल्याचा आरोप आहे.

नेहा ढोकणे हिच्या तक्रारीवरून विशाल अरुण निपाने (२५), प्रथमेश सुभाष हायगले (२२) आणि सुभाष देवबाआप्पा हायगले (५२) यांच्याविरुद्ध आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक मल्हारी तळीकोटे तपास करीत आहेत. ठाणेदार सतीश डेहनकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## पदवीधर मतदारांचा उत्स्फूर्त कौल

### वर्धा जिल्ह्यात ६८.८६ टक्के मतदान

**वर्धा जनमाध्यम :** नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत वर्धा जिल्ह्यात मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. जिल्ह्यातील ४१ मतदान केंद्रांवर शुक्रवारी शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या मतदानासाठी दिवसभर मतदारांची लगबग दिसून आली. सायंकाळी ४ वाजता मतदानाची वेळ संपल्यानंतरही अनेक केंद्रांवर मतदारांच्या रांगा कायम होत्या.

**२१ हजार ७४२ मतदारांची नोंद** -नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघासाठी वर्धा जिल्ह्यात एकूण २१ हजार ७४२ मतदारांची नोंद होती. यामध्ये १३ हजार ९९ पुरुष, तर ८ हजार ६४३ महिला मतदारांचा समावेश होता. त्यापैकी ९ हजार ६१५ पुरुष आणि ५ हजार ३५७ महिला मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. अशा प्रकारे एकूण १४ हजार ९७२ मतदारांनी मतदान केले. त्यानुसार मतदानाची अंदाजित टक्केवारी ६८.८६ इतकी नोंदविण्यात आली.

जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनीही बजावला मतदानाचा हक्क



**जिल्हाधिकाऱ्यांनी केले मतदान-** जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी वर्धा येथील केसरीमल कन्या विद्यालयातील मतदान केंद्रावर मतदान केले.

दरम्यान, मतदानाची निर्धारित वेळ संपल्यानंतरही काही केंद्रांवर मतदार रांगेत असल्याने मतदान प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. त्यामुळे अंतिम मतदानाची टक्केवारी किती राहते, याकडे राजकीय वर्तुळासह प्रशासनाचे लक्ष लागले आहे.

## दारुबंदी गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली वाहने घेऊन जाण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** राज्य उत्पादन शुल्क विभागांतर्गत दारुबंदी गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या ३३ दोनचाकी वाहनाचा ई-लिलाव, शासकीय जमा करावयाची कार्यवाही सुरु आहे. ज्या नागरिकांकडे दारुबंदी गुन्ह्यातील जप्त वाहने सोडण्याबाबत न्यायालयाचे आदेश असतील त्यांनी न्यायालयाचे आदेश घेऊन निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक कार्यालय आरती चौक येथे ९५७९९०९३४३, ९९२३५३७२६२ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून खात्री करुन १५ दिवसाचे आत आपली जप्त वाहने घेऊन जावीत. अन्यथा १५ दिवसानंतर जप्त वाहनांचा लिलाव करण्यात येईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिक्षकांनी कळविले आहे.

## शेतातील पाणबुडी मोटार चोरट्यांना बेड्या

### तीन गुन्ह्यांतील १ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शेतातील पाणबुडी पाण्याच्या मोटारी चोरणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. साहिल दिलीप पेटकर (वय २१) आणि बादल रामू वरठी (वय १९, दोघेही रा. केळझर, ता. सेलू) अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून तीन गुन्ह्यांतील एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे सेलू परिसरातील शेतातील मोटार चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुनगड येथील मारोती सिताराम वाघाडे आणि वडगाव जंगली येथील प्रफुल रमेश झाडे यांच्या शेतातून ११ ते १२ ऑक्टोबरदरम्यान प्रत्येकी एक पाणबुडी मोटार चोरीला गेली होती. याप्रकरणी दोन्ही शेतकऱ्यांनी २२ ऑक्टोबर रोजी सेलू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार दोन स्वतंत्र गुन्हे नोंदविण्यात आले.

या चोरीच्या घटनांचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेने सुरू केला. घटनास्थळाची पाहणी, तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी साहिल पेटकर आणि बादल वरठी यांना केळझर येथून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी सेलू पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन पाणबुडी मोटारी चोरल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

चोरी केलेल्या मोटारी वडगाव जंगली येथील प्रतीक शंभरकर यांच्या शेतातील बंड्यावर लपवून



ठेवल्याची माहिती आरोपींनी दिली. त्यानुसार पोलिसांनी पंचांसमक्ष घटनास्थळी जाऊन मुद्देमाल जप्त केला. एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून आरोपी आणि जप्त साहित्य पुढील तपासासाठी सेलू पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोलीस उपनिरीक्षक राहुल ईटेकर तसेच पोलीस अंमलदार मनोज धात्रक, महादेव सानप, आशिष मेश्राम, अभिषेक नाईक, हर्षल सोनटक्के, चालक राहुल लुटे आणि सायबर सेलचे पोलीस अंमलदार प्रतीक वांदीले यांनी ही कारवाई केली.

## सावंगीच्या ग्रामीण रुग्णालयात मानसिक आरोग्य सप्ताह

### रॅली, स्पर्धा आणि नाटिकेतून जनजागृती

**वर्धा जनमाध्यम :** मानसिक आजारांविषयी समाजात असलेले गैरसमज आणि भेदभाव दूर करून रुग्णांना सन्मानाने जगण्याचा आधार मिळावा, या उद्देशाने सावंगी (मेघे) येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाच्या मानसोपचार विभागातर्फे मानसिक आरोग्य सप्ताह २०२६ साजरा करण्यात आला. 'प्रत्यक्ष अनुभव ऐकून घेणे : खरा आवाज, खरा बदल' ही या सप्ताहाची संकल्पना होती.

अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च अंतर्गत आयोजित या उपक्रमाचा प्रारंभ उद्घाटन समारंभाने झाला. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निलेश अग्रवाल, रुग्णालय संचालक डॉ. चंद्रशेखर



महाकाळकर, मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभय मुडे, नर्सिंग संचालक डॉ. दीपा चुग, मानसोपचार विभागप्रमुख डॉ. रागिणी पाटील, डॉ. स्वप्नील अलोने आणि डॉ. मोहित अग्निहोत्री यांच्यासह विभागातील निवासी डॉक्टर उपस्थित होते.

सप्ताहानिमित्त पोस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मानसिक आरोग्य जनजागृती रॅली, सामाजिक प्रबोधनाचे उपक्रम, रुग्णांसाठी विविध कार्यक्रम आणि चित्रपट प्रदर्शन आयोजित करण्यात आले. समारोपाच्या दिवशी रुग्णांचे अनुभव मांडणारी नाटिका स्पर्धा घेण्यात आली. या उपक्रमांतून मानसिक आरोग्याच्या समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहण्याचा आणि संबंधित व्यक्तींना समजून घेण्याचा संदेश देण्यात आला.

मानसिक आरोग्याच्या समस्यांवर वेळीच मदत घेणे, रुग्णांची संवेदनशीलतेने काळजी घेणे आणि उपचार प्रक्रियेत कुटुंबीयांसह समाजाचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. मानसिक आजार असलेल्या व्यक्तींना सामाजिक भेदभावाचा सामना करावा लागू नये, यासाठी जनजागृती महत्त्वाची असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले.

मानसिक आरोग्याविषयी मोकळेपणाने बोलण्याची संस्कृती निर्माण करणे आणि गरजू व्यक्तींना योग्य उपचार व आधार उपलब्ध करून देणे, हा या सप्ताहाचा प्रमुख उद्देश होता.

## उद्या वर्ध्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव

### डॉ.श्वेता काळे पिसुळकर प्रमुख अतिथी; मुकुलजी कानिटकर प्रमुख वक्ते

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, वर्धा नगराच्या वतीने श्री विजयादशमी उत्सव व शस्त्रपूजन सोहळ्याचे आयोजन उद्या रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता करण्यात आले आहे. नागपूर रोडवरील केसरीमल कन्या शाळेच्या प्रांगणात हा सोहळा होणार असून, यंदा संघाच्या कार्याला १०१ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर या उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



या सोहळ्याला अदानी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चच्या कुलसचिव डॉ. श्वेता काळे पिसुळकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सदस्य व प्रचार विभागातील प्रमुख वक्ते मुकुलजी कानिटकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. विजयादशमी हा हिंदू समाजाच्या पुरुषार्थाचा, शक्तीच्या जागरणाचा आणि विजयाच्या संकल्पाचा प्रतीकात्मक उत्सव मानला जातो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यातही या दिवसाला विशेष स्थान आहे. हिंदुत्वाच्या पुण्यप्रवाहाचा सात्त्विक आविष्कार असलेल्या या पर्वाच्या माध्यमातून समाजात राष्ट्रनिष्ठा, संघटन आणि सांस्कृतिक मूल्यांविषयी जागृती करण्याचा संदेश दिला जातो.

संघाच्या शताब्दी वर्षानंतर सुरू झालेल्या १०१ व्या वर्षातील या उत्सवात स्वयंसेवकांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नगर संघ चालक डॉ. प्रसाद देशमुख यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांचे भविष्य 'लॉगिन'मध्ये कैद

### महिनाभरापासून जात-नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्रे रखडली; वर्धा उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या कारभारावर संताप

**सेलू । जनमाध्यम :** शिक्षणाच्या दारात उभ्या असलेल्या विद्यार्थ्यांचे भविष्य सरकारी लालफितीत अडकले आहे. जात आणि नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्रांसाठी अर्ज करून महिनाभर उलटला, तरी वर्धा उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या 'लॉगिन'मधून प्रस्ताव पुढे सरकण्याचे नाव घेत नाहीत. प्रशासनाच्या या संथ कारभाराचा फटका सेलू तालुक्यातील विद्यार्थ्यांना बसत असून, शैक्षणिक प्रवेश आणि विविध शासकीय सवलतींचे भवितव्य टांगणीला लागले आहे.

विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर केले. मात्र, प्रमाणपत्रे मिळत नसल्याने त्यांना वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती आणि जात वैधता प्रमाणपत्राशी संबंधित कामांसाठी ही कागदपत्रे महत्त्वाची असताना प्रशासनाकडून होणारी दिरंगाई विद्यार्थ्यांच्या अडचणीत भर घालत आहे. वेळेत कागदपत्रे सादर करण्याची सक्ती विद्यार्थ्यांवर केली जाते. मग सरकारी कार्यालयातील प्रस्ताव महिनाभर प्रलंबित का राहतात, हा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. विलंबामागील तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणेही स्पष्ट होत नसल्याने विद्यार्थ्यांचा मनस्ताप वाढला आहे. वर्धा उपविभागीय अधिकारी यांनी तातडीने हस्तक्षेप करून प्रलंबित प्रस्तावांचा निपटारा करावा आणि पात्र विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वेळेत द्यावीत, अशी मागणी होत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## वर्ध्यातून छत्तीसगडच्या २४ वर्षीय तरुणाचे अपहरण

### स्टेशनफैल परिसरातून तरुण बेपत्ता; वडिलांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील स्टेशनफैल परिसरात भाड्याने राहणारा छत्तीसगड राज्यातील २४ वर्षीय तरुण बेपत्ता झाला आहे. भागीरथी पीसाहुराम साहू असे या तरुणाचे नाव असून, अज्ञात व्यक्तीने चुकीच्या उद्देशाने त्याचे अपहरण केल्याचा संशय त्याच्या वडिलांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १४०(३) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, भागीरथी साहू हा मूळचा छत्तीसगड राज्यातील कुरवा, तालुका लोहारा, जिल्हा कबीरधाम येथील रहिवासी आहे. तो वर्धा येथे गवंडी कामासाठी येत होता. १४ ऑक्टोबर रोजी तो गावातील एका परिचितासोबत वर्ध्यात आला होता. त्यानंतर स्टेशनफैल परिसरात भाड्याची खोली घेऊन तो एकटाच राहत होता.

१६ ऑक्टोबर रोजी वडिलांनी मोबाईलवर संपर्क साधला असता, भागीरथीने प्रकृती ठीक नसल्याचे सांगितले होते. मात्र, १७ ऑक्टोबर रोजी सकाळपासून त्याचा मोबाईल बंद येऊ लागला.



दिवसभर संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे वडिलांनी वर्ध्यात गवंडी काम करणाऱ्या परिचिताला त्याच्या खोलीवर जाऊन पाहण्यास सांगितले. त्यावेळी भागीरथी खोलीत आढळून आला नाही. यानंतर वडील वर्ध्यात आले. खोलीच्या मालकिणीकडे चौकशी केली असता, भागीरथी १७ ऑक्टोबरच्या सकाळपासून बाहेर गेला असून अद्याप परतला नसल्याचे समजले. त्याची दुचाकी मात्र खोलीजवळ उभी होती. मुलाचा शोध घेऊनही तो न सापडल्याने वडिलांनी पोलिसांत धाव घेतली.

वडिलांच्या तक्रारीवरून वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविला असून, बेपत्ता तरुणाचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

## पावसाची ९३ दिवस दडी; हिंगणघाट तालुका सर्वाधिक बाधित

### अल निनोचा प्रभाव; खरीप पिकांना फटका, जलाशयांतही ठणठणात

**वर्धा जनमाध्यम :** यंदा अल्प पर्जन्यमान आणि वारंवार पडलेल्या पावसाच्या खंडामुळे वर्धा जिल्ह्याच्या शेतीचे गणितच बिघडले आहे. मान्सूनच्या हंगामात पावसाने सातत्याने दडी मारल्याने खरीप पिकांना मोठा फटका बसला असून, आता जलसाठ्यांची स्थितीही चिंताजनक बनली आहे. जिल्हा प्रशासनाच्या १९ ऑक्टोबरपर्यंतच्या नोंदीनुसार, हिंगणघाट तालुक्यात सर्वाधिक ९३ दिवस पावसाचा खंड पडला. वर्धा तालुक्यात ८२, सेलूत ७५, आर्वीत ७३, कारंजात ७२, तर आष्टी, देवळी आणि समुद्रपूर तालुक्यांतही पावसाने दीर्घकाळ पाठ फिरवली. पावसाच्या या लहरीपणामुळे शेतकऱ्यांच्या हाती आलेल्या पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची भीती आहे. दुसरीकडे, मोठ्या आणि मध्यम जलाशयांतही अपेक्षित जलसाठा झालेला नसल्याने भविष्यातील पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता आहे. अल निनोच्या प्रभावाची प्रशासनाने नोंद घेतली असून, उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**जलाशयांत नाममात्र साठा; पाणीटंचाईचे सावट**

जिल्ह्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने मोठे आणि मध्यम जलाशय पूर्ण क्षमतेने भरलेले नाहीत. सध्या उपलब्ध असलेला उपयुक्त





**तालुकानिहाय पावसाच्या खंडाचे दिवस**

- हिंगणघाट : ९३ दिवस
- वर्धा : ८२ दिवस
- सेलू : ७५ दिवस
- आर्वी : ७३ दिवस
- कारंजा : ७२ दिवस
- देवळी : ६२ दिवस
- समुद्रपूर : ६२ दिवस
- आष्टी : ६१ दिवस

जलसाठा मर्यादित असल्याने आगामी काळातील पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी प्रशासनाला नियोजन करावे लागणार आहे. नागरिकांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे.

**पावसाने तालुक्यांना किती काळ झुलवले**

हिंगणघाट तालुक्यात १४ सप्टेंबरपासून १९ ऑक्टोबरपर्यंत पावसाचा खंड नोंदविण्यात आला. वर्धा तालुक्यात २६ सप्टेंबरपासून १९ ऑक्टोबरपर्यंत, तर कारंजा आणि आष्टी तालुक्यांतही सप्टेंबरअखेरपासून ऑक्टोबरच्या उत्तरार्धापर्यंत पावसाने दडी मारली. समुद्रपूर तालुक्यात २७ सप्टेंबर ते १९ ऑक्टोबरदरम्यान पाऊस झाला नसल्याची नोंद आहे. त्यामुळे पावसाच्या अनियमिततेचा परिणाम केवळ खरीप हंगामापुरता मर्यादित न राहता आगामी रब्बी हंगाम आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवरही होण्याची शक्यता आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# मतदानाला गेले, पण नावासमोर आधीच मतदान!

**नागपूर/प्रतिनिधी-** मतदानासाठी केंद्रावर पोहोचल्यानंतर आपल्या नावाने आधीच मतदान झाल्याचे समोर आले, तर काय कराल? नागपुरातील दिघोरी परिसरातील सर्वेश्वर नगर येथील अमित उच्च प्राथमिक शाळेतील मतदान केंद्रावर डॉ. प्रशांत गायकवाड यांना अशाच प्रकाराला सामोरे जावे लागल्याचा आरोप आहे. नावासमोरील सही, बॅलेट पेपरचे क्रमांक आणि इतर नोंदींमध्ये विसंगती असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यांच्या आक्षेपानंतर अधिकाऱ्यांनी त्यांना नवीन बॅलेट पेपर देऊन मतदानाची संधी दिली. या प्रकारामुळे केंद्रावर काही काळ तणाव निर्माण झाला.

**नेमके काय घडले?**

डॉ. प्रशांत गायकवाड मतदानासाठी केंद्रावर गेले होते. गर्दीमुळे त्यांना सुमारे ४५ मिनिटे प्रतीक्षा करावी लागली. त्यांचा क्रमांक आल्यानंतर दोन ठिकाणी नोंदणी असल्याचे सांगण्यात आले. दुसऱ्या ठिकाणी मतदान करणार नसल्याची हमी घेतल्यानंतर त्यांना बॅलेट पेपर देण्यात आला. मात्र, त्यांच्या नावासमोर आधीच मतदान झाल्याची नोंद आणि सही असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

**अधिकाऱ्यांनी काय सांगितले?**

गायकवाड यांच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीला त्यांच्या बॅलेट पेपरवर चुकून दुसऱ्या व्यक्तीने सही केल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. मात्र, बॅलेट पेपरचे क्रमांक, मतदारांच्या सह्या आणि भाग क्रमांक यांमध्ये तफावत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. यावरून त्यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. गायकवाड यांच्या दाव्यानुसार, अन्य दोन मतदारांच्या नोंदीमध्येही सह्या, भाग क्रमांक आणि बॅलेट पेपरच्या क्रमांकाबाबत विसंगती आढळली. त्यांच्या आक्षेपानंतर या दोन मतदारांशी संबंधित बॅलेट पेपर रद्द करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. या प्रकारात आपल्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

होय. आक्षेपानंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी डॉ. गायकवाड यांना नवीन बॅलेट पेपर दिला. त्यानंतर त्यांनी मतदान केले. मात्र, त्यांच्या नावासमोर आधीच मतदान झाल्याची नोंद कशी झाली आणि अन्य दोन मतदारांच्या नोंदींत विसंगती का आढळली, हे प्रश्न कायम आहेत.

**या प्रकारामुळे कोणते प्रश्न उपस्थित झाले?**

मतदान केंद्रावरील नोंदींची पडताळणी नेमकी कशी झाली, मतदारांच्या सह्यांमध्ये आणि बॅलेट पेपरच्या क्रमांकांत तफावत कशी निर्माण झाली, याची स्पष्टता आवश्यक आहे. डॉ. गायकवाड यांनी केलेल्या आरोपांबाबत निवडणूक यंत्रणेची अधिकृत भूमिका समोर आलेली नसल्याने या प्रकरणाची तपासणी झाल्यानंतरच नेमके कारण स्पष्ट होऊ शकेल.

## 'गझलकार' सीमोल्लंघन २०२६ अंकाचे प्रकाशन

### -ऑनलाइन विशेषांक हा मराठी गझलचा अनोखा उपक्रम-चिन्मयी सुमित

**पुणे/प्रतिनिधीः-** चित्रपट-नाट्यसृष्टीतील ख्यातनाम अभिनेत्री 'पाच फुटाचा बच्चन' फेम चिन्मयी सुमित यांच्या शुभ हस्ते पुणे येथे अनौपचारिकपणे 'गझलकार' सीमोल्लंघन २०२६ ह्या ऑनलाइन अंकाचे प्रकाशन संपन्न झाले. यावेळी चिन्मयी सुमित म्हणाल्या, केवळ मराठी गझलेला वाहिलेल्या ह्या ऑनलाइन अंकाची ही अनोखी संकल्पना मला आवडली. हा उपक्रम गेली सतरा वर्षे चालविणाऱ्या संपादक, सहसंपादकांचे मी हार्दिक अभिनंदन करते. त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देते. यावेळी अंकाचे सल्लागार संपादक शाहीर सुरेशकुमार वैराळकर आणि गझलकार कीर्ती वैराळकर उपस्थित होत्या. मराठी रसिकांना मराठी गझलने चांगलेच वेड लावले आहे. मराठी गझलच्या कला आणि कौशल्यासंबंधी सबकुछ देणाऱ्या, ख्यातनाम गझलकार श्रीकृष्ण राऊत यांच्या 'गझलकार' या मराठी गझलच्या ब्लॉगचा




'गझलकार' सीमोल्लंघन हा वार्षिकांक दरवर्षी दसऱ्याच्या निमित्ताने मागील सतरा वर्षांपासून ऑनलाइन प्रकाशित होत आहे. यंदा ह्या अंकात महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील एकूण २२४ गझलकारांच्या ६४० गझला, १० गझलसंग्रहांचा आस्वादात्मक परिचय, गझलविषयक ६ लेख आणि ४ हझला समाविष्ट आहेत. ह्या अंकाचे सल्लागार संपादक शाहीर सुरेशकुमार वैराळकर असून नामवंत ज्येष्ठ गझलकार श्रीकृष्ण राऊत यांनी हा अंक संपादित केला आहे. देश, विदेशात सुप्रसिद्ध असलेले



अकोल्याचे नामवंत चित्रकार सतीश पिंपळे यांनी ह्या अंकाचे देखणे मुखपृष्ठ केले आहे. अंकाचे सहसंपादक युवा गझलकार अमोल शिरसाट, विनोद देवरकर आहेत. मुद्रित शोधनाची महत्त्वपूर्ण बाजू गझलकार भागवत उर्फ बाळू घेवारे यांनी सांभाळली आहे. https://gazalakar 26. blogspot. com/?m=0 या दिलेल्या लिंकवर हा अंक वाचता येईल.

## जन आरोग्य योजना अधिक पारदर्शक व प्रभावी करणार-मुख्यमंत्री



**नागपूर** -सर्वसामान्य जनतेला चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना अधिक पारदर्शक व प्रभावी पद्धतीने राबविण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. वर्धमान नगर परिसरात अत्याधुनिक सुविधा असलेल्या मल्टीस्पेशालिटी न्यू एरा हॉस्पिटलचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी खासदार अजय संचेती, विजय दर्डा, आमदार कृष्णा खोपडे, चैनसुख संचेती न्यू एरा हॉस्पिटलचे प्रमुख आनंद संचेती, उज्वल पगारिया, डॉ निलेश अग्रवाल, हेल्थकेअर इन्व्हेस्टमेंटच्या प्रियंका सावंत , विधिरा मिश्रा आदी यावेळी उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूर मेडिकल हब म्हणून ओळखले जाते. मेडिकल केअरमध्ये राज्यासह देशात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे मेडिकल टुरिझमला चालना मिळत आहे. अत्याधुनिक आरोग्य सुविधांमुळे विविध देश आरोग्य सुविधेसाठी भारताला प्राधान्य देत आहेत.राज्यात अत्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासोबतच सर्वसामान्य जनतेला परवडेल अशा पद्धतीने आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी दोन हजार ४०० आजारांचा जन आरोग्य योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. न्यू एरा हॉस्पिटलमध्ये अत्यंत दर्जेदार व अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध होतील असा विश्वासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. संचालक डॉक्टर आनंद संचेती यांनी स्वागत करून रुग्णालयात उपलब्ध सुविधांची माहिती दिली.

## सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याचे राज्यपालांना निमंत्रण

**मुंबई** : नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे ३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपतींच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे निमंत्रण कुंभमेळा मंत्री तथा जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना लोक भवन येथे दिले.

**कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी घेतली राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची भेट**

यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या तयारीची तसेच या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्व असलेल्या सोहळ्याच्या नियोजनाची माहिती राज्यपालांना दिली. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर ही धार्मिक व सांस्कृतिक परंपरेची महत्वपूर्ण केंद्रे असून, सिंहस्थ कुंभमेळा हा महाराष्ट्राच्या आध्यात्मिक वैभवाचे दर्शन घडविणारा महत्वाचा उत्सव आहे. या सोहळ्याच्या माध्यमातून देशभरातील संत-महंत, साधू आणि भाविकांच्या श्रद्धेला एकत्रित व्यासपीठ मिळणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन भव्य, दिव्य, सुरक्षित आणि सुव्यवस्थित पद्धतीने करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून, आवश्यक पायाभूत सुविधा, भाविकांची सोय आणि विविध प्रशासकीय व्यवस्थांच्या नियोजनावर भर देण्यात येत असल्याची माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी यावेळी दिली.

## विश्वमांगल्य बालसभा शाखा अमरावती तर्फे कन्यापूजन उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शारदीय नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त विश्वमांगल्य बालसभेच्या वतीने अमरावती जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये कन्यापूजनाचा कार्यक्रम उत्साहात घेण्यात आला.

विश्वमांगल्य सभा हे एक मातृसंघटन असून कुटुंब, समाज आणि राष्ट्र या सर्वच स्तरांवर 'आई' ही केंद्रस्थानी असते, या विचारावर ही संघटना कार्य करते. संस्कार, सदाचार, सामर्थ्य व सेवा या चार आधारस्तंभांवर समाज निर्मिती व्हावी आणि देव, देश व धर्माप्रती कर्तव्याची जाणीव प्रत्येक मातृशक्तीमध्ये जागृत व्हावी, या उद्देशाने विश्वमांगल्य सभेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात.याच उपक्रमांतर्गत अमरावती जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातील जवळपास २४ शाळांमध्ये कन्यापूजन घेऊन संस्कार आणि सामर्थ्याचा जागर करण्यात आला. 'आजची कन्या ही उद्याची माता आहे' या भावनेतून



नवदुर्गा स्वरूप असलेल्या कन्यांना कन्यापूजनाचे महत्त्व, संस्कार, क्षमता आणि स्व-सामर्थ्याचे महत्त्व कथारूपातून समजावून सांगण्यात आले.अमरावती विभागातील दर्यापूर, अचलपूर, परतवाडा, चांदूर रेल्वे, मोर्शी, वरूड, धारणी, चिखलदरा, अंजनगाव सुर्जी या तालुक्यांसह जिल्ह्यात हजारो कन्यांचे पूजन करण्यात आले.विश्वमांगल्य बालसभेअंतर्गत पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ, बुलढाणा या पाच जिल्ह्यांसह पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया आणि वर्धा या जिल्ह्यांमध्येही कन्यापूजनाच्या माध्यमातून संस्कार, सामर्थ्य व सदाचाराची रुजवण करण्यात आली.नवरात्रोत्सवाच्या या पावन पर्वात विश्वमांगल्य सभा अमरावती जिल्हा कार्यकारिणीसह विदर्भ प्रांत कार्यकारिणीच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शारदीय नवरात्र कन्यापूजनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

## बीएसएनएल अमरावती येथे रक्तदान शिबिर ; ६१ जणांचे रक्तदान

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल), अमरावती यांच्या वतीने आज दूरसंचार भवन येथे एका रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा शुभारंभ बीएसएनएल अमरावतीच्या महाव्यवस्थापक माधुरी निमजे यांनी स्वतः रक्तदान करून केला. त्यांच्या या प्रेरणादायी पावलामुळे तेथील उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना रक्तदान करण्यासाठी मोठी प्रेरणा मिळाली.या शिबिरामध्ये बीएसएनएलच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसह बँक ऑफ महाराष्ट्र आणि भारतीय खाद्य निगमच्या कर्मचाऱ्यांनी देखील उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या शिबिरात एकूण ६१ जणांनी रक्तदान करून मानवता आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे उत्तम उदाहरण सादर केले.कार्यक्रमाला रक्तदान समिती, अमरावतीचे अध्यक्ष महेंद्र भूतडा हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.



रक्त संकलन आणि वैद्यकीय व्यवस्थापनासाठी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती यांच्या रक्तपेढी (ब्लड बँक) पथकाने मोलाचे सहकार्य केले. या पथकात डॉ. दीपाली सावले, डॉ. अभिराज निस्ताने, स्वाती चूडे, वंदना चौधरी, सूरज नागपुरे आणि मयूर भूरे, कबीर हिनवणे, अधिराज निस्ताने, प्रा.संजय कुळकणी, प्रा.राजेश पांडे, राकेश ठाकूर, सुनिल अग्रवाल यांचा समावेश होता.शिबिराच्या यशस्वी आयोजनामध्ये संतोष गांधी (उपमहाव्यवस्थापक) सोपान लिचडे (सहायक महाव्यवस्थापक), नितिन सावरिक (राजभाषा व जनसंपर्क अधिकारी) विपिन देशमुख (उपमंडळ अभियंता - प्रशासन) आणि अतिंदर कौर (कनिष्ठ राजभाषा अधिकारी) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## परीक्षा अर्जासाठी 'झिरो चलन' सुविधा उपलब्ध

### – उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

**मुंबई/प्रतिनिधी-** दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, आतापर्यंत तब्बल २ लाख ४० हजार ३६५ विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्काचा एकही रुपया न भरता 'झिरो चलन' सुविधेद्वारे परीक्षा अर्ज दाखल केले आहेत, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे येऊ नयेत, या उद्देशाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, असा शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी सुरळीतपणे व्हावी आणि पात्र विद्यार्थ्यांना सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी संचालनालय, विद्यापीठे आणि परीक्षा विभागाच्या स्तरावर आवश्यक यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे. या प्रक्रियेचा विभागाकडून सातत्याने आढावा घेतला जात आहे.परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागू नये, यासाठी अर्ज प्रक्रियेत 'झिरो चलन' हा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना कोणतेही परीक्षा शुल्क न भरता परीक्षा अर्ज दाखल करता येत आहेत. तसेच, सर्व विद्यापीठांनी परीक्षा शुल्कमाफीच्या अंमलबजावणीसंदर्भात परिपत्रके जारी केली आहेत.दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी परीक्षा शुल्क भरले आहे, त्यांना भरलेले शुल्क परत करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त भागातील कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षा शुल्कमाफीच्या लाभापासून वंचित राहू नये, तसेच विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ घेताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सर्व विद्यापीठांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

## रामदास कदम क्रॅक जॅक संघटना

**जालना/प्रतिनिधी-** मनोज जरांगे पाटील यांनी काल एक क्लिप ऐकवून महाराष्ट्रात खळबळ उडवून दिली आहे. एकनाथ शिंदेंनी जरांगेंना देण्यासाठी भाजपकडून ५०० कोटी रुपये घेतल्याचा या क्लिपमध्ये उल्लेख आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. शिंदे गटाने या क्लिपची चौकशी करण्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या क्लिपची चौकशी करणार असल्याचे म्हटले आहे. या सर्व घडामोडी घडत असतानाच शिवसेना नेते रामदास कदम यांनी उपस्थित केलेल्या काही प्रश्नांवरती मनोज जरांगेंनी संताप व्यक्त केला.रामदास कदम क्रॅक जॅक संघटना आहे. मी भिंती उभी करत नाही, हाच मराठ्यांमध्ये शिंदे विषयी गैरसमज जावा, शिंदे साहेबांना डॅमेज करावा हे स्वत: तो करत आहे. शंभर टक्के त्याला (रामदास कदम) एकनाथ शिंदे यांनी बोलायला सांगितले नाही. राज्यात आमच्या विरोधात आमच्या राहून बरेच फोटो काढलेले दिसत आहेत. तू फोटोग्राफर होतास का असा सवालही जरांगेंनी कदमांना केला आहे, तर संजय राऊत तरी बरा आहे. हे (रामदास कदम) खूपच वेड आहे. संजय राऊत एकदाच सकाळी बोलतो. संजय राऊत इमानदार आहे, जेल भोगली पण मागे हटला नाही, असेही पुढे मनोज जरांगेंनी म्हटले आहे.



शिंदे सेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी जरांगे यांच्या ऑडिओ क्लीपच्या टायमिंगवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. याबाबत मनोज जरांगे पाटील यांनी रामदास कदम यांच्याविषयी नवा सवाल उपस्थित केला आहे. तर आता पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेत मनोज जरांगे यांनी रामदास कदमांवर हल्लाबोल केला आहे.

तूच बाटली पिऊन बघ कशाची बाटली आहे तुला कळेलं

मनोज जरांगे पाटील यांच्यावर शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी मोठा आरोप केला होता, मनोज जरांगे पाटील आंदोलनामध्ये झोपण्यासाठी कप सिरप घेतात, झोपण्यासाठी जरांगे पाटील या सिरपचा सेवन करत होते, असं म्हणत रामदास कदम यांनी पत्रकार परिषदेत फोटो दाखवले होते, त्यावरती बोलताना जरांगे म्हणाले, तूच बाटली पिऊन बघ कशाची बाटली आहे तुला कळेलं. तुझ्याकडेच बार आहेत, तुला त्याची चव कळते, एकेरी भाषेत बोलत जरांगेंनी रामदास कदमांना डिवचलं आहे. तर हा शिवसेना संपवायला निघाला आहे, असंही पुढे जरांगेंनी म्हटले आहे.

**तू शिंदे साहेबांना संपवू नको**

मनोज जरांगे म्हणाले, आम्ही तुम्हाला विचारत आहोत तारीख कशी तुम्हाला माहिती झाली? ते देवेंद्र फडणवीस बघतील. तुम्हाला तारीख कशी माहिती झाली, ती क्लिप व्हायरल कशी झाली हे फडणवीसांना विचारा. मीडियावर धमकी देऊ नका, डोक्यात जाऊ नका. तू शिंदे साहेबांना संपवू नको, ती तारीख तूच सांगितली, का तूच आमचे लोक फोडले, तू मोघम बोलायला सुरू केलं तर मी देखील सुरू करणार. चिल्लर माणसासारखा वागायला लागला, असेही पुढे मनोज जरांगे यांनी रामदार कदम यांना उद्देशून म्हटलं आहे. तर महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत, जरांगे सुपारी घेऊन काम करत असल्याचे योगेश कदमांनी म्हटले, त्यावर उत्तर देताना मनोज जरांगे म्हणाले की, तुझ्या म्हाता-याने काय केले, तो कोणाची सुपारी घेतो तुझ्या घरीच सुपारी आहे. आम्हाला शिंदेंचा स्वाभिमान होता, म्हणून आम्ही डोक्यावर घेऊन नाचलो,आमच्या सोबत गद्दार कोण होता ते सांग म्हणावं, अशा शब्दात मनोज जरांगेंनी प्रतिक्रिया दिली आहे.

## झोपडपट्टीवासीयांना 'सर्व काही मोफत मिळत आहे आणि त्यांना शहरातील मोक्याच्या भागांमध्येच पुनर्वसन हवं आहे'



**मुंबई/ प्रतिनिधी-** झोपडपट्टीवासीयांना 'सर्व काही मोफत मिळत आहे' आणि त्यांना 'शहरातील मोक्याच्या भागांमध्येच त्यांचे पुनर्वसन हवे आहे.' मात्र, शहर स्वच्छ ठेवणे हे त्यांचेही समान नागरी कर्तव्य आहे, हे ते विसरतात. अशा शब्दात सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या झोपडपट्टी वासियांना उच्च न्यायालयाने सुनावलं. 'झोपडपट्टीवासीय हे शहराच्या एकूण लोकसंख्येचा अविभाज्य भाग असले, तरी इतर नागरिकांच्या स्वच्छ आणि आरोग्यदायी परिसरात राहण्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करण्याचा अधिकार त्यांना नाही,' असंही उच्च न्यायालयाने म्हटलं आहे. रस्त्यावर कचरा फेकणाऱ्या झोपडपट्टी धारकांना मुंबई उच्च न्यायालयाने इशारा दिला आहे. झोपडपट्ट्यांमध्ये साफसफाईसाठी जाणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांची अडवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे उच्च न्यायालयाचे संकेतही दिले आहेत. असं करणाऱ्या रहिवाशांचे पुनर्वसन प्रकल्पातील स्थायी पर्यायी निवासाच्या करारनाम्याचे हक्क जप्त करता येतील का? अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाचने एसआरए प्राधिकरणाला केली आहे. यासंदर्भात भूमिका स्पष्ट करण्याचे प्राधिकरणाला आदेश देण्यात आले आहेत.

**केवळ विवाहासाठी धर्मांतर करता येणार नाही** -दरम्यान, केवळ विवाहासाठी धर्मांतर करता येणार नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटलं आहे. महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम, २०२६ ला आव्हान देणारी याचिका मागे घेण्यात आली आहे. तथापि, आवश्यक तथ्यांसह नव्याने याचिका दाखल करण्याची मुभा देण्यात आली आहे. कायद्याच्या घटनात्मक वैधतेला ठाण्यातील ७० वर्षीय मुस्लिम धर्मोपदेशकाने आव्हान दिले होते. याचिकेत ठोस तथ्यांचा अभाव असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना सांगितले की, प्रत्येक व्यक्तीला धर्म बदलण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र, केवळ विवाहासाठी धर्मांतर करता येणार नाही, असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले. खंडपीठाने सांगितले की, बळजबरीने किंवा दबावाखाली होणाऱ्या धर्मांतरांना आळा घालणे हा कायद्याचा उद्देश आहे.

## बारामती मतदानादरम्यान पैसे वाटपाचा व्हिडिओ ठाकरेंच्या शिवसेनेनं केला शेअर

**पुणे :** बारामतीतील एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत



आहे. हा व्हिडिओ पुणे पदवीधर किंवा शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर व्हायरल होत असून, यामध्ये बारामती नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षांचे पती योगेश नाळे हे पैसे मोजत आणि वाटत असल्याचा आरोप केला जात आहे. या व्हिडिओमध्ये एक व्यक्ती ५०० च्या नोटांच्या गड्डयांमधून काही नोटा काढून दुसऱ्या व्यक्तीला देताना स्पष्टपणे दिसत आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या मतदानादिवशी हा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला असून, बारामतीमध्ये राष्ट्रवादीचे पदाधिकारी भाजपच्या उमेदवारासाठी पैसे वाटप करत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने केला आहे. यासंदर्भात शिवसेनेने आक्षेप घेत त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. बारामतीतील ठाकरेंच्या शिवसेनेचे तालुका प्रमुख निखिल देवकाते यांनी या व्हायरल व्हिडिओबाबत बोलताना सांगितले की, 'आज शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची जी निवडणूक होत आहे, त्या निवडणुकीमध्ये आमचे सुनील मोदी हे पदवीधरचे उमेदवार आहेत. त्यांचे लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही शिवसैनिक सगळे इथे एकत्र आलो होतो. तर याच ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी, जबाबदार पदाधिकारी यांचे पती इथे पैसे वाटताना आम्हाला आढळून आले.

## सौरव दास आणि आशुतोष रांका मागील नोटीसवर गैरहजर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** दिल्ली पोलिसांची गुन्हे शाखा कॉकरोच पार्टीचे नेते सौरभ दास आणि आशुतोष रांका यांना चौकशीसाठी पुन्हा नोटीस बजावू शकते. पोलिसांनी यापूर्वी त्यांना चौकशीसाठी बोलावले होते, परंतु ते हजर झाले नाहीत. त्यांनी अधिक वेळ मागितला आहे. दिल्लीतील विशेष कार्यकारी दंडाधिकारी (एसईएम) न्यायालयाने बुधवारी




दोन्ही नेत्यांना जामीन मंजूर केला. प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या जामीनपत्रावर त्यांची सुटका करण्यात आली. १३ ऑक्टोबर रोजी जंतर मंतर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले होते. दिल्ली उच्च न्यायालय आज 'आयसा'च्या अध्यक्षा नेहा बोरा यांनी दाखल केलेल्या याचिकेवरही आपला निकाल देणार आहे. बोरा यांनी दिल्ली पोलिसांच्या नोटीसला आव्हान दिले आहे, ज्यानुसार त्यांना १० हजार रुपयांचा वैयक्तिक जामीन आणि तपासादरम्यान शांतता राखण्यासाठी एका हमीदाराची आवश्यकता होती.

## LAC वर भारत आणि चीन यांच्यात संघर्ष, ITBP डीजींकडून मोठा खुलासा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भारत आणि चीन यांच्यात तणाव कायम आहे. आयटीबीपीचे डीजी शत्रुजीत कपूर यांनी या संदर्भात एक महत्त्वपूर्ण खुलासा केला आहे. त्यांनी सांगितले की, अरुणाचल प्रदेशच्या सीमेवर अनेक वेळा



आमनेसामने आले आहेत आणि ते अजूनही सुरू आहेत. यापूर्वी डोकलाममध्ये भारत आणि चीन यांच्यात संघर्ष झाला होता. कॉंग्रेसने या मुद्द्यावरून केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. कॉंग्रेस नेते जयराम रमेश यांनी ट्विटरवर एक पोस्ट शेअर केली आहे. एका कार्यक्रमात आयटीबीपीचे डीजी शत्रुजीत कपूर म्हणाले, 'अरुणाचल प्रदेशमध्ये अशा परिस्थिती निर्माण झाल्या आहेत, ज्या अजूनही सुरू आहेत. आमचे शौर्य कमांडो पथक तिथे आहेत; त्यांनी उत्तम काम केले आहे. हा एक नवीन उपक्रमही होता. आपल्याला माहीत आहे की, आयटीबीपीची सुरुवात एक पर्वतीय गनिमी दल म्हणून झाली होती. त्यानंतर, आम्ही एक पारंपरिक दल म्हणून चीनची सीमा हाताळली. आता, गनिमी युद्धाची गरज नाही, परंतु आम्हाला स्वतःला एक उंच प्रदेशातील दल म्हणून स्थापित करावे लागेल.' जयराम रमेश यांनी ट्विटरवर लिहिले की, 'जे स्वतःला जागतिक नेते म्हणतात, त्यांनी चीनला मोकळीक दिली आहे. अरुणाचल प्रदेशात चिनी सैन्यासोबत झालेल्या अलीकडील संघर्षात आयटीबीपीच्या डीजींनी आपल्या सैनिकांच्या कामगिरीचे योग्य कौतुक केले आहे. मात्र, पंतप्रधानांनी या संपूर्ण प्रकरणावर मौन बाळगले आहे. हे आश्चर्यकारक आहे.' २०१७ मध्ये भारत आणि चीन बराच काळ तणावपूर्ण परिस्थितीत होते.

देशाच्या आर्थिक विकासासाठी ऊर्जा सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. देशाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने ज्या ऊर्जास्त्रोतावर अवलंबून आहे, ते म्हणजे खनिज तेल. देशाला लागणाऱ्या एकूण खनिज तेलापैकी ८० टक्के आयातीतून येते. यासाठी देशाला रशिया व पश्चिम आशियातील खाडी देशांवर अवलंबून राहावे लागते. सध्याच्या स्थितीत अमेरिका, इस्त्रायल-इराण संघर्षामुळे या देशांतून तेलाच्या आयातीला मोठा धक्का बसला आहे.होर्मुझच्या खाडीतून तेल येणे जवळजवळ बंद झाले आहे. भारत आपली गरज रशियामधून तेल आयात करून भागवत आहे; पण रशियावर युक्रेनने केलेल्या प्रभावी ड्रोन हल्ल्यांमुळे तेथील तेलाची उत्पादन क्षमता निम्म्यांहून अधिक घटली आहे. त्यात रशियातून तेल आयात करण्यावर अमेरिकेने भारतावर शंभर टक्के टेरिफ लावण्याची धमकी दिली होती. आता अमेरिकेनेच रशियाशी खनिज तेल आयातीचा करार केला आहे. त्यामुळे सध्या तरी रशियाकडून तेल आयात करणाऱ्या देशांच्या विरोधात संभाव्य टेरिफला अमेरिकेने दोन महिन्यांची स्थगिती दिली आहे. पुढे काय होईल, हे निश्चित नाही.अशा प्रकारे आता खनिज तेलाचा एक प्रभावी शस्त्र म्हणून अमेरिका वापर करू इच्छित आहे. अशी दोलायनमान स्थिती भारतासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या देशाला अजिबात परवडणारी नाही. आंतरराष्ट्रीय युद्धे, तेलाच्या किमतींमधील चढ़ उतार, समुद्री मार्गांवरील तणाव आणि जागतिक राजकीय संघर्ष यांचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर कसा परिणाम होऊ शकतो, याचे हे एक उदाहरण आहे. भारताची लोकसंख्या मोठी असून ऊर्जेची मागणी सातत्याने वाढत आहे. त्याच वेळी कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू यांसारख्या इंधनांसाठी भारताला मोठ्या प्रमाणावर परदेशांवर अवलंबून राहावे लागणे देशाच्या दीर्घकाळ हिताचे नाही. त्यामुळे ऊर्जेचे पुरेसे उत्पादन, विविध देशांकडून सुरक्षित आयात, स्वदेशी तंत्रज्ञान आणि अक्षय ऊर्जेचा विस्तार या सर्वांचा समन्वय साधणे व खनिज तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करणे गरजेचे आहे. सध्या भारताच्या ऊर्जा सुरक्षेतील सर्वांत मोठ्या आव्हानांपैकी एक म्हणजे परदेशातून होणारी कच्च्या तेलाची आयात, हे आहे. त्यासाठी भारताला बहुआयामी ऊर्जाधोरण स्वीकारून त्याची तातडीने अंमलबजावणी करावी लागणार आहे.

# संपादकीय

## प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## ऊर्जा सुरक्षेला बळकटी?

इलेक्ट्रिक कार, बस आणि दुचाकींचा वापर वाढवणे, रेल्वे आणि सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करणे, मालवाहतुकीसाठी रेल्वे आणि जलमार्गाचा वापर वाढवणे, इथेनॉलमिश्रित पेट्रोल आणि शाश्वत जैवइंधनाचा योग्य विस्तार करणे, देशांतर्गत तेल आणि नैसर्गिक वायूच्या शोधासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरणे, असे उपाय आहेत. इलेक्ट्रिक वाहने आणि जैव इंधन यांचा विस्तार करताना वीजनिर्मिती, बॅटरी उत्पादन, पाणी आणि जमिनीच्या वापराचाही विचार करावा लागेल. पारंपरिक ऊर्जास्त्रोताबरोबरच अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांच्या विकासावर वेगाने भर द्यावा लागणार आहे. देशात सौर आणि पवन ऊर्जा, जैव ऊर्जा, लघु जलविद्युत प्रकल्प, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा साठवण तंत्रज्ञान यांमुळे भारताला ऊर्जा स्वावलंबनाबरोबरच रोजगारनिर्मिती, विकास आणि पर्यावरण संरक्षण साध्य करणे शक्य होणार आहे. सध्या देशात अपारंपरिक स्त्रोतातून मिळणारी वीज २९९.२५ गिगावॉट इतकी आहे. ती २०३० पर्यंत ५०० गिगावॉटपर्यंत वाढवण्याचे सरकारचे धोरण आहे. त्यासाठी पावले वेगाने उचलावी लागणार आहेत. वर्षातील दहा महिने स्वच्छ सूर्यप्रकाश उपलब्ध असलेल्या या देशात शेतकऱ्यांसाठी सौरपंप आणि सौरऊर्जेवर चालणाऱ्या कृषी योजना वाढवणे, तसेच औद्योगिक क्षेत्रांमध्ये सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्प उभारावे लागतील. या क्षेत्रात मोठा वाव असल्याने सौरपॅनेल आणि पवनचक्क्यांसाठी लागणारे सुटे भाग भारतातच तयार करण्यावर भर द्यावा लागेल. सध्या भारत त्यासाठी प्रामुख्याने आयातीवर अवलंबून आहे.याशिवाय हरित हायड्रोजन आणि जैव इंधनाचा विकास करण्याकडेही लक्ष द्यावे लागणार आहे. पोलाद, खतनिर्मिती, रसायने व काही अवजड वाहतूक क्षेत्रासाठी हरित हायड्रोजन उपयुक्त ठरू शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे.त्यासाठी पायाभूत सुविधांचा विस्तार करावा लागेल, शेतीतीत अवशेष, सेंद्रीय कचरा आणि सांडपाण्यापासून बायोगॅस तयार करता येतो. प्रत्येक शहरात व गावात असे प्रकल्प उभारून ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण शहर किंवा गाव ही संकल्पना प्रभावीपणे राबवण्याची गरज आहे. अपारंपरिक ऊर्जाक्षेत्र केवळ पर्यावरणपूरक पर्याय नसून, भारताच्या आर्थिक आणि सामरिक सुरक्षेसाठी महत्त्वाचे ठरणारे आहे. युद्ध, नैसर्गिक आपत्ती किंवा आंतरराष्ट्रीय पुरवठा खंडित झाल्यास देशात इंधन उपलब्ध राहणे आवश्यक आहे. यासाठी सामरिक पेट्रोलियम साठे महत्त्वाचे आहेत. भारताच्या विशाखापट्टणम, मंगळुरू आणि पादूर येथे एकूण ५.३३ दशलक्ष मेट्रिक टन कच्च्या तेलाची सामरिक साठवण क्षमता उभारण्यात आली आहे. चांदीखोल आणि पादूर येथे आणखी ६.५ दशलक्ष मेट्रिक टन क्षमतेच्या सुविधांना आधीच मंजुरी देण्यात आली आहे. नवीन सामरिक साठे नियोजित वेळेत पूर्ण करणे, साठ्यांमध्ये प्रत्यक्ष उपलब्ध असलेल्या तेलाचे प्रमाण वाढवणे, तेलाबरोबरच एलपीजी आणि नैसर्गिक वायूच्या आपत्कालीन साठवणुकीची व्यवस्था सुधारणे, संकटकाळात इंधनाचे वितरण सुरळीत ठेवण्यासाठी राष्ट्रीय आपत्कालीन आराखडा तयार ठेवणे आवश्यक ठरणार आहे. युद्ध, नैसर्गिक आपत्ती किंवा आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीत व्यत्यय निर्माण झाल्यास देशात इंधनाचा पुरवठा अखंडित राहणे अत्यंत आवश्यक आहे. सामरिक इंधनसाठ्यांचा विस्तार, त्यांचे योग्य व्यवस्थापन आणि सक्षम आपत्कालीन वितरण व्यवस्था, यामुळे भारताला जागतिक संकटांचा सामना अधिक प्रभावीपणे करता येईल. स्वच्छ ऊर्जा उत्पादन, तेलाच्या आयातीचे विविधीकरण, पुरेसा आपत्कालीन साठा देशांतर्गत तंत्रज्ञान आणि ऊर्जा बचतीचे प्रभावी उपाय, यांमुळेच देशाची दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा बळकट होणार आहे.

# दुष्काळातही शेतकऱ्यांवर अन्याय!

**दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पाच हजार रुपये अग्रिम मदतीची घोषणा सरकारने केली आहे. मात्र त्याच वेळी राज्यात सुमारे ९१ लाख शेतकऱ्यांचे नमो शेतकरी महासन्मान निधीचे दोन हप्ते थकविण्यात आले आहेत. लाडक्या बहिणीचे हप्तेही अनेक महिन्यांपासून दिले नाहीत.**

**पा**वसाने दगा दिला, पिके करपली, शेतीत ओतलेला पैसा मातीत गेला. डोक्यावर कर्ज, घरखर्च, मुलांचे शिक्षण आणि जनावरांच्या चाऱ्याची चिंता घेऊन महाराष्ट्रातील शेतकरी संकटात सापडला. या पार्श्वभूमीवर राज्यातील ३५८ पैकी ३०५ तालुके 'दुष्काळग्रस्त' घोषित केले आहेत. या तालुक्यांमध्ये दिवाळीपूर्वी प्रत्येक शेतकऱ्याला पाच हजार रुपये अग्रिम मदत देण्याची घोषणा सरकारने केली. पण एवढ्या मोठ्या संकटावर पाच हजार रुपयांनी कशी मात होणार हा प्रश्न आहे.

दुष्काळाची शक्यता सरकारसाठी अनपेक्षित नव्हती. भारतीय हवामान विभागाने २९ मे २०२६ रोजीच मॉन्सूनचा पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला होता. पाऊस सरासरीपेक्षा कमी किंवा अपुरा राहण्याची ८४ टक्के शक्यता व्यक्त करण्यात आली होती. एल निनोच्या संभाव्य परिणामांकडेही लक्ष वेधण्यात आले होते. संकटाची चाहूल आधीपासून असतानाही दुष्काळाचा सामना करण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद, पाण्याचे नियोजन, चारा, रोजगार आणि नुकसानभरपाईची व्यवस्था वेळेत करण्यात आली नाही. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्यात आले.

### हा कसला न्याय?

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पाच हजार रुपये अग्रिम मदतीची सरकारने घोषणा केली आहे. मात्र दुसऱ्या बाजूला ३१ जुलै २०२६ च्या बातमीनुसार, राज्यात सुमारे ९१ लाख शेतकऱ्यांचे नमो शेतकरी महासन्मान निधीचे दोन हप्ते थकविण्यात आले आहेत. प्रत्येक शेतकऱ्याचे चार हजार रुपये, यानुसार ही रक्कम सुमारे ३,७०० कोटी रुपये होते. एकीकडे शेतकऱ्याचे हे चार हजार रुपये थकवायचे आणि नंतर पाच हजारांची मदत जाहीर करून दिलासा दिल्याचा दावा करायचा, हा कसला न्याय आहे? आपली चलाखी शेतकऱ्यांना समजत नाही असे सरकारला वाटते आहे का? सरकारने या भ्रमातून बाहेर येण्याची आवश्यकता आहे. राज्यात लाडकी



बहीण योजनेतून सुमारे ९२ लाख लाभार्थी वगळण्यात आले आहेत.

त्यापैकी जवळपास ६२ लाख महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली नव्हती, हे कारण सांगण्यात आले आहे. दरमहा रुपये १,५०० या दराने ९२ लाख महिलांच्या एका महिन्याच्या मानधनाचे मूल्य रुपये १,३८० कोटी होते. महिलांचे हे मानधन अनेक महिने थकवण्यात आले आहे. ही थकबाकी मोठी आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाच हजार रुपये देण्याचे श्रेय घेताना, केवायसी बंद करून श्रमिक महिलांचे हे पैसे का थकविण्यात आले आहेत,

हा प्रश्न महिला शेतकरी विचारत आहेत. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राज्य सरकारने मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर केला आहे. विविध विकासकामांसाठी हजारो कोटी रुपयांच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. एकीकडे कुंभमेळ्यासाठी कोट्यावधी खर्च केला जात असताना शेतकऱ्यांसाठी मात्र हात आखडता घेतला जात आहे. राज्यभर दुष्काळाने पाण्याअभावी पिके जळत असताना कुंभमेळ्यासाठी पाणी राखीव केले जात आहे.

### नियमित कर्जदार

शेतकऱ्यांच्या प्रचंड आंदोलना नंतर २ जून २०२६ रोजी जाहीर झालेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेत थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची तरतूद करण्यात आली. मात्र, यावेळीही नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी केवळ रुपये ५० हजार प्रोत्साहन अनुदान जाहीर करण्यात आले. वेळेवर कर्ज फेडणे हा शेतकऱ्याचा गुन्हा आहे काय? कर्जाचे हप्ते भरण्यासाठी शेतकरी काटकसर करतो, प्रसंगी दागिने गहाण ठेवतो, मजुरी करतो; तरी त्याच्या वाट्याला केवळ ५० हजार रुपये येणार असतील तर यातून नियमित कर्ज फेडण्याची शेतकऱ्यांची इच्छाच संपून जाईल. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारने हा अन्याय दूर करण्याची आवश्यकता आहे. शिवाय आजवरच्या कर्जमाफीमधून वंचित राहिलेल्यांनाही न्याय देण्याची आवश्यकता आहे.

### नुकसान भरपाई

पीकविमा योजनेतील मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थिती आणि स्थानिक नैसर्गिक आपत्तीच्या तरतुदी वगळल्यामुळे पात्र शेतकऱ्यांना हंगामातच अग्रिम भरपाई मिळण्याची संधी नष्ट झाली. 'एनडीआरएफ'च्या निकषांनुसार मिळणारी मदत प्रत्यक्ष उत्पादनखर्च आणि उत्पन्नातील नुकसान भरून काढण्यास पुरेशी नाही. या निकषानुसार मुळात पीक नुकसानीची भरपाई देण्याची तरतूदच नसते. पुढील हंगामात पिके उभी करण्यासाठी लागणारी बियाणे, खते इत्यादी खरेदी करण्यासाठी या अंतर्गत शेतकऱ्यांना कोरडवाहू पिकांसाठी हेक्टरी आठ हजार ५०० रुपये, बागायती पिकांसाठी १७ हजार आणि बहुवर्षीय पिके किंवा फळबागांसाठी २२ हजार ५०० रुपये मदत दिली जाते. एकूण नुकसानीच्या तुलनेत ही मदत अत्यंत किरकोळ असते. पीकविमा कंपन्यांना हप्ता ठरविताना त्या त्या पिकाच्या उत्पादनानुसार प्रति हेक्टर रक्कम निश्चित करून त्या पीक संरक्षित रकमेनुसार विमा हप्ता निश्चित केला जातो. किमान या पीक संरक्षित रकमेइतकी तरी भरपाई शेतकऱ्यांना दिली पाहिजे. मात्र असे होताना दिसत नाही.

### दुष्काळी उपाययोजना

दुष्काळ म्हणजे केवळ पिकांचे नुकसान नव्हे. जनावरांसाठी चारा नाही, पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे, हाताला काम नाही आणि कुटुंबाच्या आजारपणाचा व मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवणे कठीण झाले आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागांत चारा छावण्या आणि पाणीपुरवठ्याची व्यवस्था, आरोग्य सुविधा, रोजगार हमीची कामे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती, आवश्यक आहेत. अखिल भारतीय किसान सभा या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात २१ ऑक्टोबरपासून महामुक्काम सत्याग्रह करत आहे.

२६ ऑक्टोबर रोजी अकोले येथून मुख्यमंत्री निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्याकडे भव्य वाहन जत्था काढण्यात येणार आहे. इतर शेतकरी नेते, विरोधी पक्षाचे नेते व संघटनाही शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी लढत आहेत. नमो शेतकरी योजनेचे थकीत हप्ते, नियमित कर्जदारांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान, पीकविम्याच्या संरक्षित रकमेइतकी नुकसान भरपाई, पात्र महिलांचे थकीत मानधन आणि दुष्काळग्रस्तांसाठी सर्वंकष उपाययोजना या मागण्यांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करीत आहेत. सरकारने कुंभमेळ्यासाठी खर्चाचे आणि पाण्याचे नियोजन करताना शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण जनतेच्या गरजांना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे.

**डॉ. अजित नवले**

(लेखक अखिल भारतीय किसान सभेचे केंद्रीय सहसचिव आहेत.)

## जागतिक भूक निर्देशांकात भारत १०० व्या स्थानी

२०२६ चा जागतिक भूक निर्देशांक नुकताच प्रसिद्ध झाला आहे.एकूण १२२ देशांच्या निर्देशांकात भारत १०० व्या स्थानी आहे.भारताचा समावेश गंभीर भूक स्थिती असलेल्या श्रेणीत झाला आहे . विशेष बाब म्हणजे पाच वर्षाखाली जवळपास पाच मुलांपैकी एका मुलाचे उंचीच्या तुलनेत वजन कमी आहे.देशातील ९.८ लोकसंख्या कुपोषित आहे.पाच वर्षाखालील २९.३ मुलांची उंची वयानुसार कमी आहे.१९ टक्के मुलांचे वजन उंचीच्या प्रमाणात नाही.मृत्यूचा विचार करता पाच वर्षाखालील बालमृत्यूचे प्रमाण २.७ टक्के आहे.ही बातमी नुकतीच वाचण्यात आली . जागतिक भूक निर्देशांक जर्मनीतील वेल्लथुंग राहिलपे , कन्सर्न वल्ड वाईड आणि आंतरराष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कायदा शांतता व सशस्त्र संघर्ष संस्थेच्या सहकार्याने प्रसिद्ध केला जातो ही आकडेवारी पाहिल्यास भारताला अजून भूकेबाबत खूपच प्रगती करावयास हवी आहे.अलीकडे भारताची गरिबी काही प्रमाणात कमी झाल्याच्या बातम्या येत होत्या.पण याबरोबरच कुपोषणाची सुद्धा समस्या गंभीर आहे हे जाणवते . सरकारने अशा कुपोषण बालकांच्या बाबतीत काही तरी योजना करावयास हव्यात.आजची मुले ही उद्याचे भारताचे नागरिक होणार आहेत . भारत गरिबीखालील लोकांना मोफत अन्नधान्य वाटप करते आहे.असे असूनही कुपोषणाची समस्या का निर्माण व्हावी?ही बाब विचार करण्यासारखी आहे . कदाचित त्यांना पोषक आहार मिळत नसेल.देशातील प्रत्येक नागरिकाला दोन वेळचे अन्न पोषकरीत्या मिळावयास हवे.नाहीतर आपली साऱ्या प्रगतीला काही अर्थ नाही.

**शांताराम वाघ**

## अमृतवर्षाव करणारी 'कोजागिरी'

आश्विन महिन्यातील पौर्णिमा ही 'कोजागिरी पौर्णिमा' किंवा 'शरद पौर्णिमा' म्हणून सर्वत्र अत्यंत उत्साहात साजरी केली जाते. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वांत जवळ असतो,त्यामुळे तो अत्यंत मोठा, तेजस्वी आणि शीतल दिसतो. हिंदू संस्कृतीत या दिवसाला धार्मिक, आध्यात्मिक आणि आरोग्याच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. श्रीमद्भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी 'नक्षत्रांमध्ये मी चंद्र आहे' असे म्हटले आहे, तर श्रीमद्भागवतानुसार याच रात्री श्रीकृष्णाने व्रजमंडळात रासोत्सव साजरा केला होता.

'कोजागिरी' म्हणजे 'को जागर्ति' अर्थात 'कोण जागे आहे'.पौराणिक कथेनुसार,मध्यरात्री श्रीलक्ष्मी आणि चंद्रदेव पृथ्वीतलावर फेरफटका मारतात आणि जो जागा राहून भक्तीभावात लीन असतो, त्याला धनधान्य व समृद्धीचे वरदान देतात. या दिवशी वातावरणात सकारात्मक ऊर्जा कार्यरत असते, ज्यामुळे आपले मन आणि विचार शुद्ध होण्यास मदत होते.हा उत्सव साजरा करताना संध्याकाळी पाटावर कलश व शंकर-पार्वतीची स्थापना करून मनोभावे पूजा केली जाते. या रात्री शरद ऋतूतील स्वच्छ चांदण्यात केशर-सुकामेवा घालून दूध चांगले आटवले जाते आणि ते काही वेळ थेट चंद्राच्या प्रकाशात ठेवले जाते. चंद्राच्या किरणांमध्ये विशेष औषधी व गुणकारी शक्ती असल्याने हे आटवलेले दूध प्राशन केल्याने शरीरातील पित्त शांत होते, आरोग्याला शीतलता मिळते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते.

**वर्षा आवदे**

# 'जीडीपी'चा फुगलेला फुगा

**दे**शाची जीडीपी १० ट्रिलियन डॉलर्स!फाईन. पण त्यासाठी भांडवल लागणार, भांडवल निर्मिता साठी बचती लागणार;जमिनीवरील वस्तुस्थिती काय आहे? भारताची जीडीपी ३५० लाख कोटी म्हणजे ४ ट्रिलियन्स डॉलर्स आहे.देशाचे राजकीय नेते देशाची जीडीपी २०३० च्या पुढेमागे १० ट्रिलियन्स डॉलर्स करण्याची घोषणा करत असतात.पण कोणत्याही देशाच्या जीडीपीला अशा वेगाने वाढण्यासाठी भांडवल लागते. त्यासाठी त्या अर्थाव्यवस्थेत पर्याप्त वेगाने बचती तयार व्हाव्या लागतात. हे चक्र सतत सुरूच राहावे लागते.

हायपोथेटिकली परकीय देशात तयार झालेल्या बचती वापरता येतात. भारतात देखील त्या येत असतात. भविष्यात येऊ शकतात. पण त्या हक्काच्या नसतात. त्यात प्रचंड अनिश्चितता असते. एवढेच नव्हे तर ते भांडवल पूर्वअटी घालून येते. रुपया डॉलर्सच्या विनिमय दराचे, परकीय चलनाचे प्रश्न तयार होतात. आणि परावलंबन वाढून राजकीय सार्वभौमत्व कमकुवत होते.यापैकी काहीही देशांतर्गत बचतीचे नसते. केवढा फरक आहे बघा. नवउदारमतवादी अर्थतज्ञ सर्व भांडवलाला ॲपल फॉर ॲपल समजतात. त्यांना फरक माहीत नसतो असे नाही. पण जनतेचे राजकीय शिक्षण करायला कचरतात.म्हणून मी त्यांना चालू म्हणतो.म्हणून अमुक ट्रिलियन्स डॉलर्स जीडीपीच्या घोषणांनी भारावून न जाता भारतीय अर्थव्यवस्थेतील बचत दरांची वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे.

२०२४-२५ या वर्षात भारतातील बचत दर जीडीपी च्या २२ टक्के होता. त्यात कुटुंबांनी केलेल्या बचती १५ टक्के;खाजगी कंपन्यांनी केलेल्या बचती १० टक्के आणि सरकारी क्षेत्राने केलेल्या बचती क्षुल्लक होत्या.सर्वच अर्थव्यवस्थेत कुटुंबांनी केलेल्या बचती इंजिन सारख्या असतात. म्हणून त्याची उकल केली पाहिजे.कुटुंबांनी केलेल्या २२ टक्के बचतींपैकी घरे, जमिनी, सोने अशा फिक्सड असेट्स मध्ये १५ टक्के आणि वित्तीय मत्ता / फॅनन्शियल असेट मध्ये ७ टक्के. हा फरक महत्वाचा आहे अशासाठी की अर्थव्यवस्थेतील भांडवल निर्मितीसाठी फायनान्शियल असेट्स मधील बचती अधिक उपयुक्त असतात. कुटुंबांनी केलेल्या बचतीची फोड करण्याची आवश्यकता आहे.




१.खरेतर कुटुंबांनी २०२४-२५ मध्ये केलेल्या एकूण बचती (ग्रॉस )जीडीपीच्या १२ टक्के भरतात.पण त्याच काळात कुटुंबांनी मोठ्या प्रमाणावर कर्जे काढली जी जीडीपीच्या ५ टक्के भरत आहेत. म्हणून नेट बचती १२ वजा ५ म्हणजे ७ टक्के भरतात.

२.देशातील कुटुंबे असा शब्दप्रयोग आपण करत असलो तरी वस्तुस्थिती ही आहे की आर्थिक पिरॅमिडच्या वरच्या थरातील कुटुंबे निव्वळ बचतदार असतात तर बॉटम ऑफ पिरॅमिडमधील कुटुंबे निव्वळ कर्जदार असतात.

३.कुटुंबांनी काढलेल्या कर्जातून घरे,वाहने खरेदी केली जातात.त्यातून देशांतर्गत मागणीला उठाव मिळतो. पण देशातील खालच्या वर्गातील कुटुंबे जगण्यसाठी, कंझम्पशन साठी,आधीची कर्जे फेडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कर्जे काढत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या अंदाजानुसार ती ४५ टाक्यांनी वाढली आहेत.

४.अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून कंझम्पशन वाढले तरी जीडीपीमध्ये भर पडत असते हे खरे.पण कुटुंबांनी उपभोगावर केलेले खर्च स्वअर्जित उत्पन्नातून केलेले आहेत की कर्जे काढून हा महत्वाचा निकष असतो. कर्ज काढून केलेला उपभोग आज ना उद्या खिंडीत अडकणार असतो.थकीत कर्जे वाढून बँकिंग / वित्त प्रणाली धोक्यात येऊ शकते.

५.गरीब / निम्न मध्यमवर्गातील कुटुंबांची उत्पन्ने ज्या वेगाने वाढत आहेत , त्यापेक्षा त्यांनी काढलेली कर्जे अधिक वेगाने वाढत आहेत.

६.वरच्या वर्गातील कुटुंबे फायनान्शियल असेट्स मध्ये गुंतवणुकी करत आहेत हे खरे पण त्यातील खूप मोठा हिस्सा सेकंडरी मार्केट मध्ये शेयस, म्युच्युअल फंड,एसआयपी यामध्ये जात आहे. त्यातून कोणत्याही नवीन उत्पादक मत्ता तयार होत नसतात.

चीनचे उदाहरण दिलेले अनेकांना आवडत नाही. पण शिकायचे असेल तर त्याची आकडेवारी उपयोगी पडत असते.चीनने गेली चार दशके आपली आर्थिक घोडदौड केली ती प्रामुख्याने देशांतर्गत तयार केल्या गेलेल्या बचतीच्या जोरावर. अनेक वर्षे चीनमधील बचतदर जीडीपीच्या ४० टक्क्यांच्या आत बाहेर राहिला आहे. आणि त्या ४० टाक्यांमधील जवळपास ३० टक्के या कुटुंबांनी केलेल्या बचती असतात. हे केव्हा ज्यावेळी चीनची जीडीपी भारताच्या जीडीपीच्या पाच पट जास्त आहे.

लक्षात घ्या. चीनने देखील परकीय भांडवलाचा वापर केला. पण त्यावर अवलंबित्व ठेवले नाही. दहा ट्रिलियन्स डॉलर्सचे आकडे बघायला,ऐकायला आकर्षक आहेत.पण ते साध्य करण्यासाठी देशांतर्गत बचतीचा पाया मोठा, व्यापक,आणि शाश्वत हवा. हे तेव्हाच होऊ शकते ज्यावेळी फक्त अल्पसंख्य नाही बहुसंख्य कुटुंबांच्या हातात बऱ्यापैकी उत्पन्न मिळवून देणारी रोजगार,स्वयंरोजगार, शेती/ जमिनिआधारित साधने देतील.

देशाचे आर्थिक मॉडेल सर्वसमावेशक, ग्हम्त्लेग्न हवे यात डावे तत्वज्ञान काही नाही.पाया व्यापक आणि खोल असेल तर त्यावर इमारत उंच बांधता येते. बाह्य हादरे बसले तरी इमारत शाबूत राहते असे ते कॉमन सेनसिकल आहे. मुख्य म्हणजे आजच्या युगात सार्वभौमत्व टिकवण्यासाठी अत्यंतिक आवश्यक.वरील विवेचनात काही नवीन शोध नाही लावलेला. सर्वांना सर्व माहिती आहे. काय कमी पडत असेल?

**संजीव चांदोरकर**

शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# दुष्काळात शेतकऱ्यांना 5 हजारांची मदत म्हणजे जखमेवर मीठ!

## हेक्टरी एक लाख रुपये द्या,काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते हनुमंत पवार यांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २३ :** महाराष्ट्रात दुष्काळाचे संकट गडद होत असताना शेतकऱ्यांना दिवाळीनिमित्त ५ हजार रुपयांची मदत जाहीर करून सरकारने त्यांच्या नुकसानीची बोळवण करू नये. शेतीच्या वाढत्या खर्चाच्या तुलनेत ही मदत अत्यंत तुटपुंजी असून, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणींची जाणीव सरकारला आहे की नाही, असा सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते हनुमंत पवार यांनी उपस्थित केला.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर किमान एक लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली. शुक्रवारी सकाळी यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत पवार यांनी राज्य सरकारच्या मदतीच्या घोषणेवर टीका केली. शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पक्ष निरीक्षक म्हणून यवतमाळ येथे आले असताना त्यांनी विविध मुद्द्यांवर सरकारला धारेवर धरले. सरकारने पाच हजार रुपयांची मदत जाहीर केली असली, तरी प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना तिचा लाभ मिळणार, याबाबत स्पष्टता नसल्याचा आरोप पवार यांनी केला. मुख्यमंत्री यांनी चॉकलेटच्या डब्याची किंमत साडेसहा हजार रुपये असल्याचे कथित विधान केल्याचा उल्लेख करत त्यांनी सरकारच्या मदतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. चॉकलेटच्या डब्याची किंमत पाच हजार रुपयांपेक्षा अधिक असेल, तर नैसर्गिक संकटामुळे आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांत नेमका दिलासा कसा मिळणार, असा सवाल त्यांनी केला. गतवर्षी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या भरपाईसाठी मुख्यमंत्र्यांनी ३१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात केवळ आठ हजार कोटी रुपये खर्च झाल्याचा दावा पवार यांनी केला. घोषणांचा आकडा मोठा असला, तरी प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांपर्यंत किती पोहोचली, याचा हिशेब सरकारने द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. राज्यात डबल इंजिन सरकार असल्याचा दावा केला जात असताना केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळाली नसल्याचा आरोपही त्यांनी केला. केंद्रीय पथकाने महाराष्ट्राचा दौरा केला, मग शेतकऱ्यांच्या पदरात मदत कधी पडणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक, शशांक येन्डे, कुणाल जतकर यांच्यासह पक्षाचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.



### पीकविमा कंपनीला अभय का?

**पंतप्रधान पीकविमा योजनेअंतर्गत संबंधित विमा कंपनीला हजारो कोटी रुपयांचा प्रीमियम मिळाल्याचे सांगत पवार यांनी पीक नुकसानीच्या पंचनाम्यांच्या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले. नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे अद्याप सुरू झाले नसल्याचा आरोप करत संबंधित विमा कंपनीवर सरकार कारवाई करणार की या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणार, असा सवाल त्यांनी केला.**

### कंत्राटदारांची थकबाकी ९६ हजार कोटींची?

**राज्यात मागील तीन महिन्यांत देयके न मिळाल्यामुळे २१ सरकारी कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याचा दावा पवार यांनी केला. सरकारकडे कंत्राटदारांची सुमारे ९६ हजार कोटी रुपयांची देयके थकीत असल्याचेही त्यांनी सांगितले. निधी उपलब्ध नसताना कंत्राटदारांना कामे देऊन त्यांना आर्थिक संकटात का ढकलले, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.**
**दरम्यान, मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्याशी संबंधित समोर आलेल्या कथित ऑडिओ क्लिपची सखोल चौकशी करण्याची मागणीही पवार यांनी केली.**

### लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी?

**लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना सध्याच्या १,५०० रुपयांऐवजी २,१०० रुपये देण्याची मागणीही पवार यांनी केली. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या टास्क फोर्सच्या कामकाजावर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याचा दावा करत या समितीचा अहवाल सार्वजनिक का करण्यात आला नाही, अशी विचारणा त्यांनी केली.**

# कापूस,तुरीच्या पिका आड गांजाची लागवड, १२७ झाडे जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी, दि. २३ :** कापूस आणि तुरीच्या पिकांमध्ये गांजाची लागवड केल्याचा प्रकार मौजा कायर शिवारात उघडकीस आला आहे. शिरपूर पोलिसांनी केलेल्या कारवाईत गांजाची १२७ झाडे जप्त केली असून, या प्रकरणी सैदाबाद येथील सुखदेव लेतु आत्राम (वय ५०) याला ताब्यात घेतले आहे.

शिरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेदरम्यान पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार,कायर शिवारातील एका शेतात कापूस आणि तुरीच्या पिकांमध्ये गांजाची लागवड करण्यात आल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी पंचांच्या उपस्थितीत शेताची तपासणी केली असता गांजाची १२७ झाडे आढळून आली. या कारवाईत एकूण १८ किलो ५८० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला. त्याची किंमत १ लाख ८५ हजार ८०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणात गांजाची लागवड आणि संभाव्य विक्रीसंदर्भात पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता,अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि वणीचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.शिरपूरचे ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक संतोष मनवर, पोलीस उपनिरीक्षक धीरज गुल्हाणे यांच्यासह पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड यांनी कारवाईत सहभाग घेतला.दरम्यान,परिसरात गांजाची लागवड,विक्री किंवा इतर अंमली पदार्थांचे अवैध व्यवहार आढळल्यास नागरिकांनी पोलिसांना माहिती द्यावी.माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल,असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## थोडक्यात

### शिक्षक मतदार संघासाठी उमरखेड केंद्रावर ९४ टक्के मतदान!



**उमरखेडः** प्रतिनिधी विधान परिषदेच्या अमरावती विभागीय शिक्षक मतदार संघासाठी शनिवारी झालेल्या मतदानात उमरखेड व महागाव तालुक्यात एकंदरीत ९४% मतदान झाल्याची माहिती येथील तहसीलदार राजू सुरडकर यांनी दिली येथील तहसील कार्यालयात मतदान प्रक्रिया पार पडली. उमरखेड व महागाव तालुक्यात एकंदर ६२३मददार होते. त्यापैकी५८३मतदारांनी हक्क बजावला. या निवडणुकीत एकूण २६ उमेदवार निवडणूक रिंगणात असले तरी प्रमुख लढत महायुतीचे किरण सरनाईक, शिक्षक भारतीचे सुरेश देवकर ,महाविकास आघाडी च्या आदिती पोहरे,अपक्ष, श्रीकांत देशपांडे यांचेतच असल्याचे दिसुन आले . उमेदवारांचे भवितव्य मतभेटीत बंद झाले असून अमरावती येथे होणाऱ्या मतमोजणीतून पहिल्या पसंतीचा क्रमांक सर्वाधिक कोणाला मिळाला हे प्रत्यक्ष मतमोजणी दिसून येणार आहे

### शिक्षक मतदारसंघात यवतमाळ मतदानात पिछाडी,मंत्र्यांची प्रतिष्ठा पणाला!

**यवतमाळ :** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत यवतमाळ जिल्ह्यात मतदानाचा टक्का विभागातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत कमी राहिल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. जिल्ह्यातील ६ हजार ९३२ शिक्षक मतदारांसाठी १८ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत मंत्री अशोक उईके, संजय राठोड आणि इंद्रनील नाईक यांची प्रतिष्ठा पणाला लागली असून, मतदारांचा कौल नेमका कोणाच्या बाजूने आहे, याची उत्सुकता वाढली आहे. दुपारी २ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार, यवतमाळ जिल्ह्यात ५९.९१ टक्के मतदान झाले. त्या तुलनेत अमरावती जिल्ह्यात ६३.०९, अकोल्यात ६४.१४, बुलढाण्यात ६२.२५ आणि वाशिममध्ये ६४.०६ टक्के मतदानाची नोंद झाली. संपूर्ण अमरावती विभागात मतदानाची टक्केवारी ६२.५४ इतकी होती. यवतमाळमधील तुलनेने कमी मतदानामुळे शिक्षक मतदारांचा कल कोणत्या उमेदवाराकडे आहे, याबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत. मात्र, केवळ मतदानाच्या टक्केवारीवरून निकालाचा अंदाज बांधणे घाईचे ठरेल. या निवडणुकीत २६ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे. मतदान शांततेत पार पडण्यासाठी केंद्रांवर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. आता २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे सर्वांचे लक्ष लागले असून, शिक्षक मतदारांचा कौल कोणाला तारतो आणि कोणाला धक्का देतो, हे निकालातून स्पष्ट होणार आहे.

### मायक्रो फायनान्स कडून महिलांची लूट, सक्तीच्या वसुलीची चौकशी करा

**महागाव :** तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती असून शेतीचे उत्पन्न नाही, मजुरीचे काम नाहीत. अशा बिकट परिस्थितीत तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर व महिला बचत गटातील महिला मोठ्या आर्थिक संकटात सापडल्या असून मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून होणाऱ्या अव्वाच्या सव्वा व्याज आकारणी व बेकायदेशीर वसुलीची चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधिनीचे संस्थापक अध्यक्ष संदेश गौतम रणवीर यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात रणवीर यांनी म्हटले आहे की, महागाव तालुक्यातील गरजू महिलांना मोबाईल, मोटारसायकल, टी.व्ही., शिलाई मशीन व शेती कामासाठी कर्ज दिले जाते. या कर्जावर मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून अव्वाच्या सव्वा व्याज आकारले जात आहे. हप्ता थकल्यास वसुली कर्मचारी थेट घरासमोर येऊन अपमानास्पद वागणूक देतात, शिवीगाळ करतात व मानसिक त्रास देतात. दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून कर्जबाजारीपणामुळे आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ आली आहे.त्यामुळे दुष्काळी स्थिती लक्षात घेऊन पुढील हंगामापर्यंत कर्जदारांना हप्ते भरण्यास मुदतवाढ द्यावी व व्याज माफी देण्यात यावी. तसेच या गंभीर विषयात तात्काळ लक्ष घालून गरीब शेतकरी व मजुरांना न्याय द्यावा, अशी विनंती या निवेदनात करण्यात आली आहे.

### स्व-प्रमाणीकरणाच्या अडथळ्याने शिक्षक भरतीची संधी हुकली?

**अश्विनी गेडाम यांची उच्च न्यायालयात धाव; राज्य शासनाला नोटीस**

**पांढरकवडा :** शिक्षक भरती प्रक्रियेतील स्व-प्रमाणीकरणाच्या तांत्रिक प्रक्रियेमुळे पात्र उमेदवाराची संधी हुकू शकते का, असा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. अश्विनी विठ्ठल गेडाम यांनी याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली असून, न्यायालयाने राज्य शासनासह संबंधित यंत्रणांना नोटीस बजावली आहे. २७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत उत्तर दाखल करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे. गेडाम यांनी टीईटी २०२२ मध्ये २०० पैकी ९५, तर टीईटी २०२५ मध्ये ८२ गुण मिळविले. मात्र, नव्या शिक्षक भरती प्रक्रियेत निर्धारित मुदतीत स्व-प्रमाणीकरण पूर्ण न झाल्याने पसंतीक्रम नोंदविता आला नाही, असा त्यांचा दावा आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्तांकडे निवेदनही दिले; मात्र दिलासा न मिळाल्याने न्यायालयाचे दार ठोठावले. संविधानातील अनुच्छेद १४ व १६ च्या आधारे समान संधीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. पोर्टलवरील प्रक्रियात्मक त्रुटीमुळे उमेदवाराच्या भविष्यावर परिणाम होणार का, याकडे आता शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

# वणीतील अवैध दारूसाठा प्रकरणाची सखोल चौकशी करा..!

## लढा संघटनेचे निवेदन, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी, दि. २३ :** वणी एमआयडीसी परिसरात १३ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास सुमारे १५ हजार दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्याचे प्रकरण समोर आले आहे. हा दारूसाठा मध्य प्रदेशातून आणल्याची माहिती असून, जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे १२.६३ लाख रुपये असल्याचे निवेदनात नमूद आहे.या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी,अशी मागणी लढा संघटनेचे वणी विधानसभा प्रमुख प्रवीण खानझोडे यांनी केली आहे. यासंदर्भात खानझोडे यांनी उपविभागीय अधिकारी, वणी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यवतमाळ,राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त मुंबई आणि अधीक्षक यवतमाळ यांना १९ ऑक्टोबर रोजी निवेदन दिले आहे. परराज्यातून एवढ्या मोठ्या प्रमाणात दारूसाठा वणी एमआयडीसी परिसरातील गोदामापर्यंत कसा पोहोचला, याची चौकशी करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच अवैध दारू,वाहतूक,साठवणूक आणि वितरणामागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई करावी, असेही म्हटले आहे. या प्रकरणात आर्थिक देवाणघेवाण किंवा लाचखोरीचे पुरावे आढळल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (एसीबी) स्वतंत्र चौकशी करावी. वणी राज्य उत्पादन शुल्क विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर निलंबनासह विभागीय व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय वणी तालुक्यातील सर्व दारू दुकाने,बिअर बार आणि संबंधित गोदामांची विशेष तपासणी मोहीम राबवून निवेदनावर झालेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल देण्याची मागणी संघटनेने केली आहे. निवेदनावर आठ दिवसांत समाधानकारक कार्यवाही सुरू न झाल्यास वणी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयासमोर बेमुदत उपोषण आंदोलन करण्यात येईल,असा इशारा प्रवीण खानझोडे यांनी दिला आहे. अवैध दारू व्यवसायाला कोणत्याही परिस्थितीत संरक्षण मिळू नये आणि या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून प्रशासनाने जनतेचा विश्वास कायम राखावा, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

# किन्ही येथे मोफत रोगनिदान व चिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद!

## पुष्पांजली समाज विकास संस्था व डा. मा.म.आयुर्वेद महाविद्यालयाचा संयुक्त उपक्रम.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २३ :** आर्थिक अडचणींमुळे अनेक रुग्णांना वेळेवर उपचार घेणे शक्य होत नाही. अशा रुग्णांसाठी मोफत आरोग्य शिबिरे दिलासादायक ठरत आहेत. पुष्पांजली समाज विकास संस्था, यवतमाळ आणि डॉ. मा. म. आयुर्वेद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १९ ऑक्टोबर रोजी आर्णी रोडवरील किन्ही येथील आदिशक्ती रेणुका माता मंदिर परिसरात मोफत रोगनिदान व चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचा शेकडो रुग्णांनी लाभ घेतला. शिबिराचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा डॉ. पुष्पलता शरद सप्रे यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्य शल्य चिकित्सक डॉ. जया देवेंद्र घुले यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांना उपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. संजय कपाले, डॉ. आम्रपाली मोरे, डॉ. वैभव बागल आणि डॉ. सेजल वासानी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. शिबिरात मूळव्याध, भगंदर, फिशर, स्तनविकार, त्वचारोग, व्हेरिकोज व्हेन्स, न भरणाऱ्या जखमा, हर्निया, हायड्रोसिल, मुतखडा, मूत्रविकार तसेच शरीरावरील विविध गाठींसह सामान्य शस्त्रक्रियेशी संबंधित आजारांची तपासणी करण्यात आली.केवळ निदान नव्हे, तर पुढील उपचारांची दिशा ठरविण्यात आली तपासणीनंतर रुग्णांना आवश्यक उपचारांबाबत मार्गदर्शन करून पुढील उपचारांसाठी ल.क.आयुर्वेद रुग्णालय, यवतमाळ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. अशा आरोग्य शिबिरांमुळे सर्वसामान्यांना वेळेवर निदान व उपचारांची माहिती मिळण्यास मदत होत आहे.

# माजरी येथे वनराई बंधाऱ्यातून 'पाणी अडवा, पाणी जिरवा'चा संदेश!

## भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जलसंधारणाची गरज

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**घाटंजी, दि. २३ :** घाटंजी तालुक्यातील माजरी येथे वनराई बंधाऱ्याच्या माध्यमातून 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा महत्त्वपूर्ण संदेश देत जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

दिवसेंदिवस जाणवू लागलेल्या दुष्काळाच्या झळा आणि भविष्यात उद्भवणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता, पाण्याचे योग्य नियोजन करणे आणि पावसाचे पाणी अडवून जमिनीत जिरविणे ही काळाची गरज बनली आहे. पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते योग्य ठिकाणी अडवून जमिनीत मुरविल्यास भूजलपातळी वाढण्यास मदत होऊ शकते. यासाठी गावागावांत छोटे-छोटे वनराई बंधारे उभारणे, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. आजपासूनच अशा उपाययोजना केल्या नाहीत, तर आगामी काळात पाण्यासाठी नागरिकांना मोठ्या संघर्षाला सामोरे जावे लागू शकते. ही परिस्थिती टाळण्यासाठी जलसंधारणाची पूर्वतयारी करणे गरजेचे असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी ग्राम महसूल अधिकारी अंकुश दामोदर ओमकार, पोलीस पाटील प्रमिला संतोष डंभारे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विश्वेश्वर राजन्ना चिलकावार, सहाय्यक शिक्षक डी. के. देशमुख, संतोष शामराव डंभारे, महसूल सेवक गोपाल जाधव, अंगणवाडी सेविका श्वेता नितीन कांबळे, अंगणवाडी मदतनीस जया स्वप्नील कोंडेकर, विनोद महादेव अवधूतकर आणि संजय शंकर सुरुपाम यांच्यासह गावातील तलाठी उपस्थित होते. पाणी वाचविणे ही प्रत्येकाची जबाबदारी त्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, पावसाचे पाणी अडविणे आणि भूजलसाठा वाढविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. जलसंधारणाची कामे केवळ शासकीय यंत्रणेपुरती मर्यादित न राहता नागरिकांनीही त्यात सक्रिय सहभाग नोंदविल्यास भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होऊ शकते. 'आज पाणी अडवा, उद्या पाणीटंचाई टाळा' हा विचार प्रत्येकाने आचरणात आणल्यास जलसमृद्ध गावाच्या दिशेने वाटचाल करणे शक्य होईल, असा संदेश माजरी येथील या उपक्रमातून देण्यात आला.

# शेतमजुरांना ५० हजारांची तातडीची मदत द्या

## शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांवर संदीप बुर्रेवार यांचा शासनाकडे पाठपुरावा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. २३ :** पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकरी आणि शेतमजुरांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर झरी जामणी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संदीप बुर्रेवार यांनी शेतमजूर व रोजंदारी कामगार कुटुंबांना प्रत्येकी ५० हजार रुपये तातडीची आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका आणि बाजरी यांसारख्या खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. शेतीची कामे मंदावल्याने शेतमजुरांच्या हातालाही काम मिळत नसून, त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या परिस्थितीत शासनाने शेतकरी आणि शेतमजुरांना दिलासा देण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे.



प्रमुख मागण्या
शेतमजूर व रोजंदारी कामगार कुटुंबांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची तातडीची आर्थिक मदत द्यावी.
नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची मदत द्यावी.
पीकविमा आणि नुकसानभरपाईची रक्कम तातडीने वितरित करावी.
कर्जवसुलीला स्थगिती देऊन कर्जाच्या पुनर्गठनाची व्यवस्था करावी.
ग्रामीण भागात रोजगार हमीची कामे मोठ्या प्रमाणात सुरू करावीत.

शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी त्वरित दिलासा द्यावा. शेतकरी आणि शेतमजुरांच्या हितासाठी शासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, असे आवाहन झरी जामणी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संदीप बुर्रेवार यांनी केले आहे.

# पुसद येथे उत्कृष्ट मूर्ती व सजावटीसाठी दुर्गादेवी मंडळांचा गौरव!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २३ :** रोटरी क्लब ऑफ पुसदतर्फे दरवर्षी प्रमाणे यंदाही उत्कृष्ट मूर्ती व सजावटीसाठी शहरातील दुर्गादेवी मंडळांचा गौरव करण्यात आला.

यावेळी क्लबच्यावतीने नियुक्त परीक्षण समितीने शहरातील एकूण ३५ दुर्गादेवी मंडळांना प्रत्यक्ष भेट देऊन केलेल्या परीक्षणात उत्कृष्ट मूर्ती स्पर्धेत येथील उदासी वॉर्डातील उदासी महाराज दुर्गादेवी मंडळ, अव्वल ठरले, तर उत्कृष्ट सजावटीचे पहिले पारितोषिक येथील अग्रवाल मंगल कार्यालयातील वाणिज्य श्री दुर्गा उत्सव मंडळाने पटकाविले.उत्कृष्ट मूर्ती स्पर्धेत द्वितीय क्रमांक बालाजी दुर्गा उत्सव, माळीपुरा यांनी तर आकाश दुर्गा उत्सव मंडळ, गणेश वॉर्ड, पुसद यांनी तृतीय क्रमांक पटकावला. तसेच उत्कृष्ट सजावटीचे दुसरे पारितोषिक येथील दवा बाजारातील अयोध्या दुर्गा उत्सव मंडळाने तर तृतीय क्रमांक छत्रपती शिवाजी महाराज दुर्गा उत्सव मंडळ, शिवाजी वॉर्ड, पुसद यांनी पटकाविला. या स्पर्धेतील सर्व विजेत्या मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष मंडळात जाऊन रोटरी क्लबतर्फे सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी रोटरीचे अध्यक्ष विजय ठाकरे, जॉइंट सेक्रेटरी प्रा प्रकाश लामणे, माजी अध्यक्ष डॉ उमेश रेवणवार, प्रोजेक्ट डायरेक्टर श्रीराम पद्मावार व स्वप्नील चिंतामणी, डॉ अमोल खांदवे, अमोल खडगी, सुरेखा मोगरे, गजानन मोगरे, जयसिंग राठोड आदी उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण विजय ठाकरे, श्रीराम पद्मावार, स्वप्नील चिंतामणी, गजानन मोगरे आदींनी केले.

## नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लि., युनिट २ गुंज सवना ता. महागांव जि. यवतमाळ

### उस खोडवा जोपासणे, ठिबक सिंचन व नविन उस लागवडीसाठी जाहीर आवाहन

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकरी बंधूना कळविण्यांत येते कीं, यावर्षी महाराष्ट्रासह आपले परिसरातही सरासरीपेक्षा अत्यंत कमी पर्जन्यमान झाल्यामुळे पाणी टंचाईची भिषण परिस्थिती निर्माण झालेली आहे. अशा परिस्थितीत शासनाचे निर्देशाप्रमाणे आपण यावर्षीचा गळीत हंगाम वेळेत चालू करून शेतक-यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. यावर्षी ऊस लागवडीसाठी शेतकरी अत्यंत उत्साही आहेत, मात्र पाण्याच्या टंचाईमुळे समाधानकारक ऊस लागवड होवू शकणार नाही ही वस्तुस्थिती आहे. तरीसुध्दा ज्या शेतक-यांकडे पाण्याची उपलब्धतता आहे, त्या शेतक-यांनी ऊस मोडू नये. खोडव्याचे व्यवस्थापन करावे, तसेच नविनही ऊस लागवड करावी. त्यासाठी कारखान्याने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी शेतक-यांना सवलतीचे दरांत ऊस रोपे व एनओएफ सेंद्रीय खताचा पुरवठा करण्यांत येणार आहे. तसेच कमी पाण्यात खोडवा व्यवस्थापन करणेसाठी ऊस शास्त्रज्ञाचे मार्गदर्शनाखाली पुढील महीन्यात विभागवार मेळावे आयोजीत करण्यांत आलेले आहेत. दुष्काळी परिस्थितीत कमीत कमी पाण्यामध्ये ऊसाचे उत्पादन घेणेसाठी शेतक-यांसाठी विशेष बाब म्हणून नॅचरल शुगरचे उपक्रमातील एन. साई मल्टिस्टेट क्रेडीट को. ऑपरेटीव्ह बँकेमार्फत कर्ज पुरवठा करून माफक दरांत ठिबक सिंचन सुविधा देण्याचा निर्णय घेण्यांत आलेला आहे. यावर्षीच्या दुष्काळी परिस्थितीमुळे पुढील वर्षीच्या गळीत हंगामासाठी ऊसाचे क्षेत्र कमी उपलब्ध होणार आहे. तरी सुध्दा कारखान्याचा गळीत हंगाम नियमीतपणे चालू होणार आहे. त्यामुळे कोणत्याही अफवांना शेतक-यांनी बळी न पडता खोडवा जोपासावा व ज्यांचेकडे पाण्याची उपलब्धतता आहे, त्यांनी जेवढ शक्य होईल तेवढी ऊस लागवड करावी.

ऊस हे शेतक-यांसाठी हमी पिक आहे, त्यामुळे कमीत कमी पाण्यातही ऊस पिक चांगल्या प्रकारे येवू शकते, अशी परिस्थिती यावर्षी आपलेकडे उद्भवल्यामुळे कितीही कमी ऊस उपलब्ध झाला, तरीही पुढील वर्षी कारखान्याचा गळीत हंगाम निश्चितच नियमीतपणे चालू होईल. त्यामुळे शेतक-यांनी अशा प्रतिकूल परिस्थितीतही या सुवर्णसंधीचा लाभ घेवून खोडवा जोपासावा व नविन ऊस लागवड करावी असे आवाहन कृषिरत्न श्री वी.वी. ठोंबरे, चेअरमन व कार्यकारी संचालक यांनी केले आहे.

(डी.एल. कदम)
डे. जनरल मॅनेजर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# गुरुदेव सेवा मंडळाने पाणी बचतीसाठी काम करावे-पद्मश्री जनार्दनपंत बोथे

## गुरुकुंजात कार्यकर्ता मेळाव्यात दुष्काळावर चर्चा



**तिवसा/वार्ताहर**

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता गुरुदेव सेवा मंडळाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी पाणी बचतीसाठी काम करावे,असे आवाहन अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस पद्मश्री जनार्दन पंत बोथे यांनी केले.ते राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज संस्थापित अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम, केंद्रीय प्रचार विभागच्या मार्गदर्शनात तिवसा तालुका प्रचार समिती द्वारा आयोजित तिवसा तालुका कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते.

तिवसा तालुका कार्यकर्ता मेळाव्याचे उद्घाटन पद्मश्री जनार्दनपंत बोथे गुरुजी यांच्या हस्ते झाले. त्यांनी यावेळी राष्ट्रसंताच्या साहित्याचा प्रचार प्रसार करण्याच्या दृष्टिकोनातून व पाण्याच्या दुष्काळ सदृश्य स्थितीवर चिंता व्यक्त केली, सध्यास्थितीत गुरुदेव सेवा मंडळाने गावागावात पाणी बचतीचे नियोजन करुन पाणी संमसेवर काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच पुण्यतिथी महोत्सव मध्ये तालुक्यातील सेवकांनी तालुकासेवाधिकारी यांच्या सोबत नियोजनबद्द काम करण्याबाबत मार्गदर्शन केले. मेळाव्याचे अध्यक्ष प्रकाश महाराज वाघ सर्वाधिकारी यांनी पुण्यतिथी महोत्सव यशस्वीतेच्या दृष्टीने कार्यकर्त्यांना कामाचे नियोजन दिले असून हा मेळावा इतर तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरेल आणि उत्कृष्ठ नियोजनासाठी तसेच पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात मेळावा आयोजित केल्या बद्दल तालुका समितीचे व तिवसा तालुका सेवाधिकारी प्रमोद झगेकर यांचे अभिनंदन केले. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय प्रचार प्रमुख गोपाल कडू, विभागीय सेवाधिकारी रामदास देशमुख, जिल्हा सेवाधिकारी भास्करराव पवित्रकार गुरुजी, राम कृष्ण हरी मंदिराचे अध्यक्ष विलास महाराज साबळे, अन्नदान विभागाचे सचिव सुभाष सोनारे उपस्थित होते.

तालुक्यातील उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या गुरुदेव सेवकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. त्यामध्ये गणेश घाटोळ, गजानन दिघडे, प्रमोद वाट, निखिल काकडे, छत्रपती राणे, आदित्य ठेंगे, जगन साबळे, कमल किशोर दरेकर, सुरेश हरणे, शंकर होले, नरेश भोयर, गजानन ठाकरे, चरंदास राऊत, मनोज साबळे,संकेत गाडगे, बबिता पालीवार, भारती बेलूरकर, रंजना सुलताने, वैशाली कांडलकर, वंदना उमप, जयश्री वाघ, दिपाली कळंबे, शालिनी राऊत, रेखा बघणे व इंदू डेहणकर यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक तिवसा तालुका सेवाधिकारी प्रमोद झगेकर संचालन तालुका प्रचार प्रमुख गजानन दिघडे यांनी तर आभार प्रदर्शन तालुका महिला सेवाधिकारी बबिता पालीवार यांनी केले राष्ट्रवंदना व जय घोषाने मेळावा संपन्न करण्यात आला.

## संक्षिप्त

### विजयादशमी निमित्त ग्रंथ पूजन सोहळा



**तिवसा-** स्थानिक श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात विजयादशमी (दसरा) निमित्त विशेष पूजन कार्यक्रमाचे अत्यंत उत्साही व मंगलमयी वातावरणात आयोजन करण्यात आले होते. शुभ मुहूर्तावर भारत माता, छत्रपती शिवाजी महाराज आणि पूजनीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे (फोटो) तसेच ग्रंथांचे विशेष पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मधुकरराव पिंगळे, दीपक धानोरकर, विशाल गडलिंग, सौरभ इंगळे, राजाभाऊ देशमुख,हर्षवर्धन धडांगे, राहुल धडांगे आदी मान्यवर उपस्थित होते. वाचनालय व्यवस्थापन समितीच्या वतीने आलेल्या सर्व पाहुण्यांचे व वाचकांचे स्वागत करण्यात आले. या सोहळ्याला वाचनालयातील मोठा वाचक वर्ग आणि परिसरातील नागरिक सहकुटुंब उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाचनालय व्यवस्थापन समिती व सर्व वाचक वर्गाने परिश्रम घेतले.

### न्यूरोलॉजी व न्यूरोसर्जरी मार्गदर्शन शिबीर

**नांदगाव पेठ-** मेंदू, मज्जासंस्था आणि मणक्याशी संबंधित आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी नांदगाव पेठ येथे रविवार २५ ऑक्टोबर रोजी मोफत विशेष मार्गदर्शन व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. परमपूज्य श्री संत काशिनाथ बाबा संस्थानच्या वतीने हे शिबीर आयोजित करण्यात आले असून या शिबिरामुळे परिसरातील गरजू रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळणार आहे.रेडियंट सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिहॅबिलिटेशन सेंटर, अमरावती यांच्या सहकार्याने श्री संत काशिनाथ बाबा सभागृह, नांदगाव पेठ येथे सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत हे शिबीर होणार आहे. यामध्ये प्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट डॉ. सिकंदर अडवानी आणि न्यूरोसर्जन डॉ. आनंद काकानी रुग्णांना मार्गदर्शन करणार आहेत.मिरगी, फिट, आकडी, अपस्मार, एपिलेप्सी, मायग्रेन, चक्कर येणे, लकवा, पक्षाघात, स्ट्रोक, डोक्याला मार लागणे, ट्रॉमा, मणक्याचे विकार, स्पाइन प्रॉब्लेम, ब्रेन ट्यूमर, स्मृतिभ्रंश आणि कंपवात यांसारख्या आजारांबाबत या शिबिरात मार्गदर्शन केले जाणार आहे. शिबिरासाठी पूर्वनोंदणी अनिवार्य असून, प्रथम नोंदणी केलेल्या १५० रुग्णांची तपासणी केली जाणार आहे.त्यामुळे इच्छुक रुग्णांनी वेळेत नोंदणी करून या आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## संत चापालाल महाराज मंदिरात नवरात्र उत्सव



**कुऱ्हा/वार्ताहर**

पोहरा (बंदी) येथील संत चापालाल महाराज देवस्थानात अश्विन शारदीय शुद्ध नवरात्र उत्सव दरवर्षीप्रमाणे यंदाही धार्मिक वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी संत चापालाल महाराज व लक्ष्मी देवी यांच्या घटस्थापनेचा विधी बाबुसिंग चव्हाण व रेखा चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच घटस्थापना व अखंड दीपज्योत पूजनाचा विधी मागीलाल चव्हाण यांच्या हस्ते पार पडला. नवरात्र उत्सवादरम्यान देवस्थानात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

संत चापालाल महाराज व लक्ष्मी देवी यांचा अभिषेक विधी सुनिल चव्हाण, कल्पना चव्हाण आणि विठ्ठल महाराज पवार यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी धार्मिक विधींमुळे परिसरात भक्तीमय वातावरण होते.नवरात्र उत्सवाची सांगता नैवेद्य, भोग व प्रसाद वितरणाने करण्यात आली. या धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून भाविकांना दर्शन व पूजनाचा लाभ मिळाला. संत चापालाल महाराज व लक्ष्मी देवी यांच्या दर्शनासाठी भाविकांनी श्रद्धेने सहभाग घेतला. संपूर्ण नवरात्र उत्सव भक्तिभावाने पार पडला.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे उच्चांकी वीजमागणीत दिलासा

**अमरावती/का.प्र.**

एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी झाल्याचा परिणाम म्हणून ऑक्टोबर महिन्यात अभूतपूर्व उष्णता जाणवत आहे. मुंबईसह राज्यात १० ऑक्टोबर रोजी आतापर्यंतची सर्वाधिक ३८,०२१ मेगावॅट विजेची मागणी नोंदविली गेली असून उच्चदाब वीज प्रणालीतून ३२,९२१ मेगावॅट आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या अंतर्गत सौर प्रकल्प व प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या माध्यमातून ५१०० मेगावॅट वीज उपलब्ध झाल्याने उच्चांकी वीज मागणी पूर्ण करण्यात आली. सौर ऊर्जा योजनांमुळे दिवसा वीज उपलब्ध होण्यासोबत वीजखरेदीतील बचतीचा लाभ होत आहे.

मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले की, दुष्काळी परिस्थितीत राज्यात उन्हाच्या झळा जाणवत आहेत. विजेची मागणी प्रचंड वाढली असताना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन सुरू केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेचा मोठा लाभ झाला आहे. त्यासोबत प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून राज्यात छतांवर उभारलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पांचाही लाभ झाला आहे. या योजनांमुळे दिवसा वीज मागणी वाढलेली असताना विजेची उपलब्धता आणि वीज खरेदीतील मोठी बचत असा दुहेरी दिलासा मिळाला आहे.

राज्यातील सर्व ४८ लाख कृषी पंप सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत एकूण १६,००० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. आतापर्यंत सात हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. सध्या या योजनेमुळे व काही तांत्रिक उपायांचा अवलंब करून ८० टक्के कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यात येत आहे.मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे १० ऑक्टोबर या उच्चांकी मागणीच्या दिवशी सर्वाधिक ५५०० मेगावॅट वीज पुरवठा दुपारी बारा वाजताच्या सुमारास झाला. सौरऊर्जा प्रकल्पात सूर्यप्रकाशाच्या उपलब्धतेनुसार वीजनिर्मिती बदलत असते. त्यातून होणाऱ्या वीजनिर्मितीमुळे दिवसा वीजमागणी मोठ्या प्रमाणावर असताना राज्याला दिलासा मिळत आहे.

मुंबईसह राज्यात विजेच्या ग्रीडमधील मागणीनुसार दि. १० ऑक्टोबर रोजी उच्चांकी मागणीची ३२,९२१ मेगावॅट इतकी नोंद झाली. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत विकेंद्रित स्वरुपाचे सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प उभे करून स्थानिक उपकेंद्रांना वीज पुरविली जाते. परिणामी त्याद्वारे निर्माण झालेल्या विजेची नोंद राज्याच्या ग्रीडमधील मागणीमध्ये समाविष्ट होत नाही. त्याच प्रकारे प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतही स्थानिक पातळीवर वीज तयार करून घरात वापरली जाते, त्यामुळे ग्रीडमधील विजेच्या मागणीमध्ये त्याची नोंद होत नाही. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेद्वारे व प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेमुळे उपलब्ध वीज ध्यानात घेता १० ऑक्टोबर रोजी राज्यात प्रत्यक्षात एकूण ३८,०२१ मेगावॅट वीज मागणी होती, असे स्पष्ट होते. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसह विविध योजनांमध्ये राज्यात सुमारे ११ लाख वीज ग्राहकांनी छतावर बसविलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पांची एकूण क्षमता ७,१७५ मेगावॅट झाली आहे.या दोन योजना अंमलात आल्या नसत्या तर थेट राज्याच्या ग्रीडवर मोठा विजेचा भार येऊन मोठी समस्या निर्माण झाली असती. सध्या अनेक राज्यांमध्ये विजेच्या टंचाईमुळे निर्माण झालेली परिस्थिती हाताळताना अडचणी येत आहेत. तथापि, महाराष्ट्र राज्यात सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे विजेची मागणी पूर्ण करण्यात मदत होत आहे.

## राजेश पांडे यांचे निधन



**अमरावती -** वाघोली येथील प्रतिष्ठित नागरिक राजेश अनंतराव पांडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते पन्नास वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन बहिणी व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या मृत्यूने बरीच मोठी हानी झाली आहे. त्यांच्यावर वाघोली येथील स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात आले.

## श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे दसरा यात्रा महोत्सवाचा सांगता

### ७२ फूट उंच झेंड्याना चढविली नवीन खोळ



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

विदर्भातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या चांदूर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या दसरा यात्रा महोत्सवाची भव्य महाप्रसादाने सांगता झाली. यावेळी हजारो भाविकांनी उपस्थिती लावत महाप्रसादाचा लाभ घेतला. संस्थानचे विश्वस्त मंडळ आणि सेवाधारी यांच्या नियोजनातून हा महोत्सव भक्तिमय वातावरणात पार पडला.

दसरा यात्रा महोत्सवासाठी भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी संस्थानच्या वतीने स्वयंसेवक आणि सेवाधारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. गर्दीचे व्यवस्थापन, भाविकांची सोय आणि कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी स्वयंसेवकांनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या नियोजनामुळे यात्रा महोत्सवात स्वयंशिस्त दिसून आली.श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे वर्षभर विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या उपक्रमांसाठी सर्व भाविक-भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करावे, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोकराव सोनवाल तसेच विश्वस्त वसंतराव शेंडे, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रवीण कुकडकर, लक्ष्मण राठोड, विष्णू राठोड, वैभव मानकर आणि स्वप्नील चौधरी यांच्यासह समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले

**७२ फूट उंच झेंड्याना चढविली नवीन खोळ**

दसऱ्याच्या दिवशी संस्थानचे विश्वस्त चरणदास नामदेवराव कांडलकर यांच्या हस्ते नवीन वस्त्र परिधान करून महाराजांच्या बोहलीचे विधिवत पूजन करण्यात आले. यानंतर संस्थान परिसरातील दोन्ही ७२ फूट उंच झेंड्यांचे पूजन करून त्यांना नवीन खोळ (कापड) चढविण्याचा धार्मिक विधी पार पडला. झेंड्याना पायाचा स्पर्श होऊ न देता दोरांच्या साहाय्याने नवीन खोळ चढविण्यात आली. हा चित्तथरारक सोहळा पाहण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती.

**चंदनउटी व रमण्याचा कार्यक्रम**

दसऱ्याच्या दिवशी चंदनउटीचा कार्यक्रम पार पडला. तसेच परमपूज्य कृष्णाजी महाराज यांचा भव्य रमणा निघाला. या धार्मिक कार्यक्रमांमध्ये भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. संस्थानच्या वतीने भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील तसेच दूरवरून आलेल्या हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## कॅन्सर जनजागृती अभियानातंर्गत उद्या जनजागृती रॅली

### असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाचे आयोजन



**अमरावती/का.प्र.**

ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय स्तन कर्करोग जनजागृती महिना म्हणून देशभरात साजरा केला जात आहे. या निमित्ताने असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडिया च्या वतीने उद्या शनिवार २४ व रविवार २५ ऑक्टोबर रोजी स्तन कर्करोग जनजागृतीसाठी दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त रविवार २५ ऑक्टोबर रोजी भव्य जनजागृती रॅली हॉटेल महफिल इन येथून निघणार आणि सांस्कृतिक भवन मध्ये समापन होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत आयोजकांनी दिली.

शनिवार २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ८.३० वाजे पर्यंत हॉटेल ग्रँड महफिलच्या रुबी हॉलमध्ये मार्गदर्शन कार्यक्रम होणार आहे. पहिल्या सेशनमध्ये प्रसिद्ध तज्ज्ञ डॉ. चिंतामणी, डॉ. सिद्धार्थ दुबाशी, डॉ. गिरीश जाखोटे, डॉ. दिलीप गुप्ता, डॉ. दिशा जहागिरदार, डॉ. अनिल डोकर, दुसऱ्या सेशन मध्येअमोल देशपांडे, डॉ. प्राची महाजन, डॉ. जयश्री इंगोले,तिसरे सेशन डॉ. प्रज्ञा चिंगुरूपति, डॉ. भरत वसानी, डॉ. मनिष माथनकर,चौथे सेशन मध्ये डॉ. शलाका जोशी, डॉ. अरोरा, डॉ. रोहित मुंधडा, डॉ. अरुंधती लोटे, डॉ. मंगेश पाटील, डॉ. शंतनु पेंडसे, डॉ. आदित्य भागवत,पाचवे सेशन,डॉ. दिपेंद्र सरकार,अखेरचे सेशन मध्ये डॉ. वैशाली जमरे, डॉ. अमित भांगडिया, डॉ. संदीप बिपटे, डॉ. अनंत पोरे, डॉ. अभिनव देशपांडे यांचे व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मुरलीधर बुब, सचिव डॉ. कौस्तुभ सारडा, डॉ. योगेश गोडे, डॉ. राजेंद्र गनेडिवाल, डॉ. जयश्री इंगोले,डॉ. राजेंद्रसिंग अरोरा, डॉ. आशिष डगवार आदि प्रयत्न करत आहे.या पत्रकार परिषदेला डॉ. मुरलीधर बुब, डॉ. राजेंद्र गनेडीवाल, डॉ. कौस्तुभ सारडा, डॉ. जयश्री इंगोले उपस्थित होत्या.

तसेच २५ ऑक्टोबर रोजु संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत जाहीर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये तज्ज्ञ डॉक्टर स्तन कर्करोगाबाबत असलेल्या शंका आणि गैरसमजांचे समाधान करणार आहेत.कार्यक्रमात स्तन कर्करोगावर यशस्वी मात केलेल्या महिलांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच दोन महिला व कर्करोग विजेत्या आपले अनुभव व्यक्त करतील. हा कार्यक्रम सर्वसामान्यांच्या विरोधात जनजागृतीसाठी सामूहिक शपथ घेणार आहे.

# काठीपुरा येथे दसरा महोत्सव व रावण दहन सोहळा

## मुलींची तलवारबाजी, लेझीम आणि पारंपरिक खेळांनी वेधले उपस्थितांचे लक्ष



**अंजनगाव सुजी/वार्ताहर**

काठीपुरा येथील बलराम व्यायाम शाळेच्या वतीने भव्य दसरा महोत्सव, रावण दहन आणि विविध पारंपरिक खेळांचे आयोजन करण्यात आले.महोत्सवात मुला-मुलींनी सादर केलेली विविध खेळांची प्रात्यक्षिके, मुलींची आकर्षक तलवारबाजी, लेझीम पथकाचे सादरीकरण आणि पारंपरिक खेळांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे उद्घाटन अंजनगाव सुर्जी नगर परिषदेचे नगराध्यक्ष अविनाश गायगोले, उपनगराध्यक्ष प्रियांका ताई माळठाणे, अंजनगाव सुर्जीचे ठाणेदार सूरज बोंडे , तसेच इंजिनिअर सुनील ठोटांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी माजी शिक्षण सभापती, नगर परिषद अंजनगाव सुर्जी भूपेंद्रजी भेलांडे सर, जगदीश भाऊ साळ्डा, विवेक भाऊ संगई, कवाने सर, टेकाम सर, रविंद्र फाटे सर, उमेश भाऊ बोंडे, नगरसेवक सुधीर भाऊ देवगिरे, नगरसेवक राजेंद्र भाऊ जयस्वाल, हरीश भाऊ माहोरे, विष्णू भाऊ फाटे, राजू भाऊ बरांपुरे, राजू भाऊ सोनेकर, दिनेश भाऊ शिंगनापूरे, नितीनजी मलंगे, नानाभाऊ शिंदे, जामेकर, प्रवीण भाऊ फाटे, रफीक शा, सुनील भाऊ चोपडे, शंकरदादा माळठाणे, शंभूदादा माळठाणे, मुन्नादादा माळठाणे आणि कार्तिक चंदन पत्री यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे मुलींनी सादर केलेली तलवारबाजीची चित्तथरारक प्रात्यक्षिके. मुलींनी आत्मविश्वास, चपळता आणि कौशल्याच्या जोरावर तलवारबाजीचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.तसेच लेझीमच्या तालबद्ध सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत आणली. व्यायामशाळेतील खेळाडूंनी विविध पारंपरिक खेळ आणि शारीरिक कौशल्यांची प्रात्यक्षिके सादर केली. भारतीय संस्कृतीतील पारंपरिक खेळ, व्यायामाची परंपरा आणि शौर्याचे महत्त्व या माध्यमातून अधोरेखित झाले. विजयादशमीच्या निमित्ताने आयोजित रावण दहन सोहळ्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.सांस्कृतिक आणि क्रीडाविषयक उपक्रमांमुळे युवकांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, शारीरिक तंदुरुस्ती आणि पारंपरिक खेळांविषयी आवड निर्माण होण्यास मदत होते. विशेषतः मुलींनी तलवारबाजीसारख्या साहसी खेळांत दाखवलेले कौशल्य हे महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने प्रेरणादायी ठरले.

## मेंढपाळांचा विभागीय आयुक्तालयावर धडक मोर्चा

**अमरावती/का.प्र.**



मोफत चारापाणी आणि पशुवैद्यकीय सुविधा मिळण्यासह इतर मागण्यांसाठी मेंढपाळांनी विभागीय आयुक्त कार्यालयावर धडक मोर्चा काढला. इविन चौकातून निघालेल्या मोर्चामध्ये मेंढपाळ ढोल, तुतारी वाजत घोड्यावर बसून सहभागी झाले होते.

विभागीय आयुक्तांना दिलेल्या निवेदनात सांगण्यात आले की, विभागात निर्माण झालेल्या कोरड्या दुष्काळा मुळे मेंढपाळ बांधव आर्थिक संकटात सापडले आहेत. चारा आणि पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने शेळ्या-मेंढ्यांचे संगोपन करणे कठीण झाले असून, मेंढपाळ कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी शासनाने तातडीने मदत करावी.दुष्काळग्रस्त मेंढपाळांसाठी स्वतंत्र विशेष पॅकेज जाहीर करण्याची मागणी करण्यात आली.दुष्काळग्रस्त भागातील मेंढ्यांसाठी मोफत चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, चारा खरेदीसाठी विशेष निधी मंजूर करावा, तसेच पशुधनासाठी मोफत पशुवैद्यकीय तपासणी, औषधोपचार आणि लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी या शिवाय मेंढपाळ कुटुंबांना थेट आर्थिक मदत देण्याचीही मागणी करण्यात आली.

# प्रथम पाया मानव वर्तन....

मानवी उत्क्रांतीचे टप्पे बऱ्याच तर्क, तत्त्वज्ञ, संशोधकांनी विज्ञान व शास्त्र यांचे मार्फत मांडले आहे. मानवी उत्क्रांती वानर पासून नर, मादी मानवापर्यंतचा प्रवास मांडला. त्याचे पुरावे देऊन ठेवले. त्यामुळे मानवी देहाचे प्रकार वर्ण, बांधा, शरीरयष्टी, लिंग यावरून स्पष्ट करून दिले. त्याचा आधार घेत राहणीमान, वेशभूषा, केशभूषा, रंगरंगोटी अशी धारणा ठेवून वागणूक सुरू आहे. नंतर त्यात वर्गवारी सुद्धा दिसून येते. पेशावार आचार सुद्धा आपल्याला बघता येतात. जसे आचार्य, प्राचार्य, अधिवक्ता, अभियंता, वैद्य, चिकित्सक, संशोधक, कलावंत, खेळाडू, व्यापारी, मापारी, ग्रामीण, शहरी, पंथी, धर्मी, दास सेवक, भक्त, विरक्त संन्यासी, देशी, विदेशी अशा असंख्य जाती– प्रजाती मध्ये मानवीवंशाची विभागणी झाली आहे. प्रश्न हा आहे, ही वाटणी झाली आहे, की केली आहे? या प्रश्नाचे उत्तर साधण्यासाठी 'प्रथम पाया मानव वर्तन! त्यास करावे उत्तम जतन! गाव करावे सर्वांगी पूर्ण!! आदर्श चित्र विश्वाचे!!

ग्रामगीतेतील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी दिलेले सूत्र सोडवण्याच्या प्रयत्नात मानवी वंशाचे रहस्य सोडवले जाते. नराचा नारायण होणे हा मानवी वंशाच्या प्रवास 'अंत में तुमझ में समरस हो जाए' असा आहे. यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातून त्यांच्या आयुष्याची संगत अनुभवण्याची संधी लाभते. कारण मानव देहाने कशासाठी या सृष्टीत प्रवेश केला, याचे कित्येक युग किंवा पर्वापासून उत्तर शोधताना आत्मसाक्षात्कारी व बुद्ध हे दोन घटक स्पष्ट होतात. आत्मसाक्षात्कार हे मानवाच्या देहाचे संचलन करणाऱ्या ऊर्जेच्या परिचयातून त्याचे स्थान निश्चित बघणारा ग्वाहीदार. साक्षात म्हणजे प्रत्यक्ष पाहणारा.



जगात विविध दर्शनशास्त्री झाले. त्यांचे विविध मत झाले. परंतु उत्तर मात्र एकच आले. एक तत्व, अल्हाह, अद्वैत, गॉड, वाहे गुरु, निर्माता अशा अनेक संप्रदाय, पंथ किंवा गट इत्यादींचे सांगणे उर्जित शक्तीच्या महिमा बाबतचे मत कायम आहे. मानव, दानव, देव अशा काही प्रकारात मानवी देहाची रचना कायम आहे. याचे आकलन झाले आणि तत्वाची, वृत्तीची, स्वभावाची ओळख झाली. त्यानंतर मानव ही संकल्पना स्पष्ट झाली. ज्यामध्ये देह व भाव अशी द्वैत रचना मानसिक व शारीरिक स्तरावर प्रमाणित झाली. देहाला आवश्यकता व मानसिकतेला आवड(भावना) अशी गरज स्पष्ट झाली.

मानसशास्त्र सांगणारे देहातील रासायनिक, भौतिक प्रक्रियेचे कार्यकारण भाग मेंदूस्थानी निश्चित असल्याचे पटवून देतात. मात्र प्रश्न शेष राहतो की मेंदू व मन नावाची रचना मानवी देहात संचालन कोण करतो. तेव्हा मात्र मानवी रचनेचे इतर प्राणी रचनेशी तुलन केल्यावर मानवी देहाची श्रेष्ठता स्पष्ट होते. त्या स्पष्ट झालेल्या तुलनेत मानवी वैशिष्ट्यात विचार आणि आचार स्वातंत्र्याचे मूल्यांकन होते. मग ध्वनीचे शब्द होतात, शब्दाचे अर्थ ध्वनीत समाविष्ट करणारे तर्क आणि तर्कातून निश्चित झालेले परिणाम मानवी वंशाची निश्चितता करण्यासाठी स्पष्ट होते. तेव्हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अनुभवाचा आधार 'बस मैं और तू सब एक ही हैं' या भाव दर्शनापर्यंत निश्चित होतो. त्यानंतर आनंदाचे स्तोत दर्शनाला येतात. त्यातून खऱ्या अर्थाने मानवी उत्क्रांतीचा टप्पा पूर्ण झाल्याचा अनुभवास येतो. आणि 'अब तो रहा प्रेम ही पास में' अशा उन्मनगतीचा प्रत्यय अनुभवताना वर्तन हा परिवर्तनाचा अंश आहे अशी निश्चिती दर्शविता येते. वर्तन म्हणजे वर्तमानात स्थिर होण्याची भूमिका. वर्तमान म्हणजे प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा काळ. जाणीव, दर्शन, परिणाम आणि त्याचा उत्साह वर्धक प्रवाह अनुभवता येतो अशी स्थिती होय. मग यात भूतकाळ, भविष्यकाळ लुप्त होतात. वर्तन ही कर्मसदृश स्थिती आहे. यात गती व स्थितीचे संतुलन साधण्याची परिस्थिती उपस्थित असते. त्यामुळे त्याचा आनंद केवळ आणि केवळ शेष राहतो. आता ह्यासाठी ग्रामगीता किंवा भागवतगीता कर्म सिद्धांत पटवून देताना मानवी वर्तनाचा आधार देतात. कारण वर्तनाचा हेतू निवडलेल्या कार्याशी नसून निश्चित केलेल्या उद्देश, हेतू किंवा गृहीत धरलेल्या धारणेशी निगडित आहे. त्यामुळे त्या–त्यानुसार वर्तनाचे लक्षणे सुद्धा आहेत. त्यामुळे आपली धारणा, आपले ध्येय, आपले गंतव्य निश्चित करण्यासाठी सुद्धा वर्तनाचा विचार येतो. म्हणजे वर्तन हे मानवी जीवन जाणण्याचा हेतूने असल्याने मानवी वर्तनावर महाराजांनी लक्ष केंद्रीत करताना प्रथम पाया ही भूमिका निश्चित करून दिली. आता या भूमिकेला साकार करणाची जबाबदारी म्हणून अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाची रचना म्हणजे जणू रंग मंच आहे. त्या मंचावर प्रथम पाया मानव वर्तनाचे संचलन होणे आज ही आवश्यक आहे. त्याबद्दल चिंतन करताना ग्रामगीता प्रमाण मानणारे मानव उपलब्ध नसल्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज देवाच्या नावाने माणसाची भीक मागताना भजनातून व्यक्त होतात.

*माणूस द्या मज माणूस द्या हो..*
*भीक मागता प्रभू दिसला!!*

या आशयासाठी सुद्धा प्रथम पाया मानव वर्तन हाच विचारात ठेऊन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या २४ ते ३१ ऑक्टोबर २०२६ दरम्यान सुरू होणाऱ्या ५८ व्या पुण्यतिथी महोत्सव निमित्त तपासण्याची भूमिका घेता येईल का?

**कबीर फादर,** अमरावती.
मो.७७९८६४४५६५

# फाशीची शिक्षा रद्दबातल : योग्य की अयोग्य?

दोन महिन्यांपूर्वी 'सीजेपी'च्या आंदोलकांवरील गुन्हे मागे घेऊन त्यांची सुटका करण्यात आली. दहा दिवसांपूर्वी त्याच आंदोलनातील ३०० आंदोलकांना सोडण्यात आले. याचप्रमाणे मराठा आरक्षण आंदोलनातीलही बरेच गुन्हे मागे घेण्यात आले. हेच गुन्हेगार भविष्यात पुन्हा रस्त्यावर उतरून धुडगूस घालणार नाहीत, याची हमी कोण देणार? नरसापूर अत्याचार प्रकरणातील भीमराव कांबळे या नराधमाने याआधीही दुष्कृत्य केले होते. त्यावेळीच त्याला कठोर शिक्षा झाली असती, तर आज ती दुर्दैवी चिमुकली जिवंत असती, असे वाटते.

**इतिहास आणि आकडेवारी**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ९ सप्टेंबर १९४७ रोजी जबलपूर मध्यवर्ती कारागृहात राशा उर्फ रघुराजसिंग याला खुनाच्या आरोपात पहिली फाशी देण्यात आली. त्यानंतर १५ नोव्हेंबर १९४९ रोजी महात्मा गांधींचे मारेकरी नथुराम गोडसे आणि नारायण आपटे यांना अंबाला कारागृहात फासावर लटकवण्यात आले. ३ जानेवारी १९५५ रोजी तीन मुलींच्या हत्या प्रकरणात रतनबाई जैन या पहिल्या महिला आरोपीला मृत्युदंड झाला. तीच आजपर्यंत फाशी झालेली शेवटची महिला ठरली.

दिल्लीच्या निर्भया सामूहिक अत्याचार प्रकरणातील चार आरोपींना २० मार्च २०२० रोजी तिहार तुरुंगात फाशी दिल्यानंतर आजपर्यंत एकाही कैद्याला फाशी दिली गेली नाही. देशात आजपर्यंत किती जणांना फाशी झाली, याचा अधिकृत आकडा उपलब्ध नाही. भारतीय न्यायव्यवस्थेनुसार कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या फाशीच्या शिक्षेला उच्च न्यायालयाची मंजुरी आवश्यक असते. भारतीय



नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ४०७ नुसार ती उच्च न्यायालयाकडे पाठवली जाते. त्यानंतर दोषी सर्वोच्च न्यायालयात अपील, पुनर्विचार याचिका आणि उपचारात्मक याचिका दाखल करू शकतो. तसेच राष्ट्रपती किंवा राज्यपालांकडे दयेची याचिकाही करू शकतो.

नालसार युनिव्हर्सिटी ऑफ लॉच्या अहवालानुसार, सुनावण्यात आलेल्या फाशीच्या शिक्षांपैकी सुमारे ९०% शिक्षा उच्च न्यायालयातच रद्दबातल करून जन्मठेपेत रूपांतरित केल्या जातात. केवळ ९.७७% प्रकरणांत फाशी कायम ठेवली जाते.

भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या कार्यकाळात सर्वाधिक म्हणजे सुमारे १८० दयेचे अर्ज स्वीकारून जन्मठेप देण्यात आली. २०१६ ते २०२५ या कालावधीत १०८५ आरोपींना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली, त्यापैकी केवळ १०६ शिक्षा कायम राहिल्या. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत देशात एकूण ५७४ कैदी फाशीच्या शिक्षेची वाट पाहत आहेत, त्यात २४ महिलांचा समावेश आहे.

मृत्युदंड योग्य की अयोग्य, यावर कायद्यात, समाजात आणि मानवी हक्कांच्या पातळीवर तीव्र मतभेद आहेत. एका बाजूने आंतरराष्ट्रीय संघटनांचे म्हणणे आहे की, जगण्याचा अधिकार हा मूलभूत मानवी हक्क आहे. राज्याला कोणाचाही जीव घेण्याचा अधिकार असू नये. एखाद्याला चुकीने फाशी दिली आणि नंतर तो निर्दोष सिद्ध झाला, तर तो जीव परत आणता येत नाही. न्यायव्यवस्था ही केवळ सुडबुद्धीची नसावी, तर गुन्हेगाराला सुधारण्याची संधी देणारी असावी. दुसऱ्या बाजूने, पीडितांच्या न्यायाच्या भूमिकेतून फाशी योग्य वाटते. गंभीर आणि क्रूर गुन्ह्यांबाबत समाजात भीती निर्माण व्हावी, गुन्हेगारांना जरब बसावी म्हणून फाशी आवश्यक मानली जाते. निर्भया, निठारी, नरसापूर, मालेगाव (डोंगराळे), श्रद्धा वालकर, तंदूर, जोशी-अभ्यंकर यांसारख्या हत्याकांडांची क्रूरता पाहता, अशा प्रकरणांत जन्मठेपेची शिक्षा पुरेशी वाटत नाही. अशा नराधमांना जिवंत ठेवणे हे समाजाच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक आहे आणि पीडित कुटुंबाच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखे वाटते.

असे गुन्हे घडले की, राजकीय नेते तातडीने पीडित कुटुंबीयांच्या घरी जातात, सांत्वन करतात आणि 'मारेकऱ्यांना फासावर लटकवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही', अशी गर्जना करतात. लाखो नागरिक रस्त्यावर उतरतात, आंदोलने होतात, मोर्चे निघतात. सरकारी वकील फाशीचीच शिक्षा व्हावी म्हणून पोटतिडकीने बाजू मांडतात. जलदगती न्यायालयात खटला चालवून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून दिल्याचा दावा सरकार करते. पण शेवटी फाशीची शिक्षा रद्द झाली, तर या सर्वांचा काय उपयोग? भारतीय न्यायव्यवस्थेत अत्याचार हा अत्यंत गंभीर गुन्हा मानला जातो. मग फाशीची शिक्षा रद्द होणे कितपत योग्य आहे? किमान आता तरी फाशीच्या शिक्षा लवकरात लवकर कशा अमलात येतील, या दृष्टीने सरकारने पावले उचलावीत, हीच माफक अपेक्षा आहे.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
नाशिक
मो.८७६७५९२९८०




# जागतिक पोलिओ (बालपक्षाघात) दिवस



मानवी इतिहासात काही आजार असे आले, ज्यांनी केवळ शरीरालाच नाही तर माणसाच्या स्वप्नांना आणि भविष्यालाही अपंग बनवण्याचा प्रयत्न केला. यातीलच एक अत्यंत क्रूर आणि भयानक आजार म्हणजे 'पोलिओ' (बालपक्षाघात). अवघ्या पाच वर्षांखालील निष्पाप बालकांच्या मज्जासंस्थेवर घाला घालून, त्यांना आयुष्यभरासाठी व्हीलचेअर/कुबड्यांच्या आधारावर जगण्यास भाग पाडणारा हा एक असा विषाणू /व्हायरस होता, ज्याने जगातील लाखो माता-पित्यांची झोप उडवली होती. परंतु, विज्ञानाची जिद्द आणि मानवी सामूहिक प्रयत्नांपुढे या विषाणूलाही नमावे लागले. डॉ. जोनास साल्क यांनी शोधलेल्या पहिल्या यशस्वी लसीने मानवजातीला एक नवे हत्यार दिले. त्यांच्याच सन्मानार्थ दरवर्षी २४ ऑक्टोबर रोजी जगभरात 'जागतिक पोलिओ दिवस' साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका आजाराची आठवण करून देणारा नाही, तर जागतिक आरोग्य यंत्रणा, रोटरी इंटरनॅशनल आणि लाखो आरोग्य कर्मचाऱ्यांच्या त्या अथांग संघर्षाचा उत्सव आहे, ज्यांनी जगाला पोलिओमुक्तीच्या उंबरठ्यावर आणून उभे केले. आज आपला भारत देश अधिकृतपणे पोलिओमुक्त असला, तरी जागतिक स्तरावर या विषाणूचे समूळ उच्चाटन होईपर्यंत 'एक दिवस, एक फोकस: चांगल्यासाठी पोलिओचा अंत' या २०२६ च्या संकल्पनेने आपल्याला सतर्क राहायचे आहे. हा आजार पोलिओ व्हायरस (एन्टेरोव्हायरस) मुळे होतो. जो मानवी आतड्यांमध्ये वाढतो.

सध्या केवळ टाईप १ (डब्ल्यु पी व्ही १) सक्रिय आहे. फक्त मानव (यजमान /होस्ट) हाच या विषाणूचा नैसर्गिक स्त्रोत आहे; प्राण्यांद्वारे हा पसरत नाही. संसर्ग झालेल्या ९०३ ते ९५३ लोकांमध्ये कोणतीही लक्षणे दिसत नाहीत, पण ते नकळत विषाणू पसरवत असतात. केवळ १३ पेक्षा कमी रुग्णांमध्ये विषाणूंमुळे कायमचे अपंगत्व (पॅरालायसीस) येते. हा विषाणू प्रामुख्याने दूषित अन्न, पाणी आणि अस्वच्छतेद्वारे (फिको-ओरल रुट) एकाकडून दुसऱ्याकडे पसरतो. जागतिक आरोग्य संघटनेने सुरू केलेल्या ग्लोबल पोलिओ ईरॅडिकेशन इनिशिएटिव्ह - जीपीइआय मोहिमेमुळे जगभरातील पोलिओच्या रुग्णांमध्ये ९९३ पेक्षा जास्त घट झाली आहे. जानेवारी २०११ पासून एकही रुग्ण न आढळल्याने भारत २७ मार्च २०१४ रोजी अधिकृतपणे पोलिओमुक्त देश म्हणून मानांकन मिळवले आहे. पोलिओवर कोणताही उपचारात्मक इलाज नाही, केवळ प्रतिबंध हाच एकमेव मार्ग आहे. ओरल पोलिओ लस (ओपीव्ही - तोंडाने देण्याची लस): ही अत्यंत प्रभावी आणि लोकप्रिय लस असून याचे दोन थेंब आयुष्याचे, अखंड आरोग्याचे 'बालकांना पाजले जातात. यामुळे आतड्यांमध्ये प्रतिकारशक्ती तयार होते.

नियमित लसीकरण वेळापत्रक नुसार जन्मानंतर ताबडतोब, त्यानंतर ६ व्या, १० व्या आणि १४ व्या आठवड्यात आणि १६ ते २४ महिन्यांच्या दरम्यान पोलिओचे डोस दिले जातात. भारताला पोलिओमुक्त ठेवण्यासाठी आणि भविष्यात या रोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. 'पोलिओ' हा एक अतिशय गंभीर आजार असला तरी, या आजारावर मात करून जगाला आपल्या कर्तृत्वाची ओळख करून देणाऱ्या आयुष्यभर ७० हून अधिक वर्षे 'आयरन लंग' मशीनमध्ये झोपून राहिलेल्या पॉल अलेक्झांडर यांचा संदेश होता, 'माझे आयुष्य हे याचे उदाहरण आहे की तुमची परिस्थिती काहीही असो, तुम्ही तुमचे भविष्य स्वतः घडवू शकता. कधीही हार मानू नका.'

या जागतिक पोलिओ दिनाच्या निमित्ताने संकल्प करूया की, 'नकोत हातामध्ये काठ्या, नको पायाला बेड्या, आरोग्य सुंदर जगण्याचे, संकल्प करूया!

**तारा व्दा. शर्मा**

# सोनं घ्या अन् सोन्यासारखे रहा-हरवलेली नाती शोधा

कमीत कमी शंभर लोकांनी तरी मला असा प्रिंटेड मॅसेज व्हॉट्सअॅप वरून पाठवला. क्वचित एखाद्याने स्वतःच्या मनातल्या भावना पाठवल्या असतील. शब्दांचीच पाने अन् शब्दाचेच सोने प्रत्यक्ष सोन कोणीच आपट्याच्या पानांचे देत नाही. मग खरे सोने तर दूरच दूर... सर्वजण नुसता मॅसेज फॉरवर्ड करण्याचा गेम खेळतात.

पूर्वी दसऱ्याला संध्याकाळी ४ वाजता घरातली तयारी सुरू व्हायची. पांढरा शुभ्र पायजमा, कोशाच्या, इस्त्रीचा शर्ट, बाईने छान काठपदाराची साडी नेसून हातात आपट्याच्या पानांचे सोने, सोबत एखादा पेढा घेऊन, 'चला आप्पा साहेबांकडे, चला वहिनींकडे...' दारात गेलं की, 'सोनं घ्या, सोन्यासारखे रहा' म्हणत पायाला हात लावणे. चहा-पाणी, गप्पा, सुख-दुःखाची देवाण-घेवाण. एखाद्या घरात वर्षभर भांडण असेल, तर दसऱ्याच्या सोन्याने ते मिटायचे. सोनं हे फक्त पान नव्हते, ते नात जोडण्याचे कारण होते.

**आता काय झाले?**

आता सकाळी ६ वाजताच मोबाईलवर १०० मॅसेज येतात. 'ज्ज्ब अ्लेर्ट' चा फॉरवर्डेड फोटो. एका क्लिकवर २०० जणांना सोनं पाठवले की काम संपले! ना चेहरा दिसला, ना आवाज ऐकला. ना चहा झाला, ना मन मोकळे झाले. आणि याच व्हॉट्सअॅपच्या सोन्याने खरंच संबंध जुळण्यापेक्षा दुरावले आहेत. आणि अहंकार वाढलेला आहे.

भेट संपली, फक्त मॅसेज उरला: आपण माणसाला नाही, तर त्याच्या डीपीला सोन देतोय.

परंपरा नाही, औपचारिकता झाली: सोनं देणे म्हणजे आशीर्वाद होता, आता तो एक टास्क झाला आहे - पाठवायचंय म्हणून पाठवलं.

पुढच्या पिढीचं नुकसान: आपल्या



पोरांना आपट्याचे झाड कसे असते हेच माहित नाही. त्यांना वाटतं सोनं म्हणजे व्हॉट्सअॅपवरचा सोनेरी फोटो!

वाईट परंपरा पडते आहे: आता कोजागिरीचे दूध, दिवाळीचा फराळ पण फोटोवरूनच दिल्या जातो. संक्रांतीचे तिळगूळ पण ऑनलाईनच वाटल्या जाते. असे गोड पदार्थ व्हॉट्सअॅप ने्ल पाठवल्या पुन्हा त्यावर एक उतारा असतो. मोबाईलला मुंग्या लागतील बार.!.. मग जिव्हाळ्याचे घर कसे बांधले जाणार? नात्यातील संबंध कसे दृढ होणार?

तंत्रज्ञान वाईट नाही, पण तंत्रज्ञानाने माणूसपण संपता कामा नये. दसऱ्याला एक नियम करूया - व्हॉट्सअॅपवर १०० जणांना पाठवण्यापेक्षा, निदान ५ घरात तरी स्वतः जाऊन सोनं देऊया. एखाद्या आजी-आजोबांना, एखाद्या नाराज मित्राला, एखाद्या लांबच्या नातेवाईकाला सोन देऊया. कारण आपट्याचे पान तर सुकूनच जाईल, पण भेटीने जोडलेले नाते सोन्यासारखे कायम चमकत राहील.

सोने घ्या, सोन्यासारखे रहा असे म्हणताना राग, अहंकार विसरा. माणूस म्हणून जगा. माणसाने माणसाशी माणूस म्हणूनच वागा. आपल्या संस्कृतीत कुठलीही रूढी उगाच समजाने बनविलेली नाही. दसऱ्याला सोने देऊन नमस्कार करण्यामागे फार मोठे मानसशास्त्र दडलेले आहे. यातूनच हरवलेली नाती शोधता येतील

वर्षभराचा प्रेमाचा, मायेचा आपुलकीचा हिशेब चुकता करण्याचा दिवस म्हणजे दसरा आहे. संसारात, नात्यात, शेजारी-पाजारी वर्षभरात भांड्याला भांड लागतच., एखाद्याचं बोलणं खटकतं, राग येतो, मन दुखावले जाते. माणूस अहंकाराने म्हणतो, मी कशाला जाऊ त्याच्याकडे/तिच्याकडे? त्याचीच चूक आहे

माझ्या मते दसरा हा अहंकार वितळवून टाकण्याचा दिवस आहे. सोने हे खूप सुंदर निमित्त आहे. 'चला जे झाले ते झाले, नव्याने सुरुवात करूया' असे म्हणून जगणे- वागणे, वाद मिटविणे, असे पुन्हा नव्याने कृती करून चुका सुधारण्याची संधी आहे.

**समजून घेणे म्हणजे काय?**

समजून घेणे म्हणजे एखाद्याची चूक माफ करणे नाही.. समजून घेणे म्हणजे तू माणूस आहे, चुकू शकतोस, जसा मी चुकलो. जेव्हा आपण समोरच्याला आपट्याचे पाने देतो, तेव्हा आपण अप्रत्यक्षपणे सांगतो, 'माझ्या मनात तुझ्याबद्दल राग नाही, द्वेष नाही, तू माझ्यासाठी सोन्यासारखा आहेस, मनातील अढी काढणे आवश्यक. मनात अढी ठेवणे म्हणजे मनात कचरा साठवणे. जसा घरात कचरा साठवला की घराला दुर्गंधी येते, तसच मनात राग, द्वेष, मत्सर साठवला की मनाला दुर्गंधी येते. त्याचा त्रास समोरच्या पेक्षा आपल्यालाच जास्त होतो.



दसऱ्याचा दसऱ्यानिमित्त उत्तम संदेश हा कचरा आज काढून टाका. सोन द्या आणि मन हलके करा. म्हणून लोकांनी व्हॉट्सअॅप वरील सोन्याचे मेसेज पाठवून फार्मलीटी पूर्ण करू नये. प्रत्यक्ष जाऊन, हातात घेऊन, मोठे असतील तर नमस्कार करून, डोळ्यात डोळे घालून सोने घ्या म्हणावे. कारण, एका भेटीत मेसेज पेक्षा जास्त, माया, आपुलकी असते. पाया पडून नमस्कार केल्याने प्रेम वृद्धींगत होते, मोठ्यांचे आशीर्वाद मिळतात.. सर्व गिले शिकवे मिटतात. सोने हे पान नसून, मी तुला विसरलो नाही याची पावती आहे.

आज भाऊ भाऊ, बहिणी बहिणी भांडतात, शेजारी बोलत नाहीत. तिथे सोने देण्याची परंपरा टिकवणे ही काळाची गरज आहे. सोने देताना फक्त हात पुढे करू नका. मन देखील मोठे ठेवा. हेच सोन तुमचे आयुष्य सोन्यासारख करेल.

*रुसवे फुगवे विसरून जावे*
*सोने देऊनी जवळ यावे*
*हाच खरा दसरा, हाच खरा धर्म*
*माणसाने माणसाला जपावे*

**ग्रामगीताचार्य डॉ. शोभा गायकवाड,** अमरावती

# घरगुती गॅसची ऑटोमध्ये अवैध रिफिलिंग ; दोघांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई ; १६ सिलिंडर, रिफिलिंग मशीनसह साहित्य जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरमधून ऑटोमध्ये अवैधरीत्या गॅस भरण्याचा प्रकार स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणला. 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत गुरुवारी (२२ ऑक्टोबर) करण्यात आलेल्या या कारवाईत दोन जणांना ताब्यात घेण्यात आले असून, १६ गॅस सिलिंडर, रिफिलिंग मशीन, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि ऑटो असा एकूण १२ लाख ३५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.




पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली की, सिव्हिल लाइन्स पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जगजीवन रामनगर, टेलिफोन कॉलनी परिसरातील दुबे वाडी येथे राहणारा मनोज रमेश दीक्षित हा त्याच्या घराशेजारील टिनाच्या शेडमध्ये घरगुती गॅस सिलिंडरमधून ऑटोमध्ये अवैधरीत्या गॅस भरत आहे. या माहितीची खातरजमा करण्यासाठी पथकाने घटनास्थळी धाड टाकली. त्यावेळी शेडमध्ये ऑटोमध्ये गॅस भरण्याचे काम सुरू असल्याचे आढळून आले. पोलिसांनी मनोज रमेश दीक्षित (वय ३६, रा. जगजीवन रामनगर, टेलिफोन कॉलनी, दुबे वाडी) आणि ऑटोचालक विनोद नारायण गेडाम (वय ४६, रा. अशोक नगर, अकोट फाइल, अकोला) यांना ताब्यात घेतले.

कारवाईत भारत गॅसचे व्यावसायिक वापराचे पाच रिकामे सिलिंडर, घरगुती वापराचे चार भरलेले व सहा रिकामे सिलिंडर, एचपी गॅसचा एक भरलेला सिलिंडर, गॅस भरण्याची मशीन, प्लास्टिक नळ्या, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि एमएच-३०-एए-६८८७ क्रमांकाचा बजाज ऑटो जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोन्ही आरोपी आणि जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी सिव्हिल लाइन्स पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. त्यांच्याविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक आणि अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

पथकातील अधिकारी निलेश देशमुख, गोपाल जाधव, विष्णू बोडखे, माजिद पठाण, अनिल चव्हाण यांच्यासह पोलीस अंमलदार शेख हसन, उमेश पराये, सुलतान पठाण, भास्कर धोत्रे, अमित दुबे, अब्दुल माजिद, रविंद्र खंडारे, महेंद्र मलिये, किशोर सोनोने, खुशाल नेमाडे, मंगेश इंगळे, वसीमोद्दीन, एजाज अहमद, राहुल गायकवाड, स्वप्नील खेडकर, श्रीकांत पातोंड, अन्सार अहमद, राज चंदेल, आकाश मानकर, पवन डांबलकर, अभिषेक पाठक, सतीश पवार, अशोक सोनवणे, भीमराव दिपके तसेच चालक विनोद ठाकरे, प्रविण कश्यप, रामकिसन डोईफोडे, मनीष ठाकरे, देवानंद खरात आणि प्रकाश लोखंडे यांनी सहभाग घेतला.

### जाहीर सूचना

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे अनिता केशव मानकर यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे खडकी बु, शेत सर्वे क्रं. १५/१ यावर बांधलेल्या ओमकार रेसिडेन्सी मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्ल्याट क्रं. बी-२ ज्याचे ऐकूण बिल्टअप एरिया क्षेत्रफळ ५४० चौ. फुट. (५०.१८ चौ. मीटर) आहे. ता. आणि जिल्हा. अकोला.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे कांचन अभय माने हे अनिता केशव मानकर यांच्या कडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तदनंतर, कांचन अभय माने यांनी PNB HOUSING FINANCE LIMITED येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदी खत दि. १९/०१/२०१६ रोजीचे दस्त क्र. २९१ मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान / राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/ इतर बँक बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही आणि ठरल्याप्रमाणे खरेदी खत नोंदणीकृत करून सदर मालमत्ता PNB HOUSING FINANCE LIMITED. येथे गहाण करण्यात येईल. करिता हि जाहीर सूचना देत आहे.

दिनांक- २३/१०/२०२६
ठिकाण - अमरावती.

**ॲड. रवींद्र रु. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती.
मो. क्रं. ९८२३६९८७४५

### जाहीर नोटीस

याद्वारे सर्वसामान्य जनता, बँक, शासकीय / अशासकीय कार्यालयीन अधिकारी व संबंधितांना कळविण्यात येते की, मी, भगवती गोवर्धनदास कपाडिया (लग्नापूर्वीचे नाव) / अल्पा अनिल भाटिया (लग्नानंतरचे नाव), रा. शशी कृपा, कमल सोसायटी, नवीन राधाकिसन प्लॉट, अकोला, ता. व जि. अकोला, यांनी दिनांक १७.०६.२०१४ रोजी दीपक रणजित कपाडिया रा. काभादेवी रोड, मुंबई यांच्या नावाने दिलेला पॉवर ऑफ अटर्नी, जो नोटरीकृत असून ज्याचा दस्त क्रमांक १९०/२०१४ आहे, तो आजपासून दिनांक ११.१०.२०२६ रोजीपासून रीतसर रद्द, निष्प्रभ व कागदोपत्री निरर्थक घोषित केला आहे. सदर पॉवर ऑफ अटर्नीन्वये दीपक एसओ रणजित कपाडिया यांना देण्यात आलेले सर्व अधिकार व परवानगी आता समाप्त करण्यात आली आहेत. दिनांक ११.१०.२०२६ किंवा त्यानंतर सदर व्यक्तीने पॉवर ऑफ अटर्नीच्या आधारे केलेले कोणतेही कृत्य, करार किंवा व्यवहार मला व माझ्या कायदेशीर वारसांना बंधनकारक राहणार नाहीत. त्यामुळे सर्व संबंधितांना सक्त ताकीद देण्यात येते की, त्यांनी वरील नमूद व्यक्तीसोबत माझ्या किंवा माझ्या मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. मूळ अर्जदार (Principal): भगवती गोवर्धनदास कपाडिया (अल्पा अनिल भाटिया) पत्ता: शशी कृपा, कमल सोसायटी, नवीन राधाकिसन प्लॉट, अकोला, ता. व जि. अकोला

दिनांक :
अकोला

**ॲड. सुमित ठाकूर**
प्लॉट नं. १४, भांडे कॉलेज,
मलकापूर, अकोला ता. जि. अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७४४/२०२६ — प्रोसेस नं.१३११५/२०२६
चौ.ता. ३०/११/२०२६ — दिनांक : १४/१०/२०२६

**अर्जदार :** १. अशोक रामजी बलखंडे २. अरूण रामजी बलखंडे ३. धम्मानंद रामजी बलखंडे सर्व रा. वार्ड नं. ५, शिवणी खदान, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. रामजी गंगाराम बलखंडे २. पार्वताबाई रामजी बलखंडे
**पत्ता :-** रा. वार्ड नं. ५, शिवणी खदान, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामजी गंगाराम बलखंडे यांचे दि. ०४/०६/२०२६ रोजी व मयत पार्वताबाई रामजी बलखंडे यांचे दि. ०१/१२/२०१३ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/११/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ९३/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** हनुमान मंदिर संस्थान कळंबा बु. ता.बाळापुर, जि. अकोला.

**अर्जदार :-** श्री दत्तात्रय शांताराम खेडकर, कळंबा बु. ता.बाळापुर, जि. अकोला.

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम , १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन):-** रोख रक्कम रु.१५०००/- श्री दत्तात्रय शांताराम खेडकर, यांचे कडे जमा आहे.

**आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** गा.पं. कळंबा बु. येथिल हनुमान मंदिराची जागा ज्याचे वर्णन मालमत्ता (१) क्र. १५९/१७४ चे एकुण क्षेत्रफळ ४३५६ चौ. फुट, एकुण बांधकाम ३५x४१=१४३५ चौ.फुट, (मी. १३३.३६) त्यातील खुली जागा २९२१ चौ.फुट(मी.२७१.४६) एकुण बांधकाम व खुली जागा मी ४०४.४८).

**चतुसिमा :** पुर्वेस - सरकारी रस्ता, पश्चिमेस - सरकारी रस्ता, उत्तरेस- रामेश्वर जुमळे/पुरुषोत्तम जुमळे, दक्षिणेस-सरकारी जागा स्थावर मालमत्तेची किंमत अंदाजे १५ लाख रुपये.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-२२/१०/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

### दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर, अकोला, यांचे न्यायालय क्र ०२ अकोला

किरकोळ फौजदारी अर्ज क्रमांक १३४७/२०२६ — चौकशी तारीख : २७/११/२०२६

**जाहीरनामा**

**अर्जदार : -** खानम फरहाना तब्बस्सूम पिता ईमरान खान

**... विरूध्द ...**

**गैरअर्जदार :-** रजिस्ट्रार म.न.पा अकोला (जन्म मृत्यू नोंद)

वि.न्यायालयाच्या आदेशानुसार या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते आहे की अर्जदार नामे खानम फरहान इमरान खान जन्म दिनांक २४/०८/१९८९ रोजी अकोला येथे जन्म झाला, असून त्यांचा जन्माची नोंद महानगर पालीका अकोला येथे नसल्या कारणाने त्यांच्या जन्माची नोंद होण्याकरीता त्यांनी Application Under Section 13(3) of The Birth And Death Registration Act 1969 For Taking the Entry of Death/Birth अश्या स्वरूपाचा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यावर पारीत झालेल्या आदेशानुसार या जाहिर नोटिसद्वारे त्यांचे जन्माची नोंद होणेसंदर्भात कुणालाही काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी पुढील चौकशी ता २७/११/२०१६ रोजी किंवा त्यापुर्वी स्वतः किंवा वकीलामार्फत आक्षेप नोंदवावा जर चौकशी तारीख २७/११/२०२६. पर्यन्त कोणाचेही काही आक्षेप आले नाही तर कुणाचेही काही आक्षेप नाही असे समजुन पुढील आदेश पारीत केल्या जातील असे सर्वांना या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे.आज दिनांक २३माहे आक्टोबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशान्वये**
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय तथा न्यायदंडाधिकारी
प्र. श्रेणी कोर्ट क ०२ अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३१०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७०६/२०२६ — प्रोसेस नं.१२८७४/२०२६
चौ.ता. २५/११/२०२६ — दिनांक : ०८/१०/२०२६

**अर्जदार :** १. संभाजी दौलतराव हटकरे २. राहूल संभाजी हटकरे ३. अतुल संभाजी हटकरे सर्व रा. सुरेखा नगर, प्लॉट नं. १७-अ, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शिला संभाजी हटकरे
**पत्ता :-** रा. सुरेखा नगर, प्लॉट नं. १७-अ. मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शिला संभाजी हटकरे यांचे दि. २८/०८/२०२६ रोजी राहते घरी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७०७/२०२६ — प्रोसेस नं.१२९५०/२०२६
चौ.ता. २६/११/२०२६ — दिनांक : ०९/१०/२०२६

**अर्जदार :** सविता वसंता मुरूमकार रा. मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : वसंता हिरामण मुरूमकार
**पत्ता :-** रा. मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वसंता हिरामण मुरूमकार यांचे दि. २०/०४/२०२६ रोजी मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर असे होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६६७/२०२६ — प्रोसेस नं.१२६७६/२०२६
चौ.ता. २३/११/२०२६ — दिनांक : ०५/१०/२०२६

**अर्जदार :** १. रजनी श्रीकृष्ण भाकरे २. गोपाल श्रीकृष्ण भाकरे दोघेही रा. मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला. मो. क्र. ७७९८७१७७९४

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्रीकृष्ण रामभाउ भाकरे
**पत्ता :-** रा. व्दारा गोपाल श्रीकृष्ण भाकरे, रा. मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीकृष्ण रामभाउ भाकरे यांचे दि. २८/०७/२०२५ रोजी मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतांस वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६६६/२०२६ — प्रोसेस नं.१२५६८/२०२६
चौ.ता. १९/११/२०२६ — दिनांक : ०३/१०/२०२६

**अर्जदार :** १. राजकन्या तुकाराम भाकरे २. ज्ञानेश्वर तुकाराम भाकरे दोघेही रा. मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला. मो. क्र. ८९९९७९८४५४

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तुकाराम पांडुरंग भाकरे
**पत्ता :-** रा.व्दारा ज्ञानेश्वर तुकाराम भाकरे, रा. मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तुकाराम पांडुरंग भाकरे यांचे दि. ०६/०९/२०२६ रोजी मोरगाव भाकरे, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/११/२०२६ रोजी सळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. दिनांक ०३/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# पातुर नगरपरिषद कार्यालय
# पातूर जि. अकोला

जा.क्र. नपपा/ कर वि/ ५०९/२०२६ — दिनांक २३/१०/ २०२६

### जाहीरनामा

पातुर शहरातील सर्व नागरीकाना कळविन्यात येते की खालील अर्जदारांनी पातुर क्षेत्रातील मालमत्तेचे घर खाली जागा व मालमत्ता हस्तांतरण करण्याकरीता नगर परीषद कार्यालयात खरेदी खत/ वारस प्रमाणपत्र / हक्कसोड लेख / बक्षीस पत्र / आपसातील वाटणी पत्र या कागदपत्रासह अर्ज सादर केला आहे. तरी नगर परीषद अभीलेखाला नोंदणी करण्याकरीता आक्षेप/ हरकती सादर करावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत आवश्यक त्या कागदपत्रासह नगर परीषद कार्यालयामध्ये सादर करावे. विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाही, यांची नोंद घावी.

| अ. क्र. | न. प. अभिलेखाला आलेले नाव व खरेदीखत देणाऱ्याचे नाव | नावे करण्याकरिता अर्ज केलेल्या व्यक्तीचे नाव व खरेदीखत घेणाऱ्याचे नाव | सादर केलेले कागदपत्र | वार्ड क्र. | मालमत्ता क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | लालखा सवाई खान | राजेका परवीन शेख जाहेद | खरेदीखत | 16 | 95 |
| २ | मोहसीन अली सैय्यद साबीर अली | फिरोज ईकबाल खान हुसैन खान | खरेदीखत | 10 | 43 |
| ३ | शेख समद शेख ग़फ़्फ़ार | शेख चाँद शेख ग़फ़्फ़ार | हक्कसोड लेख | 12 | 101 |
| ४ | सुरेंद्रसिंह धरमसिंह गहलोत (मयत) | विजयसिंह सुरेंद्रसिंह गहलोत | वारस प्रमाणपत्र | 13 | 32,45 |
| ५ | शकुंतला मनोहर भगत व ईतर ३ | नरेंद्र मनोहर भगत व ईतर २ | हक्कसोड लेख | 8 | 150/1 |
| ६ | हलीमा बी रशीद खाँ | शफीक खान रशीद खान | बक्षीस पत्र | 2 | 125 |
| ७ | मो नदीम गुलाम शबीर व ईतर ४ | नसीम बी शेख मुख्तार | खरेदीखत | 16 | 62 |
| ८ | शंकर श्रीराम शेवलकार ( मयत ) | श्रीमती निर्गुणा शंकर शेवलकार | वारसाची नोंद | 3 | 62 |
| ९ | दत्ता लक्ष्मण भराडी | शेख उमर शेख ईब्राहीम व ईतर १ | खरेदीखत | 11 | 180 |
| १० | सौ रेणुका उमेश जवळे | सौ सगीता किशोर काळपांडे व ईतर १ | खरेदीखत | 9 | 230 |
| ११ | शेख ईसा शेख वजीर | शेख मेहराज शेख ईसा व ईतर ५ | वारस प्रमाणपत्र | 17 | 26 |
| १२ | अब्दुल सत्तार शेख अमीर | साबीरा बी अब्दुल सत्तार व ईतर ४ | वारस प्रमाणपत्र | 4 | 67 |
| १३ | रामकृष्ण उमाजी तायडे | डिगांबर रामकृष्ण तायडे | बक्षीस पत्र | 7 | 224 |
| १४ | सौ संगीता किशोर काळपांडे | प्रदिप शामराव काळपांडे | हक्कसोड लेख | 9 | 230 |
| १५ | विजय प्रकाश वानखडे | अमर प्रकाश वानखडे | खरेदीखत | 3 | 40 ब |
| १६ | रमेश जानकिराम कोथळकर | विजय प्रकाश वानखडे | खरेदीखत | 3 | 45 |
| १७ | नसीब खान छोटे खान व ईतर ४ | वसीम खान छोटे खान | हक्कसोड लेख | 10 | 98 |
| १८ | रीजवाना बी मो ऐहसान | सैय्यद वसीम सैय्यद अनिस | खरेदीखत | 17 | 96 |
| १९ | मो मोहसीन मो युसुफ शरीफ | सैय्यद वसीम सैय्यद अनिस | खरेदीखत | 17 | 96 अ |
| २० | सैय्यद गबरु सैय्यद यासीन | सैय्यद अली सैय्यद गबरु | बक्षीस पत्र | 15 | 17 |
| २१ | सैय्यद गबरु सैय्यद यासीन | सैय्यद अली सैय्यद गबरु | बक्षीस पत्र | 15 | 18 |
| २२ | रमेश सीताराम देवकर | रोशन रमेश देवकर | बक्षीस पत्र | 14 | 202 |
| २३ | त्र्यंबक पुडंलीक हिवलेकर | अनिल राजेश पोपटघार व ईतर ४ | वारस प्रमाणपत्र | 9 | 204 |
| २४ | मोहम्मद अफरोज फिरोजोददीन | सिराज अहमद फिरोजोददीन व ईतर १ | हक्कसोड लेख | 10 | 148 |
| २५ | भारत भगवान शेलारकर | गजानन जगदेव शेलारकर | खरेदीखत | 6 | 45 |
| २६ | हसन अली हुसैन अली | नुर अली हुसैन अली | खरेदीखत | 16 | 39 |
| २७ | रशीदखान समदखान | रफिकखा रशीदखान | बक्षीस पत्र | 2 | 124 |
| २८ | अ बशीर शेख मेहबुब | शेख मतीन शेख मेहबुब व ईतर ७ | वारस प्रमाणपत्र | 11 | 120 |
| २९ | अमीना बी इमाम शहा व ईतर ७ | जब्बार शहा इमाम शहा व ईतर १ | हक्कसोड लेख | 15 | 160 |
| ३० | वनमाला महादेव बोबडे व इतर ४ | मनकर्णा जगन्नाथ बोबटकार व इतर २. | हक्कसोड लेख | 9 | 146 |

**मुख्याधिकारी**

# पाऊस रुसला, पिके करपली; आता २०६ कोटींच्या मदतीची प्रतीक्षा

### २.१३ लाख शेतकरी संकटात; सात तालुक्यांतील २.४१ लाख हेक्टरवरील नुकसानीचा अहवाल शासनदरबारी

**वर्धा/जनमाध्यम**

निसर्गाची अवकृपा, पावसाचा खंड आणि अल्प पर्जन्यमानाने खरीप हंगाम उद्ध्वस्त केला. शेतात उभ्या पिकांचे नुकसान झाले, उत्पादनाची आशा मावळली आणि शेतकऱ्यांवर आर्थिक संकटाचे सावट गडद झाले. जिल्ह्यातील २ लाख १३ हजार ७३९ शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने शासनाकडे तब्बल २०६ कोटी ३४ लाख ४९ हजार ५९५ रुपयांच्या मदतीची मागणी केली आहे. सात तालुक्यांतील २ लाख ४१ हजार हेक्टरवरील पिकांच्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले असून अहवाल शासनदरबारी पोहोचला आहे. मात्र, नुकसान शेतकऱ्यांचे, पंचनामे प्रशासनाचे आणि मदतीचा निर्णय शासनाच्या हाती! त्यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचे डोळे आता मदतीच्या मंजुरीकडे लागले आहेत.



यंदाच्या खरीप हंगामात पावसाने वारंवार खंड दिल्याने पिकांच्या वाढीवर परिणाम झाला. अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या आशेवर पाणी फिरले. शासनाने दुष्काळाच्या ट्रिगर-१ यादीत जिल्ह्यातील सात तालुक्यांचा समावेश केल्यानंतर नुकसानीचे संयुक्त पंचनामे करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, आष्टी, हिंगणघाट आणि समुद्रपूर या सात तालुक्यांतील पंचनामे पूर्ण करण्यात आले. कारंजा तालुका या अहवालात समाविष्ट नाही.

**हिंगणघाट, समुद्रपूरला सर्वाधिक फटका**

तालुकानिहाय आकडेवारीत हिंगणघाट तालुका सर्वाधिक बाधित ठरला आहे. येथील ४० हजार ३८८ शेतकऱ्यांसाठी ४२ कोटी ४ लाख ३२ हजार १६० रुपयांची मागणी करण्यात आली आहे. समुद्रपूरमधील ३८ हजार ८ शेतकऱ्यांसाठी ४० कोटी ६० लाख ४३ हजार ४५ रुपये, तर वर्धा तालुक्यातील ३२ हजार ६५५ शेतकऱ्यांसाठी ३१ कोटी ६० लाख ३२ हजार ५६० रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

देवळी तालुक्यातील ३० हजार ६१९ शेतकऱ्यांसाठी २७ कोटी ६२ लाख १८ हजार ३५ रुपये, आर्वीतील २६ हजार ३७१ शेतकऱ्यांसाठी २७ कोटी ६८ लाख ८ हजार ३६५ रुपये, सेलूमधील २७ हजार ४९२ शेतकऱ्यांसाठी २४ कोटी ८० लाख ४४ हजार ४३५ रुपये, तर आष्टीतील १७ हजार ८४६ शेतकऱ्यांसाठी ११ कोटी ९८ लाख ७० हजार ९९५ रुपयांची मागणी करण्यात आली आहे.

**कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण; मदतीचे काय**

नुकसान झाले, पंचनामे झाले आणि मदतीचा प्रस्तावही शासनाकडे गेला. मात्र, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष मदत पडलेली नाही. शेतीच्या खर्चाचा ताळमेळ घालताना शेतकऱ्यांची दमछाक होत असताना मदतीच्या मंजुरीला विलंब झाल्यास त्यांच्या अडचणी आणखी वाढण्याची भीती आहे. त्यामुळे २०६ कोटींच्या मागणीला शासन कधी मंजुरी देणार आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम कधी जमा होणार, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

## दुष्काळाशी दोन हात, काजळ सरात श्रमदानातून वनराई बंधारा

### जनसहभागातून पाणी अडवा, पाणी जिरवा; पशुधनाच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत



**हिंगणघाट/जनमाध्यम**

दुष्काळाचे सावट गडद होत असताना पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी काजळसरा ग्रामपंचायतीने श्रमदानातून पुढाकार घेतला आहे. गावातील स्मशानभूमीलगतच्या नाल्यावर वनराई बंधारा उभारून पाणी अडविण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमात ग्रामपंचायत अधिकारी गणेश उगे, सहायक कृषी अधिकारी विनल पोहाणे, ग्रामपंचायत कर्मचारी हनुमान डोंगरे, रोजगार सेवक दिलीप क्षीरसागर यांच्यासह गावातील नागरिकांनी श्रमदान केले. दुष्काळी परिस्थितीत नाल्यातील पाणी अडविल्यामुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास मदत होणार आहे.

तसेच परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीत वाढ होऊन भूजलसाठा समृद्ध होण्याची शक्यता आहे.

## दुर्गोत्सवात भक्तीचा जागर, बालकलागुणांना प्रोत्साहन

### दिघी येथे २१ स्पर्धकांचा सहभाग

**देवळी/जनमाध्यम**

नवरात्रोत्सवाच्या भक्तिमय वातावरणात देवळी तालुक्यातील दिघी (बोपापुर) येथे रविकिरण दुर्गा पूजा उत्सव समितीच्या वतीने दसऱ्याच्या दिवशी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात २१ स्पर्धकांनी सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले.



ग्रामीण भागातील मुला-मुलींना कलागुण सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळावे, त्यांच्यातील सुप्त प्रतिभेला प्रोत्साहन मिळावे आणि आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धकांच्या सादरीकरणाला उपस्थित ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे आणि शालेय साहित्याचे किट भेट देऊन गौरविण्यात आले. धार्मिक उत्सवाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत बालकांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याचा स्तुत्य उपक्रम समितीने राबविला.

या कार्यक्रमात जागृती ठाकरे, रुद्राक्षी ठाकरे, रुपाली मेश्राम, रुद्रा नाखले, शारदा आगिरकर, गुंजन जुगनाके, छकुली आडे, सोहम दिघीकर, श्रावणी बावणे, विराज दिघीकर, नैतिक दिघीकर, पूर्वी कुमरे, ऋतुजा ठाकरे, प्रतिक भोयर आदी स्पर्धकांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आशिष दिघीकर, अमोल दिघीकर, सिद्धार्थ अवथरे, आकाश आडे, रजत कांबळे, सागर ढोक यांच्यासह समिती सदस्यांनी परिश्रम घेतले. गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक परंपरेला सांस्कृतिक उपक्रमांची जोड देणाऱ्या या आयोजनामुळे गावातील सामाजिक एकोपा दृढ होण्यासह नवोदित कलागुणांना प्रोत्साहन मिळाले.

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन

**वर्धा-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना तातडीने आधार प्रमाणीकरण व ई-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. या योजनेनुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत राष्ट्रीयकृत, जिल्हा व खासगी बँकांकडून पीक कर्ज उचल केलेल्या आणि ३१ मार्च २०२६ रोजी थकबाकी असलेल्या कर्जदारांचे २ लाखांपर्यंतचे कर्ज माफ केले जाणार आहे. दोन लाखांपेक्षा जास्त कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना एकवेळ समझोता योजनेंतर्गत २ लाखांवरील रकमेची प्रथम परतफेड करावी लागेल, त्यानंतरच त्यांना २ लाखांचा लाभ मिळेल. तसेच २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे.

## गुन्हे वृत्त

### दीक्षाभूमीला जाण्यास विरोध; महिलेवर हल्ला

**वडनेर -** नागपूर येथील दीक्षाभूमीला जाण्यास विरोध करीत पतीने मारहाण केली, तर सासूनेही शिवीगाळ करीत हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याची तक्रार एका महिलेने वडनेर पोलिसांत दिली. या प्रकरणी पती अमोल भिमराव भगत आणि सासू प्रेमिला भिमराव भगत यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. टाकळी (निधा) येथील महिला २० ऑक्टोबर रोजी दीक्षाभूमीला जाण्यासाठी निघाली असता पतीने तिला विरोध केला. यावरून झालेल्या वादात त्याने गळा पकडून हाताबुक्क्यांनी तसेच लाथांनी छातीवर मारहाण केली. डोळ्याला सूज आली आणि नाकातून रक्तस्त्राव झाला. त्यानंतर सासूनेही शिवीगाळ करीत मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. जखमी महिलेला प्राथमिक उपचारानंतर सेवाग्राम येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले. उपचारानंतर तिने पोलिसांत तक्रार दिली. वडनेर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### ऑटोत लपून बसलेले तिघे पोलिसांच्या ताब्यात

**सेलू -** अंधारात ऑटोचे पडदे लावून लपून बसलेल्या तिघांना सेलू पोलिसांनी ताब्यात घेतले. ही घटना आकोली परिसरात घडली. याप्रकरणी मोहम्मद दिलेर खान, गोपी भागवत गायकवाड आणि रंजना महेश कुराडे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तिघे ऑटोमध्ये अंधारात लपून बसले होते. त्यांच्याकडे परिसरात अशा प्रकारे थांबण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यामुळे पंचांच्या उपस्थितीत त्यांची अंगझडती घेण्यात आली. मात्र, झडतीत कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. प्राथमिक तपासात तिघे संगनमताने चोरीसारखा दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने लपून बसल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला. या प्रकरणी सेलू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### तक्रार का केली म्हणत महिलेला शिवीगाळ

**सेवाग्राम -** पोलिसांत तक्रार का केली, असा जाब विचारत महिलेला अश्लील शिवीगाळ करून तिच्यासह पती आणि मुलाला जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना करंजी (काजी) येथील गायत्रीनगर परिसरात घडली. याप्रकरणी हर्षल घनश्याम नेहारे याच्याविरुद्ध सेवाग्राम पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादी चंदा गुरुदास चवरे यांच्या तक्रारीनुसार, आरोपी त्यांच्या घरासमोर राहतो. २२ ऑक्टोबर रोजी त्याने त्यांच्या मुलाला शिवीगाळ करीत मारण्याची धमकी दिली. याबाबत जाब विचारल्यावर महिलेलाही शिवीगाळ करण्यात आली. सायंकाळी पुन्हा भेट झाल्यानंतर पोलिसांत तक्रार का दिली, असे म्हणत आरोपीने अश्लील भाषेत अपमान केला. तसेच पती आणि मुलाला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकारामुळे कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असल्याचे महिलेने म्हटले आहे. सेवाग्राम पोलीस तपास करीत आहेत.

### चारचाकीची दुचाकीला धडक; चालकाकडून मारहाण

**वर्धा -** भरधाव चारचाकीने दुचाकीला धडक दिल्यानंतर झालेल्या वादात दुचाकीस्वाराला शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना शहरातील गजाननगर परिसरात दुर्गामाता मंदिराजवळ घडली. याप्रकरणी रामनगर पोलिसांत अज्ञात चारचाकी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादी निहाल चंद्रजीतसिंग टागोर हे २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी दुचाकीने जात असताना पांढऱ्या रंगाच्या टाटा एस वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेत दुचाकीच्या दरवाजासह साइड मिररचे नुकसान झाले. यानंतर वाहनचालकाने फिर्यादीला शिवीगाळ करून हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. मारहाणीत नाकाला दुखापत होऊन रक्तस्त्राव झाल्याचेही त्यांनी सांगितले. आरोपीने जीवे मारण्याची धमकी देत घटनास्थळावरून पळ काढला. या घटनेत सुमारे ३५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याची तक्रार आहे. रामनगर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### अंधारात संशयास्पदरीत्या फिरताना तरुण ताब्यात

**सावंगी (मेघे) -** कारला गावातील लोकवस्तीपासून दूर असलेल्या परिसरात अंधारात संशयास्पदरीत्या आढळलेल्या तरुणाला सावंगी पोलिसांनी ताब्यात घेतले. अमोल ज्ञानेश्वर धानोरकर असे त्याचे नाव असून त्याच्याकडून चाकू, दोन नंबर प्लेट आणि दुचाकी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० ते ७ वाजेदरम्यान आरोपी अंधारात स्वतःचे अस्तित्व लपवून थांबलेला आढळला. तेथे थांबण्याबाबत त्याने समाधानकारक उत्तर दिले नसल्याने पोलिसांनी ताब्यात घेतले.

## जनसंवाद झाला, समस्या कायम! सिंदीकरांना आश्वासनांचा कंटाळा

### कोरोनाकाळात बंद झालेले रेल्वे थांबे पूर्ववत करण्याची मागणी

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

रेल्वे प्रशासन आणि प्रवाशांमधील संवाद वाढविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'रेल्वे जनसंवाद' कार्यक्रमात सिंदीकरांनी वर्षानुवर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांचा पाढा वाचला. रेल्वे अधिकारी जयंत रामदासी यांनी प्रवाशांच्या समस्या ऐकून घेतल्या आणि त्या वरिष्ठांपर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले. मात्र, अनेक वर्षांपासून त्याच समस्या कायम असल्याने जनसंवादातून तरी प्रत्यक्ष उपाययोजना होणार का, असा प्रश्न प्रवाशांनी उपस्थित केला आहे.

मध्य रेल्वे विभागाच्या वतीने सिंदी रेल्वे स्थानकावर 'आपकी बात, हमारा प्रयास, बेहतर कल' या ब्रीदवाक्याखाली जनसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी अंजनी येथील रेल्वे अधिकारी जयंत रामदासी यांनी प्रवाशांच्या अडचणी जाणून घेतल्या. मात्र, यापूर्वीही अनेक निवेदने, अर्ज आणि पत्रे देऊनही प्रश्न सुटले नसल्याची खंत प्रवाशांनी व्यक्त केली. त्यामुळे केवळ समस्या ऐकून घेण्यापुरता कार्यक्रम मर्यादित न ठेवता त्यावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

सिंदी रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक एकची उंची वाढविणे, प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर स्वच्छतागृह आणि प्रकाशाची व्यवस्था करणे, तसेच संपूर्ण स्थानकावर नियमित स्वच्छता राखणे या प्रमुख मागण्या प्रवाशांनी मांडल्या. स्थानकावरील ५५ पायऱ्या चढणे-उतरणे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि आजारी प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत आहे. त्यामुळे येथे एस्केलेटरची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली.

कोरोना काळात बंद करण्यात आलेले रेल्वेगाड्यांचे थांबे पूर्ववत करण्याची मागणी प्रवाशांनी विशेषत्वाने केली. अप आणि डाउन शालीमार एक्स्प्रेस, महाराष्ट्र एक्स्प्रेसच्या अप गाडीला तसेच भुसावळ आणि काझीपेट पॅसेंजर गाड्यांना पूर्वीप्रमाणे थांबा देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

या मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने आता केवळ आश्वासनांवर समाधान मानण्यास प्रवासी तयार नसल्याचे चित्र आहे. जयंत रामदासी यांनी सर्व मागण्यांची नोंद घेऊन त्या वरिष्ठांपर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले. यावेळी सिंदी रेल्वे स्थानकाचे स्टेशन मास्तर सुनील कुमार यांच्यासह प्रवाशांच्या वतीने दत्ता कोपरकर, ओमप्रकाश राठी, अमोल सोनटक्के, धनराज झिलपे, प्रमोद चव्हाण, सुनील रेवतकर आदी उपस्थित होते.

## विहिरीने तळ गाठला, शेतकऱ्याने मोसंबी बागच तोडली

### दोन एकरांतील २०० झाडांवर कुऱ्हाड; दुष्काळ आणि कवडीमोल भावाने शेतकरी उद्ध्वस्त

**साहूर/जनमाध्यम**

वर्षानुवर्षे लेकराप्रमाणे जपलेली मोसंबीची बाग डोळ्यांदेखत उद्ध्वस्त करण्याची वेळ शेतकऱ्यावर यावी, यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते विहिरीने तळ गाठला, पाण्याअभावी झाडांची होरपळ सुरू झाली आणि बाजारातही अपेक्षित भाव मिळेना. या दुहेरी संकटाने हतबल झालेल्या तारासावंगा येथील शेतकरी विनायक हेडाऊ यांनी अखेर दोन एकरांतील सुमारे २०० मोसंबीच्या झाडांवर कुऱ्हाड चालवली.



या निर्णयामुळे त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येते.

मोसंबीची बाग फुलविण्यासाठी खते, कीटकनाशके, फवारणी, मजुरी आणि देखभालीवर मोठा खर्च करावा लागतो. मात्र, यंदाच्या अल्प पावसामुळे विहिरींची पाणीपातळी खालावली. पाण्याअभावी झाडे सुकू लागली, फळगळ वाढली. त्यात बाजारातील नगण्य दरामुळे उत्पादन खर्चही भरून निघण्याची शाश्वती उरली नाही.

चांगल्या उत्पन्नाच्या आशेने जपलेल्या बागेची अशी वाताहत झाल्याने हेडाऊ यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. तारासावंगा, साहूर, माणिकवाडा, धाडी परिसरातही मोसंबी उत्पादक शेतकरी पाणीटंचाईच्या संकटाला सामोरे जात आहेत.

**घाम गाळूनही हातात निराशाच!**

निसर्गाची अवकृपा आणि बाजारभावाची मार झेलणाऱ्या शेतकऱ्याने शेती करायची तरी कशी, हा प्रश्न हेडाऊ यांच्या उजाडलेल्या बागेतून पुन्हा ऐरणीवर आला आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ३२६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संशोधनातून नोबेल विजेते घडविण्याचे स्वप्न

### इंद्रप्रस्थ कॉलेजमध्ये आविष्कार संशोधन महोत्सव उत्साहात

**वर्धा/जनमाध्यम**

ज्ञान आणि संशोधनाच्या बळावर जागतिक स्तरावर ठसा उमटविणारे, नोबेल पुरस्कार मिळविण्याची क्षमता असलेले विद्यार्थी घडविणे हेच आमचे ध्येय आहे, असे प्रतिपादन डॉ.संजय ढोबळे यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित आविष्कार संशोधन महोत्सव २०२६-२७ ची जिल्हास्तरीय निवड चाचणी २२ ऑक्टोबर रोजी नालवाडी येथील इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये उत्साहात पार पडली. अध्यक्षस्थानावरून डॉ. ढोबळे बोलत होते.



जिल्ह्यातील १०० विद्यार्थ्यांनी या महोत्सवात नावीन्यपूर्ण संशोधन संकल्पना आणि मॉडेल्स सादर केली. पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी.चे विद्यार्थी यात सहभागी झाले. मानवविद्या, वाणिज्य, व्यवस्थापन, शुद्ध विज्ञान, कृषी, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, वैद्यक आणि औषधनिर्माणशास्त्र अशा सहा क्षेत्रांतील प्रकल्पांनी लक्ष वेधले.

संशोधन समाजोपयोगी ठरावे - विद्यार्थ्यांनी संशोधन केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित न ठेवता समाजातील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी त्याचा उपयोग करावा, असे आवाहन डॉ. ढोबळे यांनी केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.विजय तांगडे यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला दिला. डॉ.अभिजित वेरूळकर यांनी संशोधनात सातत्य, चिकित्सक वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित केले.

जिल्हा संयोजक प्रा.संदीप पेटारे यांनी प्रास्ताविक केले. तज्ज्ञ परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे परीक्षण केले. प्रा.आश्लेषा तोवर यांनी संचालन केले, तर प्राचार्य डॉ.आशिष ससणकर यांनी आभार मानले.

MAHAVITARAN

## Quotation/Enquiry Notice

Separate sealed quotation in prescribe forms are invited for execution of enquiry for

1) Work contract for switching ON/OFF water pump & filling of water tank at Rest House and MSEDCL colony at Morshi Road under Urban Division, MSEDCL Amravati. (EE/U/Amt/T/3619 Dt. 22.10.2026).

2) Work of upgradation of desktop computer & printer at various offices under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/3667 Dt. 22.10.2026).

**Last date for submission of quotation – 29.10.2026.**

**PRO 211/2026**

**EXECUTIVE ENGINEER, URBAN DIVISION, MSEDCL, AMRAVATI.**

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार **सुनिल सुखदेवराव गणविर, रा.काट आमला, ता.जि.अमरावती** यांनी **सौरभ विनोद गणविर, रा.शहापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** यांचे विरुध्द मौजे काट आमला, ता.जि.अमरावती येथील गट क्र. व उपविभाग क्र.६६/१, एकुण क्षेत्रफळ १ हे १२ आर यापैकी १/२ अविभाजीत हिस्साचे शेत जमीनीसोबत विद्यमान दिवाणी न्यायालय, अमरावती येथे दावा दाखल केला असून सदर दाव्याचा क्रमांक नियमित दिवाणी दावा क्र.३४२/२०२५ असा असून सदरचा दावा विद्यमान ९ वे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात प्रलंबित असून सदरचे प्रकरणात सौरभ विनोद गणवीर त्यांचे अधिवक्ता मार्फत हजर झाले आहे.

वर नमुद मिळकती बाबत वाद हा न्यायप्रविष्ठ असल्यामुळे व सदरचा १/२ अविभाजीत हिस्सा हा माझे पक्षकार सुनिल सुखदेवराव गणविर यांचे मालकी हक्काने ताब्यात असल्यामुळे सदरच्या मिळकतीबाबत कोणीही कोणताही व्यवहार कोणासोबतही करु नये, केल्यास तो माझे पक्षकारास बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**स्थळ - अमरावती**
**दिनांक - २३/१०/२०२६**

**सही/-**
**(ॲड.प्रसाद ह.पिंपळगावकर)**
**गोविंद, वैभव कॉलनी, बायपास रोड,**
**अमरावती- ४४४ ६०७**
**मो.नं.- ९८२३७४८२७०**

## -जाहीर नोटीस-

**विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, मोर्शी**

**मि.कि.के.नं. ३५१/२०२६** **ने.ता. २३/११/२०२६**

**अर्जदार-** **कु.मयुरी बंडू शिर्के, वय १८ वर्ष, धंदा- शिक्षण**
रा.राजुरवाडी, ता.मोर्शी, जि.अमरावती

**गैरअर्जदार-** **निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय, राजुरवाडी, ता.मोर्शी, जि.अमरावती**

या नोटीसव्दारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार नामे **कु.मयुरी बंडू शिर्के** हिचा **जन्म दिनांक २७/०९/२००८** रोजी **राजुरवाडी** येथे झालेला आहे. अर्जदाराचे आईवडिलांनी किंवा त्यांचे इतर कोणत्याही नातेवाईकांनी त्याच्या जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय राजुरवाडी** किंवा इतर कोणत्याही शासकीय कार्यालयांत केलेली नाही. अर्जदाराला वैयक्तीक कामाकरिता जन्माच्या दाखल्याची गरज असल्याने अर्जदाराने जन्म मृत्यू नोंदणी सुधारित अधिनियम २०२६ चे कलम ३ (अ) नुसार त्यांच्या जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना देण्याबाबत सदरचे प्रकरण विद्यमान न्यायालयांत दाखल केले असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यांस त्यांनी प्रसिध्दी तारखेपासून एक महिन्यांच्या आंत विद्यमान न्यायालयांत आपले म्हणणे सादर करावे अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप किंवा हरकत नाही असे गृहित धरुन अर्जावर सुनावणी करुन अर्जदार नामे **कु.मयुरी बंडू शिर्के** हिचा जन्म दिनांक २७/०९/२००८ रोजी असल्याबाबतची जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना दिल्या जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक - १५/१०/२०२६**

**आदेशानुसार**
सही/-
(**सहाय्यक अधिक्षक**)
दिवाणी व फौजदारी न्यायालय, मोर्शी

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर

## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **नसरीन सहेर अजहर अली**, पत्ता अशरफपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२४ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/32308 जुना मालमत्ता क्र. 24000MyMi नझुल शिट क्र.२६ प्लॉट नं.३ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **मोहम्मद युसूफ मोहम्मद इद्रीस** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या नसरीन सहेर अजहर अली नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये /क्षेत्रामध्ये/दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **१३.१०.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

**पुर्वेस** - तुकडा नंबर २९
**पश्चिमेस** - तुकडा नंबर ३१
**दक्षिणेस** - प्लॉट नंबर ३३
**उत्तरेस** - लेआऊट मधील रोड ४ मिटरचा

शिक्का

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

## नगर परिषद कार्यालय, अचलपूर

## जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **मोहम्मद नईम मोहम्मद कासम** पत्ता **हिरापुरा**, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२४ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/3885 जुना मालमत्ता क्र. 24000293 नझुल शिट क्र.२५-अे प्लॉट नं.७६ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **म.कासम अ.सुभान** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **न्मोहम्मद नईम मोहम्मद कासम** नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये /क्षेत्रामध्ये/दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **१२.०८.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

**पुर्वेस** - मेन रोड
**पश्चिमेस** - वाडी
**दक्षिणेस** - नवलकर टेलर्स
**उत्तरेस** - अबरार भाई घर

शिक्का

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **रीशीत विनायकराव गावंडे** यांचे वतीने सदर जाहीर सुचना देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन-मौजे- दुर्गवाडा,शेत सर्वे क्र.5/2 मधील प्लॉट क्र. 19 ज्याचे एकूण क्षेत्रफळ 3002.04 चौ.फुट,(२७९ चौ.मी.) ता.मोर्शी आणि जिल्हा अमरावती.**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **रीशीत विनायकराव गावंडे यांनी दि.१३/१०/२०२६ रोजीचे दस्त क्र.३४२२ च्या बक्षिस पत्रानुसार श्री विनायक गणपतराव गावंडे** यांच्या कडून मिळाले आहे. व तेव्हापासून त्यांच्या एकमेव मालकीची आहे. तसेच **सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ बक्षीसपत्र श्री गणपतराव आप्पाजी गावंडे यांनी श्री धनराज गणपतराव गावंडे आणि श्री हेमराज गणपतराव गावंडे यांच्यात झाले होते ते गहाळ हरविले आहे. सदर बक्षिसपत्र ज्यांचा दि.28/09/2017 रोजीचे दस्त क्र.1883 आहे.**

तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **3 दिवसांच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, करीता ही जाहीर सूचना देत आहे.

**ठिकाण- मोर्शी- अमरावती**
**दि.23/10/2026**

**आपला,**
***ADVOCATE***
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं. 9823698745**

शिक्का

**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय**

आर.एम.जे.सी.क्र.२२४/२०२६ ने.ता.२६.११.२०२६

**जाहीरनामा**

**अर्जदार :**
१. **श्रीमती वत्सला कमलाकर कुंभलकर,** वय ५५ वर्षे, व्यवसाय - शेती व घरकाम
२. **श्री सागर कमलाकर कुंभलकर,** वय ३३ वर्षे, व्यवसाय - शेती
दोघेही रा.मांजरखेड कसबा, वार्ड नं. ३, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
३. **सौ.सविता वसंत साखरवाडे,** वय ३७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.शिरजगांव मोझरी, ता.तिवसा, जि.अमरावती
४. **ज्योत्सना संतोष भुरे,** वय ४१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.अंजनगाव बारी, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :-** निरंक

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **श्रीमती वत्सला कमलाकर कुंभलकर व इतर** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **कमलाकर मारोती कुंभलकर** यांचा मृत्यू दिनांक ०३.०२.२०२६ रोजी मांजरखेड कसबा, चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक १६ माहे सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, चांदूर रेल्वे

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७५६/२०२६
**कमलाबाई अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२४.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kamalabai Ashok Jaiswal, Age 63 Yrs. Occu.: Household
2. Dhananjay Ashok Jaiswal, Age 26 Yrs. Occu.: Education
3. Tejaswini Ashok Jaiswal, Age 22 Yrs. Occu.: Education
Appli.No.1 to 3 R/o Saraswati Nagar, Near VMV, Amravati.
4. Vaishanvi Ashok Jaiswal @ Sau.Vaishanvi Amolkumar Jaiswal
Age 30 Yrs. Occu.: Household
R/o Mishra Line, Sardarbazar Paratwada, Tq.Achalpur, Dist.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ashok Daduprasad Jaiswal हे दिनांक 09.04.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Kamalabai Ashok Jaiswal + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kamalabai Ashok Jaiswal + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१६८/२०२६
**श्रीमती मंगला रामदास गेडेकर अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२७.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Mangala Wd/o Ramdas Gedekar, Age 60 Yrs. Occu.: Household
R/o Sant Tukdoji Ward, Hinganghat, Tq.Hinganghat Dist.Wardha
2. Dipali W/do Sunil Hiwarkar, Age 44 Yrs. Occu.: Housewife
R/o Dahegaon Mustafa, Tq. Arvi, Dist.Wardha
3. Rupesh S/o Ramdas Gedekar, Age 42 Yrs. Occu.: Pvt.Servicer
R/o MHADA Colony, Bidkar Layout, Near Mohata Garden, Sant Tukdoji Ward, Hinganghat
4. Reena W/o Khemraj Shivankar, Age 38 Yrs. Occu.: Housewife
R/o Nawathe Nagar, Sainagar, Amravati. Tq. Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ramdas Ganpat Gedekar हे दिनांक 05.01.2025 रोजी **सेवाग्राम** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Mangala Wd/o Ramdas Gedekar+3 -Vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Mangala Wd/o Ramdas Gedekar+3 -Vs- Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## जाहीर सुचना

सर्व आम जनतेस व हितसंबंधित लोकांना या जाहीर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, जिल्हा परिषद, अमरावती, नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण कचेरीचे कक्षेतील मौजे उदखेड, ता.जि.अमरावती येथील गट नं.१३१, उपविभाग क.१११, क्षेत्रफळ १ हे.९१ आर, भोगवटदार वर्ग-१ जिरायत शेतजमिनीबाबत विद्यमान दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, अमरावती येथे अंमलबजावणी प्रकरण प्रलंबित असून सद्यस्थितीत प्रकरण निकाली न निघालमुळे कोणीही ईसम वरील शेतजमिनीबाबत कोणताही खरेदी-विकी तसेच गहाण, व ईतर व्यवहार करु नये. तसे केल्यास बेकायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच भविष्यात होणाऱ्या नुकसानीस तो स्वतः जबाबदार राहील.

करीता आम जनतेच्या माहितीकरीता व हितसंबंधीतांच्या माहितीकरीता सदरची जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

ठिकाण- अमरावती
दिनांक- २४.०९.२०२६

सौ.पी.इधाने
सौ.प्रमाबाई उर्फ प्रेमिला उर्फ पुष्पा मोतीसिंग इंधाने
रा.प्रभ कॉलनी, जलाराम नगर,
फरशी स्टॉप, अमरावती
मो.९४२२१९५८०४

## -जाहीर नोटीस-

**विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, मोर्शी**

**मि.कि.के.नं. ३४१/२०२६** **ने.ता. १७/११/२०२६**

**अर्जदार-** **नसिमाबी साजीद रंगारी, वय ४३ वर्ष, धंदा- घरकाम**
**(लग्नापुर्वीचे नांव- नसिमाबी अब्दुल रज्जाक )**
रा.बाळापुर, ता.बाळापुर, जि.अकोला

**गैरअर्जदार-** **निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय,अंबाडा,ता.मोर्शी, जि.अमरावती**

या नोटीसव्दारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार नामे **नसिमाबी अब्दुल रज्जाक** हिचा **जन्म दिनांक १८/०३/१९८३** रोजी तिचे माहेरी **अंबाडा** येथे झालेला आहे. अर्जदाराचे आईवडिलांनी किंवा त्यांचे इतर कोणत्याही नातेवाईकांनी त्याच्या जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय अंबाडा** किंवा इतर कोणत्याही शासकीय कार्यालयांत केलेली नाही. अर्जदाराला वैयक्तीक कामाकरिता जन्माच्या दाखल्याची गरज असल्याने अर्जदाराने जन्म मृत्यू नोंदणी सुधारित अधिनियम २०२६ चे कलम ३ (अ) नुसार त्यांच्या जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना देण्याबाबत सदरचे प्रकरण विद्यमान न्यायालयांत दाखल केले असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यांस त्यांनी प्रसिध्दी तारखेपासून एक महिन्यांच्या आंत विद्यमान न्यायालयांत आपले म्हणणे सादर करावे अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप किंवा हरकत नाही असे गृहित धरुन अर्जावर सुनावणी करुन अर्जदार नामे **नसिमाबी अब्दुल रज्जाक** हिचा जन्म दिनांक १८/०३/१९८३ रोजी झाल्याबाबतची जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना दिल्या जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक - १५/१०/२०२६**

शिक्का

**आदेशानुसार**
सही/-
(**सहाय्यक अधिक्षक**)
दिवाणी व फौजदारी न्यायालय, मोर्शी

## जाहीरनामा

**श्रीमती रोहिणी वि. मनोरे, दिवाणी न्यायाधिश (क.स्तर.) तिवसा, जि.अमरावती यांचे न्यायालय**

**आर.एम.जे.सी.क्र.२१६/२०२६** **ने.ता.०६.११.२०२६**

**अर्जदार -**
१. **श्रीमती अरमला शाहु पवार,** वय ४२ वर्षे, कामधंदा - घरकाम
२. **करणसिंग शाहू पवार,** वय २५ वर्षे, कामधंदा - मजुरी
आधार नंबर- ६४०० १९५० ६४२०
३. **सुरेसिंग शाहु पवार,** वय २७ वर्षे, कामधंदा - घरकाम
आधार नंबर-२२६३ ०६३३ ३८६०
४. **अनिस शाहु पवार,** वय २३ वर्षे, कामधंदा - मजुरी
आधार नंबर- ५४०७ ५७३६ ८२६२
५. **अमीन सुनिल भोसले,** वय २१ वर्षे, कामधंदा - मजुरी
आधार नंबर- ७९१६ ९०७२ ६६३४
सर्व रा.शेंदोळा, वार्ड नं.१,शेंदोळा बू., ता.तिवसा, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार -** निरंक

या नोटीस व्दारे सर्व लोकांस सुचित करण्यात येते की,**श्रीमती अरमला शाहु पवार व इतर** यांनी दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) तिवसा यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **बयना झाम पवार** यांचा मृत्यू दिनांक **२४/१०/२०१५** रोजी राहते घरी शेंदोळा वार्ड नंबर १, शेदोळा बु.ता.तिवसा, जि.अमरावती येथे झालेला आहे. अर्जदार यांचे शिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केले आहे.

वरील प्रमाणे सदर्हू **बयना झाम पवार** मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक **१६ माहे ऑक्टोंबर २०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, तिवसा

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०७२/२०२६
Pushpa Paul Shinde+2 **-वि- निरंक**
पुढील ता.१७.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Pushpa Paul Shinde, Age 54 Yrs. Occu.: Household
R/o Samadhan Nagar, Camp Amravati. Tq. Dist. Amravati
2. Sonali Paul Shinde, (After Marriage - Sonali Livan)
Age 67 Yrs. Occu.: Household
R/o Samadhan Nagar, Camp Amravati. Tq. Dist. Amravati
3. Shubham Paul Shinde, Age 27 Yrs. Occu.: Pvt. Job
R/o Samadhan Nagar, Camp Amravati. Tq. Dist. Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Paul Balwant Shinde हे दिनांक 06.10.2011 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Pushpa Paul Shinde + 2 -vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Pushpa Paul Shinde + 2 -vs- Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२००४/२०२६
Vanita Jagannath Ubhalkar -vs-Nil **-वि- निरंक**
पुढील ता.०५.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Vanita Jagannath Ubhalkar, Age 79 Yrs. Occu.: Household
2. Pravin Jagannath Ubhalkar, Age 52 Yrs. Occu.: Labour
Both R/o Near Kranti Colony, Sneha Gandha Colony, Sainagar, Amravati
3. Surekha Santosh Dhayade, Age 49 Yrs. Occu.: Household
R/o Near Divekar School, Chhoti Umari, Akola
4. Deepali Jagannath Ubhalkar, Age 45 Yrs. Occu.: Houssehold
R/o Rajhil Nagar, HVPM Po.Amravati.
5. Sunanda Subhash Ingle, Age 54 Yrs. Occu.: Household
R/o 21, Shyam Nagar infront of Mount Carmel School, Vijay Nagar, Indore (M.P.)

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Jagannath Machhindranath Ubhalkar हे दिनांक 09.02.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Vanita Jagannath Ubhalkar -vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Vanita Jagannath Ubhalkar -vs- Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०१.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१५५/२०२६
**फिरोजा अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.१६.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Feroza Zoaib Bandookwala, Age 73 Yrs. Occu.: Household work
2. Mariya Dilwar Hussain Lightwala
Mariya Zoaib Bandookwala (Before Marriage)
Age 45 Yrs. Occu.: Household work
R/o Niyati Esteban, Mohamadwadi Pune, Dist.Pune
3. Safiya Murtuza Saifee
(Safiya Zoaib Ahmed Bandookwala)(Before Marriage)
Age 42 Yrs. Occu.: Household work
R/o Datta Mandir Road, Mahadeopura, Wardha, Dist.Wardha
4. Aaun Zoaib Bandookwala, Age 37 Yrs. Occu.: Business
5. Mohammad Ali Zoaib Ahmed Bandookwala, Age 73 Yrs. Occu.:Business
Appli.No.1, 4 & 5 R/o Hatim House Near Nagpuri Gate, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Zoaib Ahmed Hatim Ali Bandookwala हे दिनांक 29.06.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Feroza Zoaib Bandookwala + 4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Feroza Zoaib Bandookwala + 4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१४.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## -जाहीर नोटीस-

**सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) तथा प्र.श्रे.न्यायदंडाधिकारी,चांदूर बाजार**

कि.फौ.अर्ज क्र.३६०/२०२६ ने.ता.२६/११/२०२६

**- अर्जदार-** **वर्षा तुळशिदास आमले (लग्नानंतरचे नांव)**
**सूर्यकांता भिमरावजी गोहाड (लग्नापुर्वीचे नांव)**
रा.आदर्श कॉलेज जवळ, बालाजी नगर, धामणगाव रेल्वे,
ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती

**-गैरअर्जदार-** **ग्रामविस्तार अधिकारी/सचिव ग्रामपंचायत कार्यालय**
करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

ज्या अर्थी उपरोक्त वरील अर्जदार यांनी गैरअर्जदारा विरुध्द जन्म- मृत्यू नोंदणी दुरुस्ती अधिनियम २०२६ चे कलम ३ (अ) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी सदर अर्जास गैरअर्जदार अथवा इतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आंत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने नेमलेल्या वकीलासह सह दिवाणी व फौजदारी न्यायालय क्र.२ चांदूर बाजार येथे हजर राहावे. अन्यथा गैरअर्जदाराच्या गैरहजेरीत प्रकरण पुढे चालविण्यात येईल.

आज दि.२२/११/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या सही शिक्क्यांनी दिले.

दिनांक - २२/११/२०२६

शिक्का

**आदेशानुसार**
**सही/-**
**क.लिपिक**
**सह दिवाणी न्यायालय (क.स्तर)**
**चांदूर बाजार**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **पूजा अभिजीत महल्ले व डॉ.केतकी कौस्तुभ ठाकरे, दोघेही रा. परतवाडा, अमरावती** यानी **सुमंत मारोतराव बहादेकर रा. रो हाऊस नं.२/१३, विंडसर, इस्टेट, कल्याणी नगर, वाडगाव शेरी, पुणे ४११०१४** यांच्याशी त्यांनी दिनांक २१/०५/१९९६ रोजीचे अनु.दस्त.क्र.१३६७/१९९६ नुसार खरेदी केलेली व त्यांच्या मालकीची व ताब्यातील खालील वर्णित स्थावर मालमत्ता (प्लॉट) विकत घेण्याचा सौदा कायम करीत आहे.

**स्थावर मालमत्तेचे (प्लॉटचे) वर्णन :-** "नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व अमरावती महानगरपालिकेच्या हददीतील मौजे- नवसारी, प्र.- नांदगाव पेठ,, ता.जि.अमरावती येथील शेत स.नं. ३६/१ मधील मंजुर लेआउट मधील प्लॉट क्र.३ (तीन) (गाव नमुना सात प्रमाणे भूमापन क्र.व प्लॉट क्र.३६/१/क/१/३) याची लांबी रुंदी ४५ x ६० फुट असून याचे एकूण क्षेत्रफळ २५०.९२ चौ.मि.(चौ.फुट २७००) असून याची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस :- प्लॉट क्र.४, पश्चिमेस :- प्लॉट क्र.२
उत्तरेस :- लेआउट मधील ३० फुटाचा रोड दक्षिणेस :- दुसरे लेआउट"

त्याअर्थी वरील वर्णित मालमत्तेबाबत कोणाचाही गहाण, बोजा,हक्क, हितसंबंध, वारसाहक्क व ईतर कोणतीही भानगड असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास , इतर अधिकार जे कायदेशिररित्या अडथळा करतील असे व्यवहार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून **०७ (सात)** दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळवावे. अन्यथा कोणालाही कुठल्याही प्रकारची हरकत/ तक्रार नाही असे समजून सौदा करण्यात येईल व त्यानंतर वरील सर्व प्रकारचे व्यवहार आमच्यावर बंधनकारक राहणार नाही. तथा आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कसलाही उजर/ अधिकार/हक्क/ तक्रार इत्यादी चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

करिता ही नोटीस जाहीर करत आहे.

**दिनांक :- २५/१०/२०२६**
**ठिकाण :- अमरावती**

**सही/-**
**(ॲड.निलेश ज.पुंड)**
१०२, गजानन अपार्टमेंट, मोहन कॉलनी
अर्जुन नगर, अमरावती
**मो.नं.- ८४२१७२२१११**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७३०/२०२६
**शशिकला व दोन -वि- निरंक**
पुढील ता.२२.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shashikala Ramchandra Tidake, Age 80 Yrs. Occu.: Nil
R/o Sawata Chowk, Walgaon, Tq. Dist. Amravati.
2. Sangita Rajendra Raut, Age 50 Yrs. Occu.: Housewife
R/o Ward No.1, Yeoti Tq.NandgaonKhandeshwar Dist.Amravati.
3. Rajeshri Satish Chaudhari, Age 46 Yrs. Occu.: Housewife
R/o Chichpur, Tq.Dhamangaon Railway, Dist.Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ramchandra Rajaramji Tidke हे दिनांक 26.03.2024 रोजी **वलगांव, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Shashikala Ramchandra Tidake+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shashikala Ramchandra Tidake+2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१४०/२०२६
Brahamhanand Arjundas Meghani+4 **-वि- निरंक**
पुढील ता.२५.११.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Brahamhanand Arjundas Meghani, Age 67 Yrs. Occu.: Nil
2. Meena Rajkumar Meghani, Age 60 Yrs. Occu.: Household
Both R/o Main Road, Rampuri Camp, Shivaji Nagar, Amravati.
3. Usha Vikram Ahuja, Age 37 Yrs. Occu.: Household
R/o Block No.29/B, Sindhi Colony, Mecosabath, Bezaonbagh, Nagpur
4. Varsha Nilesh Ahuja, Age 33 Yrs. Occu.: Household
R/o Galli No.4, Near Santoshi Mata Mandir Rampuri Camp, Amravati.
5. Akash Rajkumar meghani, Age 29 Yrs. Occu.: Business
R/o Near Sai Baba Mandir, Rampuri Camp, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Arjundas Jagatram meghani हे दिनांक 20.10.1995 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Brahamhanand Arjundas Meghani+4 -vs- Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Brahamhanand Arjundas Meghani+4 -vs- Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१८८/२०२६
**अनुराधा सुधाकर टारपे व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०१.१२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. अनुराधा सुधाकर टारपे, वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
२. आराधना सुधाकर टारपे, वय ३३ वर्षे, धंदा - घरकाम
३. मधुसुदन सुधाकर टारपे, वय २९ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी
सर्व रा.अंजनगांव बारी, ता.जि.अमरावती
ह.मु.प्लॉट नं.२०१, वैष्णवगौरी अपार्टमेंट नं.२, प्लॉट नं.१९, दिवान लेआऊट शिवनाग मंदिर मानेवाडा ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुधाकर लक्ष्मणराव टारपे** हे दिनांक 14.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अनुराधा सुधाकर टारपे व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अनुराधा सुधाकर टारपे व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ४९**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# अमरावती शिक्षक मतदारसंघ निवडणूक



काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार आदिती पोहरे यांनी अकोल्यातील सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मतदानाचा हक्क बजावला.



धामणगाव रेल्वे येथे मतदान झाल्यानंतर शिक्षक





डॉ.संगिता बोंडे अमरावती यांनी मतदानाचा अधिकार बजावला.



खल्लार-बेंबळा बु येथिल पदवीधर शिक्षक दांम्पत्याने मतदानाचा अधिकार बजावला.



गाडगेबाबा मंडळाचे अध्यक्ष प्रा. गजानन भारसाकळे दर्यापूर



अमरावती येथे मतदानाचा अधिकार बजावला.

## ठाणेदार प्रशांत जाधव यांच्या नेतृत्वात दुर्गा विसर्जन शांततेत

### पोलीस अधीक्षक निकेतम कदम यांनी घेतला बंदोबस्ताचा आढावा

**ब्राह्मणवाडा थडी/वार्ताहर**

चांदूरबाजार तालुक्यातील ब्राह्मणवाडा थडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही दुर्गा विसर्जन सोहळा मोठ्या उत्साहात, थाटामाटात आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात शांततेत पार पडला. नवरात्रोत्सवाच्या सांगतेनिमित्त आयोजित सोडा दुर्गा व तीन शारदा मंडळ विसर्जनाकरिता मिरवणूक काढण्यात आल्या होत्याया विसर्जन सोहळ्यात भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. संपूर्ण विसर्जन मिरवणूक शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावी, यासाठी ब्राह्मणवाडा थडी पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रशांत जाधव यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

दुर्गा विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच नागरिक आणि भाविकांना सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष दक्षता घेतली. अमरावती ग्रामीण जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक



नचिकेत कदम यांनीही ब्राह्मणवाडा थडी येथे उपस्थित राहून दुर्गा विसर्जनाच्या बंदोबस्ताचा आढावा घेतला.दुर्गा विसर्जनासारख्या मोठ्या धार्मिक सोहळ्यादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखणे, नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि उत्सव निर्विघ्नपणे पार पाडणे ही महत्त्वाची जबाबदारी पोलीस प्रशासनाने पार पाडली.ब्राह्मणवाडा थडी येथील दुर्गा विसर्जन सोहळा शांततेत झाल्याने धार्मिक उत्सवांमध्ये शांतता, शिस्त आणि सामाजिक सलोखा राखण्याच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाची भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. नागरिकांच्या सहकार्याने आणि पोलिसांच्या दक्षतेमुळे उत्सव यशस्वीरीत्या पार पडल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

## गणितीय सोसायटीच्या माध्यमातून नव्या संधींची दारे खुली

**अमरावती/का.प्र**

शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था (स्वायत्त), अमरावती येथील गणित विभागाच्या वतीने गणितीय सोसायटीचा उद्घाटन समारंभ, पीएच.डी. प्राप्त संशोधकांचा सत्कार तसेच गणितीय मॉडेल प्रदर्शन आणि पोस्टर सादरीकरण स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव समारंभ उत्साहात पार पडला.

संस्थेचे संचालक डॉ. के. पी. तुपे यांनी विद्यार्थ्यांना जिज्ञासा, सातत्यपूर्ण अभ्यास आणि संशोधनाची वृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. प्रा. डॉ. निमकर यांनी डेटा सायन्स क्षेत्रातील करिअरच्या संधी स्पष्ट करत गणितासोबत संगणकीय कौशल्ये आत्मसात करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

गणित विषयात पीएच.डी. प्राप्त केल्याबद्दल डॉ. भारती ओंकारराव फंदे आणि प्रा. डॉ. रुपेश रामभाऊ आत्राम यांचा सत्कार करण्यात आला.गणितीय मॉडेल प्रदर्शनात ऐश्वर्या आर. धायगुडे हिने प्रथम, मोहम्मद अम्मान व सिद्धी महूलकर यांनी द्वितीय, तर पायल राऊत व नेहा धनवट यांनी तृतीय क्रमांक मिळविला. पोस्टर सादरीकरण स्पर्धेत गायत्री सानप हिने प्रथम, सुहानी हळदे हिने द्वितीय, तर नेहा गणवट हिने तृतीय क्रमांक पटकावला. मॉडेल प्रदर्शनात 'मॉबियस स्ट्रिप', हायपरबोलिक भूमितीचा कला व वास्तुकलेतील उपयोग आणि 'क्रुस्कलचा अल्गोरिदम' यांसारखे विषय सादर करण्यात आले. विभागप्रमुख डॉ. एस. बी. थूल आणि प्रा. डॉ. आर. एम. धायगुडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गणितीय सोसायटीच्या कार्यकारिणीतील अनम फातिमा, दीक्षा दारोकर,लोखंडे, गायत्री सानप, आदीबा खान व पायल राऊत यांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

## श्री अंबादेवी संगीत सेवा समारोह २७ ते २९ नोव्हेंबरला

### चार सत्रांत दिग्गज कलाकारांचे सादरीकरण

**अमरावती-** २२ वर्षांपासून सातत्याने आयोजित करण्यात येणारा श्री अंबादेवी संगीत सेवा समारोह यंदा २७ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत श्री अंबादेवी कीर्तनसभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या तीन दिवसीय समारोहात चार सत्रांमध्ये नामवंत गायक व वादक आपली कला सादर करणार आहेत. पहिल्या सत्रात मुंबई येथील ख्यातनाम युवा गायक आदित्य मोडक शास्त्रीय गायन सादर करतील. त्यांना तबल्यावर स्वप्निल भिसे, तर संवादिनीवर निलय साळवी साथसंगत करतील.दुसऱ्या सत्रात पुणे येथील अतुल खांडेकर यांचे उपशास्त्रीय गायन होणार आहे. त्यांना तबल्यावर रामकृष्ण करंबेळकर, तर संवादिनीवर मालुगावकर साथसंगत करतील.याच दिवशी रात्री ८.३० वाजता तिसऱ्या सत्रात मुंबई येथील मिलिंद रायकर व यज्ञेश रायकर यांचे व्हायोलिनवादन आणि पं. हरिप्रसादजी यांचे शिष्य विवेक सोनार यांचे बासरीवादन असे सुरेल सहवादन रंगणार आहे. या सादरीकरणाला तबल्यावर कालीनाथजी साथ देतील.रविवार,२९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता चौथ्या व अंतिम सत्रात कोल्हापूर येथील ज्येष्ठ गायिका शाल्मली जोशी शास्त्रीय गायन सादर करतील. त्यांना तबल्यावर तेजोवृष जोशी, तर संवादिनीवर वरद सोहोनी साथसंगत करतील.श्री अंबादेवी कीर्तनसभागृहात हा संगीत सेवा समारोह सर्व रसिकांसाठी विनामूल्य खुला राहणार आहे.

### अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात

## ३१ ऑक्टोबर रोजी पदवीप्रदान समारंभाचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:३० वाजता अभियंता भवन (आयई हॉल), शेगाव नाका, अमरावती येथे 'पदवीप्रदान समारंभ २०२५' आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रसिध्दी प्रमुख डॉ. के. एस. वासणकर यांनी कळविले आहे.

या समारंभाला विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान (व्हिएनआयटी), नागपूर चे संचालक, प्रा. डॉ. प्रेम लाल पटेल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती चे प्राचार्य, डॉ. आशिष एम. महल्ले हे समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.सन १९६४ मध्ये स्थापन झालेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती हे विदर्भातील तंत्रशिक्षण क्षेत्रातील एक प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थान आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) सन २००६-०७ मध्ये स्वायत्त दर्जा प्रदान केल्यानंतर महाविद्यालयातील बी.टेक.ची पहिली तुकडी सन २०१० मध्ये पदवीधर झाली. यंदाचा समारंभ हा महाविद्यालयाच्या बी.टेक.च्या सोळाव्या तुकडीच्या पदवीदानाचा विशेष सोहळा आहे.

या समारंभाच्या माध्यमातून अभियांत्रिकी शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात येणार आहे. सन २०२५ च्या परीक्षेत प्रत्येक अभियांत्रिकी शाखेतून सर्व विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना तसेच पदवीधर महिला विद्यार्थिनींमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थिनीला सुवर्णपदक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीतील हा महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करण्यासाठी महाविद्यालयातर्फे आवश्यक तयारी करण्यात येत आहे. या समारंभाच्या शैक्षणिक व प्रशासकीय आयोजनाचे समन्वय अधिष्ठाता (शैक्षणिक), डॉ.एम.एस. मोरे आणि परीक्षा नियंत्रक, डॉ. के.एन. तायडे हे करीत आहेत.

## आमला विश्वेश्वर येथे जिल्हा क्षयरोग अधिकाऱ्यांची भेट

### NQAS बाबत घेतला सखोल आढावा



**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

जिल्हा परिषद आरोग्य विभाग, अमरावती आणि मा. आयुक्त आरोग्य सेवा यांच्या निर्देशानुसार डॉ.रमेश बन्सोड (जिल्हा क्षयरोग अधिकारी अमरावती ) यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, आमला विश्वेश्वर येथे भेट देऊन संपूर्ण आरोग्य केंद्राची सविस्तर पाहणी व तपासणी केली.

या भेटीदरम्यान आरोग्य केंद्रातील विविध विभाग, रुग्णसेवा, औषध साठा, व इतर कामकाजाची सखोल पाहणी करण्यात आली. तसेच उपस्थित कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे बजावण्याबाबत योग्य त्या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या.यावेळी आमला विश्वेश्वर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष सरकुंडे,डॉ. गौरी डहाणे,जिल्हा क्षयरोग पर्यवेक्षक कैलास शिंदे,प्रयोगशाळा पर्यवेक्षक विजय वानखेडे,आरोग्य सह्यायक राजेश पाटील बी.एम.सरदार,गजानन शेलोकर,तालुका क्षयरोग पर्यवेक्षक गौतम मनोहरे, प्रयोग शाळा पर्यवेक्षक विजय वानखेडे आरोग्य सह्यायिका सुनंदा मेढे, प्रयोग शाळा तंत्रज्ञ अधिकारी आशिष ढाणके, औषध निर्माण अधिकारी वैशाली पोपटकर,आरोग्य सेवक सुनील उके, रवींद्र वानखेडे, मंगेश ठाकरे वाहन चालक,आरोग्य सेविका रिता मडावी,जयश्री पाटील,स्वाती बारस्कर,स्मिता इंगोले,गजानन जाधव, मीना पवार आदी कर्मचारी उपस्थित होते.

## मंगलधाममध्ये 'शिवगर्जने'च्या जयघोषात नवरात्रोत्सव उत्साहात



### महिला शक्तीचा उत्स्फूर्त सहभाग

**अमरावती/का.प्र.**

मंगलधाम कॉलनी परिसरातील नागरिकांचे श्रद्धास्थान असलेल्या आदिमाया शक्ती नवरात्र उत्सव माँ दुर्गा महिला नवदुर्गोत्सव मंडळाचा यंदाचा नवरात्रोत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मंडळाच्या दहाव्या वर्षानिमित्त आयोजित उत्सवात 'शिवगर्जने'च्या जयघोषात माता राणीचे भव्य आगमन करण्यात आले होते. या उत्सवात परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होत महिला शक्तीचे दर्शन घडविले. महिला कार्यकर्त्यांच्या पुढाकारासोबतच पुरुष मंडळी, युवक आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहकार्यामुळे संपूर्ण उत्सवाला विशेष रंगत आली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची आणि हिंदवी स्वराज्याच्या परंपरेची आठवण करून देणाऱ्या शिवगर्जनेने माता राणीच्या आगमन सोहळ्यात चैतन्य निर्माण केले. अश्वारूढ बाल शिवाजी आणि बाल साईबाई, त्यांच्यासोबत जिजाबाईंची उपस्थिती, पारंपरिक वेशभूषेतील महिला, भगवे ध्वज आणि बाल मावळ्यांचा सहभाग यामुळे आगमन सोहळ्याला विशेष भव्यता प्राप्त झाली. माता राणीच्या जयघोषाने मंगलधाम परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

महिलांनी पुढाकार घेऊन सुरू केलेल्या या मंगलमय उपक्रमाला परिसरातील पुरुष मंडळी, युवक आणि कार्यकर्त्यांनी खंबीर साथ दिली.माता राणीचा उत्सव हा केवळ एका मंडळापुरता मर्यादित नसून संपूर्ण परिसराच्या एकजुटीचा, भक्तीचा आणि आपुलकीचा उत्सव असल्याचे या सोहळ्यातून अधोरेखित झाले. मंडळाच्या दहाव्या वर्षातील नवरात्रोत्सवाने धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरेची सुंदर सांगड घातली.

## पाकनदी प्रकल्पात प्रकल्पग्रस्तांचे 'जलसमाधी' आंदोलन

### गिरीश महाजन, चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

**वरूड** - पाकनदी प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित सानुग्रह अनुदानाच्या मागणीसाठी खडका येथील पाकनदी प्रकल्पात बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्यावतीने जलसमाधी आंदोलन करण्यात आले. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शेकडो महिला व पुरुष प्रकल्पग्रस्तांनी गळ्यापर्यंत पाण्यात उतरून सुमारे सहा तास आंदोलन केले. जलसंपदामंत्री गिरीश महाजन आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या आश्वासनानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.



प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता; मात्र पोलिसांच्या बंदोबस्ताची पर्वा न करता आंदोलकांनी खोल पाण्यात उतरून आपल्या मागण्यांसाठी ठाम भूमिका घेतली. आंदोलनाची तीव्रता वाढत असल्याने प्रशासनासमोर प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचा प्रश्न ऐरणीवर आला.

मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात संघटनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बोडखे, केंद्रीय कोषाध्यक्ष संजय गिद, अरविंद फुले, राजू तिवसकर, सुमनबाई घोरपडे, कांताबाई घोरपडे, यशवंत वाळवे, मनोज तंबाखे, अमनभाई, नथ्थुजी वानखडे, त्रिशूल सराड, अनुताई नागले, विजय जावळे, मीनाताई बैस, प्रेमिला उपासे, शुभम डोणालकर, जयश्री शळके, गौतम हजारे, अरुण दारोकर, नरेंद्र कुंभारे, लता हजारे, विजय बोडखे यांच्यासह शेकडो प्रकल्पग्रस्त महिला व पुरुष सहभागी झाले झाले असते.आता २८ तारखेच्या बैठकीत काय निर्णय होतो आणि दिवाळीपूर्वी प्रकल्पग्रस्तांच्या खात्यात मंजूर अनुदान जमा होते का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**दिवाळीपूर्वी अनुदान देण्याचे आश्वासन**

अखेर जलसंपदामंत्री गिरीश महाजन आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी आ. उमेश यावलकर व संघटनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण यांनी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. या चर्चेनंतर प्रकल्पग्रस्तांच्या सानुग्रह अनुदानाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी येत्या २८ तारखेला दोन्ही मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले. दिवाळीपूर्वी सरळ खरेदीधारक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मंजूर असलेला सानुग्रह अनुदानाचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यासंदर्भात मंत्र्यांनी आश्वासन दिल्याचे आमदार यावलकर यांनी आंदोलकांना सांगितले. या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**२८ तारखेच्या बैठकीकडे प्रकल्पग्रस्तांचे लक्ष**

संघटनेचे अध्यक्ष मनोज चव्हाण यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी संवाद साधताना प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता २८ तारखेच्या बैठकीत झाली पाहिजे, अशी ठाम मागणी केली. केवळ आश्वासनांवर प्रश्न प्रलंबित न ठेवता मंजूर अनुदान प्रत्यक्ष मिळावे, ही प्रकल्पग्रस्तांची प्रमुख अपेक्षा आहे. आंदोलनादरम्यान परिस्थिती तणावपूर्ण बनली होती. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता संबंधित अधिकाऱ्यांनी आंदोलकांशी संवाद साधण्याचे टाळल्याचा आरोपही करण्यात आला.

## संक्षिप्त

### वीर वामनराव जोशी प्राथमिक शाळेत रास-गरबा,दांडिया उत्साहात



**अमरावती -** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित वीर वामनराव जोशी प्राथमिक शाळेत नवरात्रोत्सवानिमित्त रास-गरबा व दांडिया उत्सवाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. महिला पालक भगिनी, विद्यार्थी आणि कर्मचारी वृंद यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शालेय परिसर आनंदमय वातावरणाने न्हाऊन निघाला.संस्थेचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य आणि शालेय समितीच्या अध्यक्षा डॉ.माधुरी चेंडके यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध अभिनव शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात.विशेष म्हणजे शाळेच्या माजी विद्यार्थिनी आणि माजी पालक भगिनींनीही आवर्जून उपस्थिती लावून या आनंदोत्सवात सहभाग घेतला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप सदार,ज्योती मडावी, आसावरी सोवळे, मनीषा श्रीराव, सुजित खोजरे, सचिन वंदे, विलास देठे अमोल पाचपोर, ईश्वर हेमने,चित्रा विघे,दिपाली गंगारे,मोहिनी राऊत,रोशनी काळे, प्रणिता माहोरे इत्यादींसह अनेक महिला पालक व विद्यार्थ्यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळण्याबरोबरच शाळा आणि समाजातील नातेसंबंध अधिक दृढ होत असल्याचे या कार्यक्रमातून दिसून आले.

### क्षयरोग रुग्णांना पोषण किट वाटप



**चांदुर रेल्वे-** जिल्हा परिषद आरोग्य विभाग, अमरावती आणि मा. आयुक्त आरोग्य सेवा यांच्या निर्देशानुसार डॉ.रमेश बन्सोड (जिल्हा क्षयरोग अधिकारी अमरावती ) यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, आमला विश्वेश्वर येथे भेट देऊन संपूर्ण आरोग्य केंद्राची सविस्तर पाहणी व तपासणी केली. भेटीदरम्यान आरोग्य केंद्रातील विविध विभाग, रुग्णसेवा, औषध साठा, व इतर कामकाजाची सखोल पाहणी करण्यात आली. तसेच उपस्थित कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे बजावण्याबाबत योग्य त्या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. यावेळी आमला विश्वेश्वर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष सरकुंडे, डॉ. गौरी डहाणे, जिल्हा क्षयरोग पर्यवेक्षक कैलास शिंदे, प्रयोगशाळा पर्यवेक्षक विजय वानखेडे,आरोग्य सह्यायक राजेश पाटील बी.एम.सरदार,गजानन शेलोकर,तालुका क्षयरोग पर्यवेक्षक गौतम मनोहरे, प्रयोग शाळा पर्यवेक्षक विजय वानखेडे आरोग्य सहाय्यक सुनंदा मेढे, प्रयोग शाळा तंत्रज्ञ अधिकारी आशिष ढाणके, औषध निर्माण अधिकारी वैशाली पोपटकर ,आरोग्य सेवक सुनील उके, रवींद्र वानखेडे, मंगेश ठाकरे वाहन चालक,आरोग्य सेविका रिता मडावी,जयश्री पाटील,स्वाती बारस्कर,स्मिता इंगोले,गजानन जाधव, मीना पवार आदी कर्मचारी उपस्थित होते.

### महर्षी वाल्मिकी मठासाठी निधीची मागणी आयुक्तांनकड

**अमरावती -** महर्षि वाल्मिकी जयंती अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांतील शासकीय व निमशासकीय कार्यालयांत साजरी करण्याचे निर्देश द्यावेत, अयोध्या (उत्तर प्रदेश) येथे महर्षी वाल्मिकी आश्रम उभारण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करावी,तसेच सामदा काशीपूर येथील महर्षी वाल्मिकी मठासाठी निधी मंजूर करून वितरित करावा,अशी मागणी विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.अमरावती, अकोला,यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम या पाचही जिल्ह्यांत जयंतीची अंमलबजावणी,अयोध्येतील आश्रम उभारणी आणि मठाच्या विकासासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती निवेदनद्वारे उमेश ढोणे,नगराध्यक्ष अविनाश गायगोले अंजनगाव सुर्जी नगरपरिषद,एकनाथ वावरे,प्रकाश दंदे,उमेश दंदे,कैलास खोबरखेडे,अजय पसारी आणि बंडू हांतोडकर आदींनी केली.

# अमरावती शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी ९१.०८ टक्के मतदान

## २६ उमेदवारांचे भाग्य मत पेटीत बंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षक मतदार संघ निवडणुकीसाठी आज शुक्रवार २३ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ ते सायंकाळ पर्यंत झालेल्या मतदानानंतर रिंगणातील २६ उमेदवारांचे आमदारकीचे भाग्य मतपेटीत बंद झाले आहे. सायंकाळ पर्यंत ९१.०८% मतदान झाले. सुरुवाती पासूनच मतदानाला चांगला प्रतिसाद मिळाला. आता सर्वांच्या नजरा २७ ऑक्टोबरला होणाऱ्या मतमोजणीकडे लागल्या असून, उमेदवारांची धाकधूक कमालीची वाढली आहे.

विभागातील अमरावती, वाशीम, यवतमाळ, बुलढाणा व अकोला या पाचही जिल्ह्यांत सकाळी ८ ते दुपारी ४ वाजता दरम्यान ८१ मतदान केंद्रांवर अत्यंत चुरशीने मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. दुपारी १२ वाजतानंतर केंद्रावर रांगा लागल्या होत्या. शहरातील ११, जिल्ह्यातील २५ आणि विभागातील ८१ मतदान केंद्रावर शांतीपूर्णरित्या निवडणूक प्रक्रिया पार पाडली. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला होता. शुक्रवारी सकाळच्या सत्रात मतदानाचा वेग काहीसा संथ असला, तरी दुपारी १२ वाजता नंतर मात्र सर्वच केंद्रांवर शिक्षकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र होते. मतदान संपेपर्यंत ही गर्दी कायम होती. केंद्रा बाहेरील बूथवर उमेदवारांचे समर्थक, कार्यकर्ते आणि नेत्यांची मोठी मांदियाळी दिसून आली. महाविकास आघाडी आणि महायुतीचे ज्येष्ठ नेते स्वतः मैदानात उतरून आपापला किल्ला सांभाळत होते. दुसरी कडे शिक्षक आघाडी आणि विविध संघटनांचे समर्थकही शड्डू ठोकून उभे होते. अमरावती येथील मुख्य बूथवर बसून इतर यवतमाळ, वाशीम, अकोला व बुलढाणा या चार जिल्ह्यांत नेमकी काय स्थिती आहे, याचा मोबाइलवर आढावा घेताना नेत्यांची चांगलीच कसरत सुरू होती.







### 'या' उमेदवारांची चर्चा

मतदान केंद्राच्या परिसरात दिवसभर अनेक उमेदवारांच्या जय- पराजयाची गणिते मांडली जात होती. यामध्ये प्रामुख्याने शिंदे सेनेचे किरण सरनाईक, काँग्रेसच्या अदिती पोहरे, प्रा. दिलीप कडू, संगीता शिंदे-बोंडे, श्रीकांत देशपांडे, शेखर भोयर, अविनाश बोर्डे, सुरेश देवकर, दत्तात्रय लहाने आणि प्रा. प्रशांत विघे या उमेदवारांची नावे मतदार आणि कार्यकर्त्यां मध्ये सर्वाधिक चर्चेत होती. मात्र शिक्षकांनी नेमका कोणाच्या पाठीवर कौतुकाचा हात ठेवला आणि कोणाला नाकारले, याचा फैसला आता २७ ऑक्टोबरला मतमोजणी नंतरच स्पष्ट होईल.

### विभागीय आयुक्तांकडून आढावा-

निवडणूक प्रक्रियेदरम्यान निवडणूक अधिकारी आणि विभागीय आयुक्त नयना गुंडे आणि निवडणूक निरीक्षक अभय महाजन यांनी मतदान केंद्रावर पोहचून आढावा घेतला. अपर आयुक्त संजय जाधवही यावेळी उपस्थित होते. मतदान केंद्रावरील प्रक्रियेवर वेब कॉस्टिंगच्या माध्यमातून विभागीय आयुक्त आणि निवडणूक निरीक्षक मतदान प्रक्रिया संपेपर्यंत लक्ष ठेवून होते. रात्री उशिरापर्यंत मतपेट्या स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित जमा केल्या जातील.

### मतदानाची टक्केवारी

| | | |
|---|---|---|
| अमरावती | - | ८९.३६ टक्के |
| अकोला | - | ९२.१२ टक्के |
| यवतमाळ | - | ९२.१७ टक्के |
| बुलढाणा | - | ९०.७५ टक्के |
| वाशिम | - | ९२.८७ टक्के |
| एकूण | - | ९१.०८ टक्के |

होती.

या निवडणुकीत एकूण ३५ हजार ८१० पैकी ३२ हजार ६१६ मतदारांनी आपले दायित्व पार पाडले.

निवडणूक पार पडल्यानंतर आता चार दिवस मतपेटी लोकशाही भवन परिसरातील स्ट्राँग रूममध्ये राहणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने येथे तगडा बंदोबस्त पोलिसांचा राहणार आहे. मंगळवार २७ ऑक्टोबर रोजी सकाळी मतपेटी बाहेर काढून मतमोजणी सुरू होईल. या चार (पान २ वर)

# जुगार बंदीसाठी पत्रांचा मारा

## नगरसेवकाचे नाव जुगार प्रकरणात चर्चेत!

### दर्यापूरच्या छाप्यात ९.३३ लाखांचा मुद्देमाल जप्त

### पिंजरमधील कथित आर्थिक व्यवहारांचीही चर्चा

**मूर्तिजापूर/प्रतिनिधीः-** जुगार अड्डे बंद करा, अशी पोलिसांकडे वारंवार मागणी करायची आणि दुसरीकडे जुगार प्रकरणाच्या संदर्भात स्वतःचे नाव चर्चेत यायचे! या विरोधाभासामुळे मूर्तिजापूरच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. नगरसेवक तथा वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष तसवर खान तसलीम खान यांचे नाव दर्यापूर येथील जुगार प्रकरणाशी जोडले जात असल्याने आता त्यांच्या भूमिकेबाबत सवाल उपस्थित होत



आहेत. दर्यापूरमध्ये १९ ऑक्टोबर रोजी अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने टाकलेल्या छाप्यात १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. रोख रक्कम, मोबाईल, दुचाकी आणि स्विफ्ट कार असा एकूण ९ लाख ३३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईनंतर संबंधित प्रकरणातील प्रत्येक दुव्याची पडताळणी (पान २ वर)

# धारणी न.पं. सीईओ यांना धमकी

## घरात घुसून दाखवली पिस्तूल

**धारणी/प्रतिनिधीः-** धारणीत अज्ञात आरोपीने नगर पंचायतच्या मुख्याधिकाऱ्यांना घरात घुसून जिवंत जाळण्याची धमकी दिली. या घटनेने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. ही घटना गुरुवारी रात्री सुमारे ८ वाजताची आहे. धारणी नगर पंचायतचे मुख्याधिकारी अविनाश कुटे नेहमी प्रमाणे आपल्या भाड्याच्या खोलीत एकटेच बसून चहा पीत होते. त्यावेळी अचानक अज्ञात आरोपी त्यांच्या खोलीत घुसला आणि त्यांना जिवंत जाळण्याची धमकी दिली. एवढेच नाही तर आरोपीने कमरेला लावलेले पिस्तूल सदृश हत्यार दाखवून धाक दाखवला आणि



निघून गेला. या प्रकारामुळे सीईओ कुटे प्रचंड घाबरले आणि त्यांनी खोलीचा दरवाजा बंद करून घेतला. सकाळी ते धारणी पोलीस स्टेशनमध्ये पोहोचले आणि घडलेला प्रकार सांगितला. ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून अविनाश (पान २ वर)

# जिल्ह्यातील ६०० सेवा सहकारी संस्थांना कारणे दाखवा नोटीस

## कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांना बँकांनी पीककर्ज द्यावे- जिल्हाधिकारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत शेतकऱ्यांना लाभ देणे सुरू केले आहे. या योजनेंतर्गत कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. तसेच कर्ज वाटप करण्यासाठी टाळाटाळ करणाऱ्या जिल्ह्यातील ६०० सेवा सहकारी संस्थांना सहाय्यक निबंधकांमार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयात गुरूवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी बँकांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. मागील आढावा बैठकीमध्ये अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवीन पीक कर्जवाटप अत्यल्प असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी नाराजी व्यक्त केली होती. तसेच, सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून पात्र शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व सहायक निबंधकांमार्फत जिल्ह्यातील ६०० सेवा सहकारी संस्थांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

आढावा बैठकीमध्ये जिल्हा मध्यवर्ती (पान २ वर)

# मोर्शीत ३५५ पैकी ३२७ शिक्षकांनी केले मतदान



**मोर्शी/प्रतिनिधीः-** अमरावती विभागीय शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी आज दि.२३ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयातील मतदान क्रमांक १९ येथे सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत अतिशय शांततेत मतदान पार पडले. मोर्शी तालुक्यातील ३५५ मतदानापैकी एकूण ३२७ शिक्षक मतदारांनी मतदान केले त्यामध्ये महिला शिक्षक मतदारांनी ११० तर पुरुष मतदारांनी २१७ मतदानाचा हक्क बजावला. तहसीलदार सागर ढवळे यांच्या नेतृत्वात ग्रामविकास अधिकारी कैलास परडे व मंडल अधिकारी पंकज वानखडे यांच्या देखरेखीखाली एकूण ९२.११ टक्के मतदान पार पडले. सकाळी आठ वाजता सुरू झालेल्या (पान २ वर)

# अजय वाधवानी यांचे निधन

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील जयस्तंभ चौकातील सुरेश कॅफे आणि रामजी पॅलेसचे संचालक सुरेश रामूमल वाधवानी यांचे ज्येष्ठ पुत्र अजय उर्फ अज्जू वाधवानी यांचे शुक्रवार २३ ऑक्टोबर रोजी निधन झाले.



गुरुनानक नगर येथील त्यांच्या निवासस्थानाहून सायंकाळी ५ वाजता अंत्ययात्रा काढण्यात आली. अज्जू वाधवानी यांच्या पार्थिवावर २३ ऑक्टोबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. ते आपल्या मागे बराच आप्त परिवार सोडून गेले आहे. त्यांच्या निधनाने वाधवानी कुटुंबीयांसह मित्रपरिवार आणि शहरात शोक संवेदना व्यक्त केल्या जात आहे.

# अंजनगाव सुर्जीत गावठी कट्ट्यासह तरुण गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण जिल्ह्यात अवैध धंदे आणि बेकायदेशीर शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने 'ऑपरेशन कवच' ही धडक मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीणच्या पथकाने अंजनगाव सुर्जी येथे मोठी कारवाई केली आहे. अंजनगाव सुर्जी ते लखाड रोड परिसरामध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका २४ वर्षीय तरुणाला देशी बनावटीच्या कट्ट्यासह (गावठी पिस्तुल) अटक करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार,



दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला अंजनगाव सुर्जी ते लखाड रोडवरील एच.पी. कंपनीच्या पेट्रोलपंपासमोर एक इसम कमरेला देशी बनावटीचा कट्टा लावून फिरत असून परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे, अशी माहिती मिळाली होती.माहिती मिळताच पथकाने पंचांसह (पान २ वर)

# भारत-न्यूझीलंड मॅचवर सट्टा लावणारे दोन बुकी जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारत-न्यूझीलंड क्रिकेट सामन्यावर सट्टा खेळवणाऱ्या दोन बुंकीना गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. माहिती नुसार दर्यापूर तालुक्यातील बनोसा कच्छीपुरा येथे भारत-न्यूझीलंड सामन्यावर सट्टा खेळवला जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने तेथे धाड टाकली. यावेळी आरोपी शहबाज सहित घानीवाले (वय २८, रा. कच्छीपुरा, बनोसा) आपल्या घरामध्ये लॅपटॉप आणि दोन मोबाईलच्या सहाय्याने 'जय



श्रीराम' नावाच्या सट्टा ॲपवर ग्राहकांना लिंक पाठवून सट्टा खेळवत असल्याचे निदर्शनास आले. चौकशी दरम्यान त्याला ही लिंक (पान २ वर)

# शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीत दर्यापूरात ९०.३१ टक्के मतदान

## ४७५ पैकी ४२९ मतदारांनी बजावला मतदानाचा अधिकार

**खल्लार/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग पदविधर शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी आज (दि.२३) दर्यापूर येथिल तहसिलमध्ये मतदान शांततेत पार पडले. दर्यापूर तालुक्यात एकुण ४७५ मतदारांपैकी ४२९ मतदारांनी मतदानाचा अधिकार बजावला. ९०.३१ टक्के मतदान शांततेत झाले.

महायुतीचे उमेदवार किरण सरनाईक , दिलीप कडू , काँग्रेसच्या अदिती पोहरे, उबाठाचे दत्तात्रय लहाने, संगिता शिंदे , शेखर भोयर, श्रीकांत देशपांडे यांच्यासह २६ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

या निवडणुकीची मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी होणार आहे. निवडणूक अमरावती विभाग स्तरावर होत असली तरी दर्यापूर विधानसभा मतदार संघातील शिक्षक मतदारांची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

दर्यापूर मतदार संघातील शिक्षक मतदारांनी मोठ्या संख्येने मतदानाचा हक्क बजावला आहे. दर्यापूर तालुक्यात ४७५ मतदार असून मतदार संघात म्हणजे दर्यापूर व अंजनगाव मिळून ९८६ मतदार आहेत.

सकाळपासूनच मतदान केंद्रांवर शिक्षकांची गर्दी दिसून येत होती. माहितीनुसार, दर्यापूर विधानसभा मतदार संघात महायुतीचे किरण सरनाईक आणि दिलीप कडू , काँग्रेस च्या आदिती पोहरे, संगिता शिंदे आणि श्रीकांत देशपांडे , भोयर यांच्याविषयी शिक्षकांत सकारात्मक भूमिका आहे. दर्यापूर विधानसभा मतदार संघातील मतदार या निवडणुकीत नेमके कोणत्या उमेदवारावर किती भर देतील हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे. आता २७ तारखेला जाहीर होणा-या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अतिक्रमणावर कारवाई, शेत रस्ता मोकळा

## शेतकऱ्यांकडून तहसीलदार सोळंके यांचा सत्कार



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील हिरापूर येथील शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांपासूनच्या शेत रस्त्याच्या प्रश्नावर अखेर तोडगा निघाला आहे. तहसीलदार पुष्पा सोळंके (दाभेराव) यांनी शेत रस्त्यावरील अतिक्रमणे हटवून शेत रस्ता शेतकऱ्यांसाठी मोकळा करून दिला. या निर्णयामुळे आनंदित झालेल्या हिरापूर येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार पुष्पा सोळंके यांचा पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार केला.

मिळालेल्या (पान २ वर)

# एटीएम कार्डची अदलाबदल करून ५७ हजार ५०० रुपयांची फसवणूक

## आशीर्वाद हॉस्पिटलजवळील प्रकार

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील अमरावती रोडवरील आशीर्वाद हॉस्पिटलच्या बाजूला असलेल्या एटीएम मशिनमध्ये एटीएम कार्डची अदलाबदल करून एका व्यक्तीची ५७ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे.

याप्रकरणी दर्यापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या




माहितीनुसार, संबंधित व्यक्ती एटीएममधून पैसे काढण्यासाठी गेली असता एटीएम कार्ड मशिनमध्ये टाकल्यानंतर पैसे निघत नव्हते. त्यावेळी एटीएम मशिनमध्ये कार्ड अडकल्याचे लक्षात आले.

याच दरम्यान तेथे उपस्थित असलेल्या चार अनोळखी इसमांनी एटीएम कार्ड काढण्यासाठी मदत करण्याच्या बहाण्याने संबंधित व्यक्तीला फोन लावण्यास सांगितले. संबंधित व्यक्ती फोन लावण्यासाठी बाहेर गेली असताना या अनोळखी इसमांनी (पान २ वर)

# कॉ.अशोक सोनारकर यांना मातृशोक

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य किसान सभा सरचिटणीस तथा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कार्यकारणी सदस्य अशोक सोनारकर यांच्या मातोश्री, सुशिलाबाई शिवदत्त सोनारकर यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. दि.२३ ऑक्टो.रोजी कुऱ्हा येथील स्मशानभूमी मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी झालेल्या श्रद्धांजली सभेमध्ये प्रा.साहेबराव विदळे (प्रकल्पग्रस्तांचे नेते) कॉ.सुनील मेटकर (जिल्हा सचिव भाकप) महाराष्ट्र राज्य नर्सेस संघटनेच्या नेत्या वर्षा पागोटे ,किसान सभेचे कार्यकर्ते कॉ. पृथ्वीनंदन निवल, कॉ. दिलीपसिंह (पान २ वर)



# अचलपूर रुग्णालयाला आरोग्य आयुक्त संजय काटकर यांनी दिली भेट

## विविध वॉडाची पाहणी ,डॉक्टर ,कर्मचारी आणि रुग्णांशी संवाद

**अचलपूर/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त तथा आरोग्य सेवा संचालक संजय काटकर हे २३ व २४ ऑक्टोबर दोन दिवसीय जिल्हा दौऱ्यावर असल्याने त्यांनी काल २३ ऑक्टोबर रोजी अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात भेट दिली. यावेळी त्यांनी विविध वॉडाची पाहणी केली आणि डॉक्टर ,कर्मचारी आणि रुग्णांशी संवाद ही साधला. अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात अचलपूर तालुक्यासह (पान २ वर)



# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अमरावती महानगराचा विजयादशमी उत्सव रविवारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने अमरावती महानगरात रविवार, २५ ऑक्टोबर रोजी श्री विजयादशमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६.३० वाजता किरण नगर येथील श्रीमती नरसम्मा महाविद्यालयाच्या मैदानावर हा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून नॅशनल पेस्टिसाइड्स अँड केमिकल्सचे



मुख्य कार्यकारी अधिकारी विनीत श्रीराव उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सह-संपर्क प्रमुख भारत भूषण हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.

विजयादशमी उत्सवाच्या माध्यमातून समाजात शक्ती जागरण, संघटन, विश्वशांती आणि मानवकल्याणाचा संदेश देण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्या कुटुंबासह या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन अमरावती महानगर संघचालक उल्लास बपोरीकर यांनी केले आहे.

दरम्यान, उत्सवाच्या निमित्ताने (पान २ वर)